म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें

विषय

दा. क्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

(ठाणें जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.

सं. क्र.

सत्वशील श्रीमती

नाटक

विद्वान लोकांना पसंत झालेलें.

# सत्यशीलश्रीमती नाटक.

हें पुस्तक

## कृष्णराव गोपिनाथ जयवंत,

ग्वाल्हेर येथील सरदार श्रीमंत यादवराव उर्फ बापुसाहेब घोरपडे सेनापती निसबत शिंदेसरकार, यांचे खासगी इंग्रजी मास्तर यांनीं रचिलें.

त्याची ही पहिली आवृत्ति.

**अनंतराव रामचंद्र रेगे,**

रस्तेदार नि. डे. एजुकेशनल इन्स्पेक्टर जिल्हा ठाणें. यांनीं छापून प्रसिद्ध केली.

पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदिली आहे.

ठाणें "जगत्समाचार" प्रेस.

(सर्व प्रकारचे हक्क ग्रंथकर्त्यानें आपणाकडे ठेविले आहेत)

शके १८१८ सन १८९७.

किंमत ०१४ आणे.

श्रीमंत सरकार

महाराज माधवरावसाहेब शिंदे,

आलिजा बहादर दामइकबालहू

साहेबांचे चरणीं,

त्यांच्या राजधानींत ग्रंथकर्त्यानें

कांहीं वर्षे क्रमिलीं त्याचें

कृतज्ञता दर्शक

म्हणून

ही

अल्प सेवा

त्यानें मोठ्या भक्तीनें

व

अत्यंत आदरपूर्वक

अर्पण केली

आहे.

"I will to the last maintain inviolate my fidelity to principles which, though they may be borne down for a time by senseless clamour, are yet strong with the strength and immortal with the immortality of truth, and which, however they may be misunderstood or misrepresented by contemporaries, will assuredly find justice from a better age."

Macaulay.

"निरर्थक वितंडवादाच्या योगानें कांहीं वेळ माग ५. तत्यास धरून असल्या कारणानें सत्याप्रमाणेंच शक्तिमान व अविनाशी अशीं आहेत, तसेंच, जीं समकालीन लोकांकडून कितीही भलत्या रीतीनें समजलीं गेलीं किंवा समजाविलीं गेलीं, तरी पुढच्या अधिक शहाण्या मंडळींकडून खचित ज्यांचा गौरव होईल, अशा तत्वांच्या ठिकाणीं मी आपली निष्ठा आमरण दृढ ठेवीन."

मेकाले.

# प्रस्तावना.

व्यक्तीला, समाजाला, किंवा राष्ट्राला गृहस्थिति, लोकव्यवहार, राजकार्य, व शेवटीं परमेश्वरप्राप्ति यां मध्यें यश मिळून उत्कर्ष होण्यास व शेवट चांगला सुखावह होण्यास, अंतःकरणशुद्धि हें मुख्य साधन असून तें अवश्य संपादन करण्याविषयीं सर्वांनीं झटलें पाहिजे, व त्या विषयीं एकमेकांस वारंवार सावध केलें पाहिजे अशा कामीं ग्रंथरचनेचा जसा उपयोग होतो तसा दुसऱ्या कशाचाही होत नाहीं. त्यामध्येंही रुक्ष प्रकारच्या निबंधापेक्षां नाटकरचनेनें जनसमूहाचें विशेष मनोरंजन होऊन परिणामही विशेष व चिरकाल राहणारा असा होतो, म्हणून ही अल्प देशसेवा करण्याचा प्रयत्न केला आहे. तरी उदार वाचक दोषांकडेच विशेष नजर न देतां ग्रन्थकर्त्याच्या हेतूकडे दृष्टि देऊन ही सेवा गोड करून घेतील अशी आशा आहे.

सदरहु पुस्तक रा. रा. अनंतराव रामचंद्र रेगे यांनीं छापून प्रसिद्ध केलें याबद्दल ग्रन्थकर्ता त्यांचा फार आभारी आहे.

तसेंच, ज्या विद्वान गृहस्थांनीं आपला अमूल्यवेळ खर्च करून पुस्तकाची हस्तप्रत वाचण्याची तसदी घेतली व आपापले अभिप्राय देण्याची कृपा केली, त्यांचाही ग्रन्थकर्ता फार आभारी आहे.

मुक्काम ठाणें. } कृ. गो. जयवंत.

# अभिप्राय.

Dear Mr. Jayavant,

I carefully went through the manuscript which you sent to me for my perusal. I, indeed, congratulate you upon the success of your work which, as you say, was originally written to beguile your own time. The plot is simple, short, and touching. The language, unlike that of many similar works is not laboured, but easy and natural. Above all originality of conception is displayed throughout the whole, which alone deserves attention. I admire the work however, not for this, as for the highest and best moral principle it inculcates. For this at least I recommend this production of yours to the notice of our female friends.

Yours very truly,
N. G. Chapekar
B. A; L L. B.

---

Dear Mr. Jayavant,

I have gone through the whole of the manuscript copy of your Satwashila—Shrimati which you were kind enough to send to me, and I have no hesitation in saying that the book is, on the whole, interesting and worth reading.

Yours faithfully,
S. Y. Rajadhyaksha.
B. A; L L. B.

Dear Mr. Jayavant,

......The plot is original and interesting. The language is good. The hero and heroine all saintly and virtuous, will certainly make an impression on the mass of the people.... .... I hope it will soon be brought on the stage, so that it may increase in populariyt.

Yours sincerely,
D. G. Deshmukh.
B. A.; L L. B.

---

रा. रा. कृ. गो. जयवंत यांस वि. वि.

" सत्वशील श्रीमती " नाटकाची हस्तलिखित प्रत मीं वाचून पाहिली. त्यावरून माझें असें मत आहे कीं, आपलें नाटक उत्तम प्रतीचें वठलें आहे. नाटकाचें संविधानक मनोरंजक आहे, व मानवी प्राण्याच्या मनाच्या उदात्तत्वाच्या स्वरुपाचें चित्र काढण्याचा तुमचा उद्देश आहे तो पुष्कळ अंशीं सिद्धीस गेला आहे असें ह्मणण्यास मला हरकत वाटत नाहीं. श्रीमती व सत्वशील ह्या दोन पात्रांच्या स्वभावांची तसबीर अत्यंत स्वर्गीय व मानवी प्राण्यावर चिरकाल ठसा उठविणारी साधली आहे. इतर पात्रांचें स्वभाववैचित्र्यही पूर्णपणें दृग्गोचर होत आहे. नाटकामध्यें मनुष्याच्या अनेक मनोवृत्ति उचंबळून टाकण्याचा मोहक गुण असणें अवश्य आहे; व तो कालिदासासारख्या नाट्याचार्यांच्या नाटकांत पूर्णपणें आढळून येतो; तो गुण आपल्या नाटकांत बऱ्याच अंशीं दृष्टीस पडतो. नाटकामध्यें पात्रांच्या तोंडीं जे विचार प्रगट केले आहेत ते प्रासंगिक आणि उदात्त आहेत. नाटकाची भाषाही साधी, शुद्ध, व प्रसंगानुरूप साधली आहे.

एकंदरीत आपलें नाटक पहिल्या प्रतीच्या नाटकांत गणण्यास हरकत नाहीं. ह्या नाटकाचा प्रयोग रंगभूमीवर करण्यायोग्य आहे. अलिकडे वाईट नाटकग्रन्थांचा जो सुकाळ होत चालला आहे त्याला भर पडणारें आपलें नाटक नाहीं, हें पाहून मला फार आनंद होत आहे. वाचकांच्या किंवा प्रेक्षकांच्या मनावर तुमच्या नाटकाचा परिणाम चांगलाच होईल, असें मी विनदिक्कत ह्मणतों. आपल्या प्रयत्नांत आपणास यश मिळावें अशी माझी फार इच्छा आहे. आपला ग्रंथ लोकाश्रयास सर्वथैव पात्र आहे.

आपला,

**विठ्ठल गणेश प्रधान बी. ए.**

---

रा. रा. कृ. गो. जयवंत यांस वि. वि.

अलिकडे महाराष्ट्र भाषेंत प्रसिद्ध झालेल्या नाटकांमध्यें गोवऱ्यासारखें आपलें नाटक नाहीं हें कळविण्यास मला अत्यानंद वाटतो...........नाटक वाचून मनाला आनंद होतो. नाटकांत अश्लीलपणा मुदली नाहीं. संविधानक निर्दोष आहे. भाषा बरी आहे. मनुष्य स्वभावाचें वैचित्र्य दाखविण्याचा ग्रंथकाराचा प्रयत्न बराच सिद्धीस गेला आहे असें मी आनंदानें कबूल करितों. प्रत्येक सुशिक्षित वाचकाच्या आश्रयास हें पुस्तक पात्र आहे असें मला वाटतें.

आपला,

**केशव निळकंठ मोगरे.**

**बी. ए.**

My dear Krishnarao,

I had great plesaure in going through your play entitled " Satwasheel-Shreemati". The plot of this tragicomedy seems to be on the whole instructive. The attempt at characterization is successful. The style is good......
I am of opinion that your play may safely be commended to the notice of the public.

Your sincerely,
K. A. Padhye.
B. A.

---

Dear Mr. Jayavant,

I was happy to peruse your sentimental comedy, which, I am glad to say, is not like other contemporaneous productions of this nature, larded with either indecency or bombost. I noticed a vein of liveliness and humour here and there, interspersed with a few scenes of genuine pathos and simple tenderness. The plot is in some respects original. The diction is plain, the dialogues often vehement and animated; the uniteis well obscved, the incidents varied ..........................the work is on the whole nobly planned and skilfully executed.

Yours,
D. M. Gupte
B. A.

---

Dear Sir,

I like the plot of Satwasheela-Shrimati exceedingly well. The story is well told and is very instructive. I have no doubt the book will receive prompt support it deserves.

Yours very sincerely,
G. S. Deshmukh.
B. A.

# नाटकांतील पात्रें.

श्रीमती .... .... .... .... .... .... राजकन्या. ( नायिका )
जिजाबाई .... .... .... .... .... राजकन्येची दासी.
वसंतमाधव .... .... .... .... ... प्रधान.
कमलिनी .... ... ... .... .... .... दुसऱ्या राजाची कन्या.
बाळशास्त्री .... .... राजाचा उपाध्याय.
बाळासाहेब .... .... एक तरुण सरदार.
सटवाजी .... .... ... सरकारी मांग.(नायक.)
हैबतराव .... .... तुरुंगावरील अधिकारी.

शिवाय राजा, राणी, कारकून, शिरस्तेदार, शिपायी, हुजरे, जोगीण, बैरागी, मांग वगैरे.

स्थळ:—सुवर्णपुरी.

# सत्वशील श्रीमती नाटक.

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

स्थळः—राजकन्येचा महाल.

( राजकन्या श्रीमती सचिंत बसलेली आहे. तिची दासी जिजाबाई जवळ उभी आहे. )

श्री०—( कांहीं वेळानें ) जिजाबाई, उभ्या कां? बसा. ( जिजाबाई बसते. )

जिजा०—बाईसाहेब, आज आपण कांहीं काळजींत आहांतशा दिसतां. असं काय बरं असावं?

श्री०—जिजाबाई, तुह्मांला तसं वाटत असेल, पण मी नेहेमीप्रमाणेंच आहे.

जिजा०—बाईसाहेब, आपण कांहीं ह्मणा; आपलं मन कोणत्यातरी गोष्टीकडे लागून राहिलेलं असावं. मला सांगण्यासारखं असलं तर सांगावं. तसं नसलं तर माझा आग्रह नाहीं, पण कांहीं जरी असलं, तरी मला कळविण्यास अगदीं हरकत नाहीं. त्या करितां मी ही आपल्याकडून होईल तितकं करीन. भरंवसा ठेवावा.

श्री०—जिजाबाई, भरंवसा नाहीं असं नाहीं. तुमच्या

सारखीं भरंवशाचीं खरीं माणसं फारच क्वचित् मिळतात पण—[ लाजून स्तब्ध राहते. ]

जिजा०—बाईसाहेब, अगदीं संकोच धरूं नका. खुशाल सांगा.

श्री०—जिजाबाई, मीच होऊन सांगायला मला लाज वाटते. पण तुह्मांला सांगितल्या शिवाय गत्यंतर नाहीं. हें पहा जिजाबाई, या माझ्या वयांत काळजी करण्याची दुसरी गोष्ट ती कोणती असणार?

जिजा०—लग्नाबद्दल का? होईल लग्न. त्याची ती इतकी काळजी कशाला?

श्री०—लग्न होईल कीं नाहीं, ही काळजी नाहीं ( जरा स्तब्ध राहते. ) जिजाबाई, तुम्ही मला उतावळी बायको म्हणाल व मनांत माझी कमी किंमत कराल. पण उपाय नाहीं.

जिजा०—बाईसाहेब, संकोच धरूं नये. आपण उपजतच मोठ्या शहाण्या आणि चतूर आहांत,व आपण जें कांहीं मनांत आणाल, तें चागलंच आणाल. माझी खात्री आहे. पण असं काय आपल्या मनांत आलं आहे? सांगा पाहूं.

श्री०—जिजाबाई, आजपर्यंत पुष्कळ तसबिरी आल्या, पण पाहिल्यापासून माझा असा निश्चय होता कीं, प्रत्यक्ष पाहिल्या शिवाय कोणालाही पसंत करावयाचं नाहीं, व एकदां ज्यावर मन जाईल, मग तो कोणीही असो, त्याच्या शिवाय दुसऱ्या विषयीं लग्नाचं मनांतच आणणं नाहीं. त्याचीच पत्नी होऊन कायावाचामनेंकरून खरं खरं

पातिव्रत्य पाळण्यांत देह खर्च करावयाचा. संपत्ति व ऐश्वर्य यांची मला लालसा नाहीं, व त्यांपासूनच सुख होतं असं ही नाहीं. परंतु सत्य व सदाचरण हींच काय तीं शेवटीं चिरकाल आनंदाचीं आहेत. तरी आजपर्यंत आलेल्या तसबिरीं पैकीं एकही माझ्या पसंतीस आली नाहीं, पण काल एक मूर्ति माझ्या दृष्टीस पडली, ती पाहतांच एकाएकीं माझ्या मनानें त्या ठिकाणीं धांव घेतली, व त्याचवेळीं मीं त्या पुरुषाची पत्नी होण्याचा निर्धार करून चुकलें. आतां तसा योग कसा घडून येईल या काळजींत मी आहें.

जिजा०—इतका कां तो पुरुष चांगला आहे?

श्री०—काय सांगूं जिजाबाई? मला ज्या ज्या गोष्टीं-ची आवड त्या सर्व त्या ठिकाणीं मूर्तिमंत वास करीत आहेत. मनुष्याचं अंतःस्वरूप कीं नाहीं त्याच्या मुद्रेव-रून कळतं, व भाग्यशाली आणि पुण्यवान् मनुष्याची कांती व तेज हीं ही कांहीं विलक्षण असतात. जिजाबाई, मी सांगतें हें आतां तुम्हाला खरं वाटणार नाहीं, पण तुम्ही जेव्हां त्याला प्रत्यक्ष पहाल, तेव्हां माझं बोलणं तु-म्हाला अगदीं खरं वाटेल.

जिजा०—बाईसाहेब, असा पुरुष आपण पाहिलात तरी कुठें!

श्री०—परवां संध्याकाळीं मी महालक्ष्मीच्या दर्शनास जात होतें, तेव्हां त्याला नदीच्या पुलावर उभा अस-तांना पाहिला.

जिजा०—पण हा आपला विचार महाराजसाहेबांच्या पसंतीस येईल का बाईसाहेब? त्याचं कूळ, त्याची स्थिति, व आणखी दुसऱ्या गोष्टीं या पाहिल्याशिवाय आपण एकदम कसा मनाचा निर्धार केलांत. आईसाहेबांच्या मनांत तर आपणांला बरोबरीच्या राजपुत्राला देण्याचं आहे, आणि आपण तर निर्धारच केला ह्मणतां. मुलीस वर पाहून देण्याचं काम आईबापांचं आहे.

श्री०—तें खरं जिजाबाई, पण परमेश्वरानें मला असं कांहीं मन दिलं आहे कीं, त्यामुळें एकतर मला सर्व प्रकारचं उत्तम सुख मिळून माझी अलौकिक कीर्ति मागें रहावी; नाहींपेक्षां वेळेस काय दुःखामध्यें मला दिवस काढावे लागतील व कसा शेवट होईल, हें कांहीं कळत नाहीं. पण माझी प्रतिज्ञा कधींही खोटी व्हावयाची नाहीं. ज्याअर्थीं देवानेंच असं मन दिलं आहे, त्याअर्थीं त्याचा शेवट बरा किंवा वाईट करणं, हेंही त्याच्याच हातीं आहे. आपले मनोरथ व्यर्थ आहेत. मात्र, कितीही संकटं आलीं तरी सत्यापासून ढळूं नये, व आपलं सत्व सोडूं नये. जिजाबाई, मीं तर निश्चय करून चुकलेंच आहे, तरी तसं कसं जमून येईल ही मोठी काळजी आहे, व याकरितां तुमचं मला साह्य पाहिजे.

जिजा०—बाईसाहेब, मजकडून होईल तितकं मी करीन, पण आपल्या मनाप्रमाणेंच घडून येणं मला कठीण दिसतं. वेळेस तो निराळ्याच जातीचा असला तर कसं?

श्री०—भलतंच? जिजाबाई, परजातीच्या पुरुषावर माझं मन कसं जाईल? माझी पूर्ण खात्री आहे कीं, तो स्वजातीपैकींच आहे. मात्र गरीब स्थितींत असावा. पण मी कुठें श्रीमंतीची व ऐश्वर्याची भुकेली आहे! मला त्यांची मुळींच जरूर नाहीं. तरी जिजाबाई, त्याची खरी माहिती कळेपर्यंत मोठी काळजी आहे खरी.

जिजा०—बाईसाहेब, आपण एकदम निर्धार करावयाचा नव्हता.

श्री०—जिजाबाई, आतां झाल्या गोष्टीस उपाय नाहीं, व दोन जागीं मन जाणं नाहीं ही गोष्ट पक्की. जसं नशिबीं लिहिलं असतं त्याप्रमाणें बुद्धि होते व तसं तसं भोगावं लागतं. जिजाबाई, तो स्वजातीपैकीं असून गरीब जरी असला, तरी मी मोठ्या नशिबाचीच आहे. पण वेळेस परजातीपैकीं जर का निघाला, तर मात्र माझी मोठी दुर्दशा आहे. काय देवाच्या मनांत आहे कोणजाणे. परंतु ऐहिक सुखाकरितां मी आपलं मन कधींही भ्रष्ट करणार नाहीं. ही सत्वाचीच परीक्षा आहे. यामुळें वेळेस माझ्या सुखाचा नाश होण्याचा संभव आहे खरा, परंतु अंतीं मीं परमेश्वराच्या विशेष कृपेसच पात्र होईन. तरी जिजाबाई, आतां झाल्या गोष्टीस उपाय नाहीं. त्याबद्दल बरं वाईट मी भोगीन. पण तुमचं मला साह्य पाहिजे तें हें कीं, तुम्ही त्या पुरुषाचा शोध लावावात. जिजाबाई खात्रीनें तो आपल्यापैकींच आहे.

जिजा०—शोध लावण्याचा प्रयत्न मी करीन, पण बाईसाहेब, त्याचं ठिकाण कसं कळेल? तो परक्या गांवचा तर नसेल?

श्री०—संध्याकाळचे वेळीं तुह्मी पुलावर जात जा; ह्मणजे एखादे दिवशीं त्याची व तुमची भेट होईल; तेव्हां सहज बोलतां बोलतां त्याचं राहण्याचं ठिकाण, नांव, गांव वगैरे सर्व कांहीं विचारून घ्या.

जिजा०—हें मी करीन, पण जर तो इथें कामाकरितां दोन दिवस येऊन परत आपल्या गांवीं गेला असला तर?

श्री०—सध्यां मी सांगतें असं करा. पुढचा विचार मग करूं.

जिजा०—आजपासून मी जात जाईन, पण बाईसाहेब, अगोदरच आपण कोणताही निर्धार करूं नये, असं मला वाटतं. उतावळी चांगली नाहीं. एखादे वेळीं पस्तावा होण्याची पाळी येते.

श्री०—नाहीं तरी आपलं स्त्री जातीचं सुखदुःख दुसऱ्यावरच अवलंबून आहे कीं नाहीं? जर मी खरी सत्वाची असेन, तर परमेश्वर मला दुःख कां देईल? आणि माझ्या प्रारब्धीं दुःखच यायचं असलं, तर आपल्या माणसाच्या महाप्रयत्नांनीं सुद्धां तें टळणार नाहीं. मग सुखाला भुलून आपलं सत्व तरी कां घालवावं? सत्याकरितां कितीही वाईट प्रसंग आले, तरी मागें चांगलंच नांव राहणार आहे.

जिजा०—बाईसाहेब, आपण कोणी महापतिव्रता हो-णार, असं मला दिसतं. देव करो, आणि आपल्या मना-प्रमाणेंच सर्व घडो.

श्री०—पण जिजाबाई, एव्हांशींच ही गोष्ट कोणाला कळतां कामा नये बरं. मला तुमची खात्री आहे ह्मणूनच तुमच्यापाशीं बोललें.

जिजा०—बाईसाहेब, याबद्दल मी आपल्याच तोंडानं काय सांगावं! आपणांला अनुभव येईल तो खरा.

( दुसरी दासी येते. )

दु० दासी०—बाईसाहेब, आपल्याला आईसाहेब बोलावतात.

श्री०—येतें. जिजाबाई, चला कशाला बोलावलं आहे तें पाहूं.

[ उठते. सर्व जातात. ]

---

## प्रवेश दुसरा.

### स्थळः—दिवाणखाना.

[ पुरुषाचा वेष घेतलेली कमलिनी बसली आहे. जवळ हुजऱ्या उभा आहे. ]

कम०—धनाजी!

धना०—जी सरकार, ( हात जोडून ) काय हुकूम?

कम०—खालीं जा, आणि वसंतमाधव प्रधानसाहेब यांची स्वारी वाड्यांत शिरतांच मला येऊन सांग.

धना०—जी हुकूम. ( जातो. )

कम०—( आपल्याशींच ) येथ पर्यंत तर मजल येऊन

पोहोंचलों. आतां पुढचा विचार काय करावा? आपण पडलों स्त्री जाती, सुस्वरूप, त्यांतून भर तारुण्याचे दिवस; पुरुष वेष घेतला आहे त्याअर्थी नानाप्रकारच्या लोकां-शीं ओळख व स्नेह होणार, त्यांत कित्येक महाधूर्तही असणार, वेळेस त्यांना आपलं खरं स्वरूप कळेल, आणि मग व्यर्थ विटंबना मात्र होणार. बाबांचे जासूदही चोहों-कडे शोधांत असतीलच. बरं, जवळचं द्रव्य तरी किती दिवस पुरणार? लग्न केलं असतं तर तें सुखाचंच झालं असतं, ही तरी कोणी खात्री धरावी? माझ्या आईमध्यें भ्रष्टपणाचा इतकासा तरी लेश होता काय? कांहीं नाहीं. खरोखरी पतिव्रता. पण सवतीनें बाबांच्या मनांत भलतं सलतं भरवून दिलं. तिला पाहिजे होतं आपल्याच मुलाला राज्य. मुलगा तो ही पण झाला नव्हता. आमचे बाबा पडले भोळे व रागीट, आणि करविला माझ्या आईचा वध. (डोळे पुसते व स्तब्ध राहते) देवा, नवमास पूर्ण होत आलेल्या त्या माझ्या आईवर जेव्हां शस्त्राचा प्राणांतिक घाव पडला असेल, तेव्हां तिच्या मनाची काय अवस्था झाली असेल! तिला काय काय आठवलं असेल! तुझा धांवा किती केला असेल! पोटांतल्या बाळा करितां तिचा जीव काय काय बोलला असेल! त्या दुष्टांची तिनें किती काकूळत केली असेल! शिव शिव!!! (डोळे पुसून) देवा, ज्या चक्रवर्तिनीच्या चरणाचा दर्शनलाभ मोठमोठ्या मांडलिकांसही मिळणं नाहीं, जिच्या कोमल चरणांना कधींही भूमीचा स्पर्श व्हावयाचा नाहीं, जी पडद्यामध्यें

आपल्यी सिंहासनावर विराजमान होऊन तिच्या चरणीं सर्व मांडलिकांसुद्धां प्रजाजनांचीं शिरं लवून प्रणाम व्हाव-याले, व, भोंवतालीं एक सारख्या नागव्या तरवारी चम कत आहेत अशा रथांत आरूढ होऊन आपल्या परि-वारासह मोठ्या ऐश्वर्यानं जी राजवाड्यांतून बाहेर पड-णार, अशा त्या प्रत्यक्ष सार्वभौमिणीचा परम सुकुमार, अगदीं निष्कलंक, व परम पूज्य अशा स्त्री जाती राजदेह घोर हाल व अपेष्टा होण्याकरितां दुष्ट मांगांच्या स्वाधीन व्हावाना? व तिच्या प्राणाचा नाश त्यांच्या भयंकर शस्त्राचा घाव पडून व्हावाना? आणि शेवटीं प्राण गेल्या-वर सुद्धां तो पवित्र देह निर्जन अरण्यांत पडून पशु पक्षी यांजकडून छिन्नविच्छिन्न व्हावाना? ( जरा स्तब्ध राहून ) हर हर!!! कठीण स्थिति आहे आम्हा स्त्रियां-च्या अब्रूची, आमच्या देहाच्या लज्जेची, व शेवटीं आमच्या जीविताची. केवळ पतीच्या अविचारी लहरी करितां वेळेस आमचा सर्वस्वी नाश व्हाव-याचा, आणि त्याबरोबर एखादे वेळीं आमच्या उदरीं असलेल्या प्राण्याचा सुद्धां विनाकारण नाश व्हा-वयाचा. [ जरा स्तब्ध राहते. ] आहाहा!!! वेळेस तें बालक पुत्ररत्न निघून ज्याच्या जन्माचा मोठा उत्सव झाला असता, खंडोगणती साखर हत्तिणीवर वाटण्यांत आली असती, आपापल्या मनुष्यांच्या भेटीकरितां हवाल-दील झालेले हजारों बंदीवान मुक्त झाले असते, पुष्क-ळांना बक्षिसं व देणग्या मिळाल्या असत्या; बाळपणीं

ज्याच्या हास्ययुक्त कोमल गालावर हात फिरवून कोड-कौतूक करण्याची सर्व मांडलीक राजे फार इच्छा करि-ते, व अशी अपूर्व संधी मिळाल्यानें त्यांहीं आपणांस फार फार धन्य मानून घेतलं असतं, जो बोबड्या गोंड शब्दांनीं मला ताई, ताई हांक मारणारा असा माझा आवडता धाकटा भाऊ झाला असता, आणि आनला यु-वराज असून पुढें कोट्यावधी प्रजाजनांचा पालन कर्ता झाला असता, व ज्या एकट्याकरितां लक्षावधी शूर पुरु-षांचे प्राण आधीं बळी पडले असते, परंतु त्याच्या देहा-स दुष्टांकडून यत्किंचितही दुखापत होतींना, त्या गर्भ-वासी बाळाचे कोंवळे लुसलुशीत अवयव निर्जन जंगलांत पक्षांनीं टोंच टोंचून खावेत काय? कोल्ह्या लांडग्यांनीं त्याचे लचके तोडावेत काय? शिव, शिव!!! देवा ह्या गोष्टीं मनांत आल्या ह्मणजे काळीज कसं आगदीं थर-थरून जातं. अंगावर शहारे येतात. लग्नाच्या गोष्टीचा तर तिटकाराच येतो. कांहीं सुचत नाहीं. सर्व जग शून्य-वत वाटतं, व पुढच्या आयुष्याचा अगदीं कंटाळा येतो. त्या वेळेस तर मी लहानच होतें, परंतु समजूं लागल्या वर आईची ही हकीगत ऐकल्या पासून माझं मन कसं अगर्दी उदास होऊन गेलं आहे. कोणतीच गोष्ट गोड वाटत नाहीं. त्या राजवाड्याचा तर वीटच आला होता. काय करावं! मी पडलें तरूण व रूपवान स्त्री, त्यांतूनही एकटी, ह्मणून भीति वाटते; नाहीं तर तीर्थाटन करून ईश्वरभजनांत पुढचं आयुष्य घालविलं असतं. पण तसं

करितां येत नाहीं. स्त्रियांच्या देहाला फार भीति आहे. पुरुषांची नजर पापी असते. आपण कितीही शुद्ध आचारणानें राहिलों तरी ते नाना कुतर्क काढणार, नाहीं नाहीं ते खोटे आरोप आणणार, आणि शेवटीं उगीच छि:थू होऊन त्रास होण्याची पाळी येणार. तरी कुठें तरी एकाच पण अब्रूमध्यें दिवस जातील, अशा ठिकाणीं राहिलं पाहिजे. बरं नुसत्या तशा राहण्यानेंही निभाव लागणार नाहीं. कांहीं तरी सरकारी अधिकाराचं काम पत्करिलं पाहिजे. ह्मणजे एकतर आपल्या बचावास जास्त साधन होईल, व दुसरं लोकांवर परोपकारही करितां येतील. सरकारी काम तरी न्यायाधिशाचं मिळाल्यास चांगलं. त्यांत न्यायाशिवाय दुसऱ्या कोणाशीं विशेष संबंध नसतो. सर्वांची सारखी दाद लावितां येईल. व मला तें कामही चांगलं करितां येईल. दुसरं, येथील महाराजसाहेब चांगले मनुष्य आहेत. प्रधान वसंतमाधव तर फारच सज्जन मनुष्य आहेत. अल्पवयांत इतक्या मोठ्या अधिकारास खरोखरींच योग्य मनुष्य. पुन्हा स्नेहाचेही विशेष भुकेले दिसतात. माझी व त्यांची पहिल्यानं सहज गांठ पडली, पण थोड्या मुदतींत त्यांनीं फारच स्नेह वाढविला. त्यांचाही आग्रह आहे कीं, मी कांहीं काम पत्करून येथेंच रहावं, दुसरीकडे जाऊं नये. तरी तूर्त त्यांच्या ह्मणण्या प्रमाणें करावं हें बरं. परदेशांत सज्जनाचा स्नेह सोडणं चांगलं नाहीं. ( धनाजी येतो. )

धना०—सरकार, दिवाणसाहेबांची स्वारी आली.

कम०–स्वारी आली? ( उठते व दरवाज्यापर्यंत जाते वसंतमाधव येतो. त्यास ) यावें.

वसंत०–कां काय चाललें आहे; तब्बेत तर ठीक आहेना?

कम०–ठीक आहे. आपलीच वाट पाहत होतों. आज कुठें जाण्याचा विचार आहे.

वसंत०–आज केदारेश्वराकडे जाऊं. कां वाडा तर पसंत आहेना?

कम०–होय. पसंत आहे.

वसंत०–पण येथें राहण्याचें माझें ऐकिलें पाहिजे. दोन दिवसांचा स्नेह करून चटका लावून जाणें खऱ्या मित्रास उचित नाहीं. येथें राहण्यास काय हरकत आहे?

कम०–हरकत कांहीं नाहीं, पण हें अन्नोदकाच्या स्वाधीन आहे.

वसंत०–मित्रा चंद्राकरा, तुला खरेंच सांगतों, माझे स्नेही पुष्कळ आहेत, पण तुझ्या मैत्री पासून मला फार-च आनंद होतो. दोन घटका तुजपाशीं बोलल्यानें साऱ्या दिवसाच्या कामाचा शीण हरून जातो. खरोखरी तुझा स्वभाव मला फारच आवडतो. तुझा विचार येथें राह-ण्याचा होईल तर मला किती गोड वाटेल! आणि राज्य कारभारासारख्या मोठ्या महत्वाच्या कामांत तुझी मला किती मदत होईल!

कम०–वसंतमाधव, आपणांसारख्या थोर मित्राचें मन मोडणें ही विचाराचीच गोष्ट आहे. परदेशांत आप-

ला मला फार उपयोग झाला आहे. आपल्याचमुळें मला येथें कोणत्याही गोष्टीची अडचण पडली नाहीं. सर्व व्यवस्था अगदीं घरच्याप्रमाणें लागली आहे.

वसंत०—परदेशांत भल्या मनुष्याचा समाचार घ्यावा, हें प्रत्येक जाणत्या मनुष्याचें कामच आहे. त्यांत मीं जास्त तें काय केलें! पण तूं आमच्या सर्व गोष्टी गोड करून घेतोस, यानें मी तुझा फार आभारी आहें.

कम०—असें ह्मणावेंच लागतें. परंतु आपले मात्र मजवर खरेखरे उपकार आहेत, व ते कसे फिटतील ते फिटोत.

वसंत०—मग राहण्यानें तर पक्कें झालें. पण कांहीं सरकारी काम पत्करशील तर चांगलें. उद्योगाशिवाय मनाला आल्हाद नसतो.

कम०—सर्व आपल्या विचारावर आहे. येथील रीतभात, व्यवहार वगैरे यांना मी अपरिचित आहें.

वसंत०—हल्लीं तीन जागा खालीं आहेत. दोन सुभ्याच्या बाहेर प्रांतीं, व एक येथेंच न्यायाधिशाची. मला वाटतें, येथील न्यायाधिशाचीच जागा पत्करावी, ह्मणजे त्या कामासंबंधीं माहिती देण्यास मी जवळच आहें. न्यायाधिशाचे कामास तुमच्या खात्रीचा मनुष्य कोण आहे ह्मणून महाराजसाहेब मला विचारीत होते. तुझी नेमणूक करवूं? महाराजसाहेब माझें ऐकतील.

कम०—जसा आपला विचार होईल त्याप्रमाणें. पण प्रथम काम जड जाईल.

वसंत०—त्याची काळजी नाहीं. तें सर्व होऊन जाईल. मग कधीं महाराजसाहेबांस भेटावयास जायचें? उद्यां चलतां? सकाळींच जाऊं, ह्मणजे बरी निवांत भेट होईल.

कम०—तर मग सकाळींच मी आपली वाट पहात बसेन.

वसंत०—ठीक आहे. ( कमलिनी विडे देत ते खातो. ती खाते. ) चला तर आतां फिरायला.

कम०—चला. ( दोघे उठतात. ) धनाजी, मजबरोबर चल.

धना०—जी सरकार. [ सर्व जातात. ]

---

## प्रवेश तिसरा.

### स्थळ.—राजवाडा.

( राजा बसलेला आहे. जवळ हुजऱ्या आहे. )

राजा—खंडुजी, जनानखान्यांत जा, आणि बोलावलें आहे ह्मणून सांग.

खंडु०—जी सरकार. ( जातो. )

राजा—यांच्या विचारास आलें तर लागलेंच शास्त्रीबुवांना पुढची व्यवस्था करण्यास सांगावें. करितां त्यांना ही बोलवावें हें बरें [ कांहीं वेळ स्तब्ध राहतो व खंडुजी येतो त्यास ] खंडुजी, बाळशास्त्री यांनाही घेऊन ये. ( खंडुजी जातो. नंतर राणी येते. )

राणी—( उभी राहून ) कां बोलावणं झालं होतं?

**राजा०**—बसा. श्रीमतीच्या लग्नाबद्दल तुह्मांला कांहीं विचारायचें होतें.

**राणी**--( राजाच्या बाजूस बसून ) लवकरच विचार करावा हें बरं.

**राजा**—हो, यंदांच उरकून टाकावें असें माझ्या मनांत आहे.

**राणी**—मग ठिकाण कोणतं पसंत करायचं?

**राजा**--तेंच तुह्माला विचारायचें आहे. आजपर्यंत आलेल्या तसबिरींपैकीं श्रीमतीच्या मनास कोणती आली? कांहीं खुलासा काढिला का?

**राणी**--तें कसं कळणार? ती का साधारण मुलगी आहे? मोठी खोल. तिच्या मनांतलं काढावं कुणीं? मी प्रत्यक्ष आईना, पण माझ्याशीं सुद्धां कामापुरतं बोलणार, आणि मलाच शहाणपण शिकविणार. बाकी ती शहाणी खरी. तिच्यापुढें भलत्यासलत्याचं तेज कधीं पडावयाचं नाहीं, व कधीं कोणाच्या शब्दांत यायची नाहीं.

**राजा**--पण आलेल्या तसबिरी तिच्या दृष्टीस तरी पडल्याना?

**राणी**—सर्व तसबिरी तिच्याकडे पाठविल्या. पण काय! एकदां पहायची आणि ठेवून द्यायची. मग तिला कसा नवरा पाहिजे तें कोणाला माहीत?

**राजा**--तिचें ठीक आहे, पण आपल्याला दूरवर विचार केला पाहिजे. हें पहा, आपणांला नाहीं पुत्र-

संतति, आपल्यामागें राज्य जावयाचें आहे मुलीलाच, तेव्हां याचा विचार केला पाहिजे. तरी बाहेरचा मुलगा पाहून त्याच्या स्वाधीन राज्य करण्यापेक्षां आपल्या बाळासाहें-बाबद्दलच विचार करावा हें बरें. बरोबरीचा सरदार व माझा भाचा आहे. तरी कसा काय तुमचा विचार आहे? (खंडुजी येतो.)

**खंडुजी**--सरकार, शास्त्रीबुवांची स्वारी आली.

**राजा**--त्यांना आंत घेऊन ये. (राणी दूर बसते.)

[शास्त्री येतो. मुजरा करून आशीर्वाद देतो. राजा व राणी उठतात]

**राजा**--यावें, शास्त्रीबुवा. बसा, (राजा बसतो. राणी जरा दूर बसते.)

**शास्त्री०**--(बसून व हंसत.) सरकारांनीं कां बोलाविलें होतें? नुकताच जेआहेत्त पुजा वगैरे आटोपून बसलों होतों इतक्यांत खंडुजी आला.

**राजा**--शास्त्रीबुवा, बोलावलें होतें इतक्याकरितां. आपल्या श्रीमतीचा विवाह यंदां करणें आहे, व ती आपल्या बाळासाहेब शिरक्यांना द्यावी, म्हणजे गादी दुसऱ्याच्या घरांत न जातां घरांतल्या घरांत राहील असा विचार आहे. कां ठीक आहे कीं नाहीं?

**शा०**--वः! हें काय सांगावें? फारच योग्य विचार जे आहेत्त. सरकारांच्या पोक्त विचाराची काय गोष्ट सांगावी? इतकी दूरवर नजर पोंचविण्याचें आपलें नाहीं बोवा सामर्थ्य. येत्या माघमासींच तीथिनिश्चय करावा. (राणीस) बाईसाहेब, आपल्या ताईसाहेबांच्या लग्नस-

मारंभाची वाट ठिकठिकाणचे हजारों ब्राह्मण चातकाप्रमाणें पहात आहेत. खरेंच आहे. पुण्यश्लोक नृपतीच्याच सदनीं जेआहेत्ते आह्मां ब्राह्मणांचें खरें खरें आदरातिथ्य होणार. दुसऱ्या तिसऱ्याचें सामर्थ्य नाहीं. बाईसाहेब, माझी आतां दुसरी कसली इच्छा नाहीं. फक्त ताईसाहेबांचें लग्न एकदां माझ्या दृष्टीस पडावें, इतकाच हेतु राहिला आहे जेआहेत्ते. श्री जगन्निवास सिद्धीस नेणार समर्थ आहे.

**राजा**—( राणीस ) कां कसा, काय तुमचा विचार आहे?

**राणी**—मला काय विचारायचं? आपण आणि शास्त्रीबुवा जो विचार कराल तो खरा. आपणांला जी गोष्ट पसंत ती मलाही पसंत. आपणांपेक्षां का आह्मां बायकांना जास्त समजतं?

**राजा**—तसें नाहीं. तुमची कांहीं हरकत आहे का? नाहींतर पुढेंमागें म्हणाल कीं, आपल्या बहिणीच्या मुलास ह्मणूनच माझी सोन्यासारखी मुलगी देऊन टाकिली, मला विचारिलें सुद्धां नाहीं. तरी हें अपेश नको.

**राणी**—मुलगा चांगला शाहणा असला तर कसली हरकत? उलटा दुधांत साखर होईल. मुलगाही नाकींडोळीं सुरेख आहे.

**शास्त्री**--बाईसाहेब, मुलगा विद्येमध्यें वाईट नाहीं जे आहेत्ते. आणि विद्येचा विचार तो कशास पाहिजे? राजाला थोडेंच रोजगारधंदा करून पोट भरावयाचें आहे, व दोन पैसे मिळवावयाचे आहेत, तर विद्या पा-

हिजेच पाहिजे. राजा ह्मटला ह्मणजे जेआहेत्ते प्रत्यक्ष त्रिष्णूचा अवतार, अखंड लक्ष्मी त्याजपुढें हात जोडून उभी असणार, आणि शेंकडों विद्वान त्याच्या चरणाच्या आश्रयाखालीं राहणार. तेव्हां त्याला काय करावयाची आहे ती विद्या? आणि कशास पाहिजे ती उरस्फोड? त्यानें जेआहेत्ते भक्तीनें गोब्राह्मणांचें प्रतिपालन करून त्यांस आनंदीत ठेवावें, त्यांचा उपमर्द करूं नये, ऐश्वर्यादि सुखाचा चांगला उपभोग घ्यावा, व अंतीं मोक्षप्राप्ति होईल अशा रीतीचा ब्राह्मणांस दानधर्म करावा, ह्मणजे झालें. बाईसाहेब, सरकारांचा विचार फारच नामी आहे जेआहेत्ते.

**राणी**—आपणां सर्वांच्या पसंतीस आलें, ह्मणजे झालें.

**राजा**—ठीक आहे. शास्त्रीबुवा, दोघांचे ग्रह वगैरे कसे मिळतात ते नीट पहा. अजून अवधि आहे, परंतु एव्हांपासूनच तजविजीस लागलें पाहिजे.

**शास्त्री**—बरें आहे. आजच मी शिरक्यांच्या वाड्यांत जातों, व सहज ह्मणून बाळासाहेबांची पत्रिका पाहण्यास मागतों. ताईसाहेबांची मजपाशीं आहेच. [ हात जोडून. ] सरकार आज्ञा?

**राजा**— जातां? बरें. पत्रिका नीट जमवून पहा, व इतक्यांत ही गोष्ट प्रकट करूं नका. परस्परांचे ग्रह मिळाल्याशिवाय जमलें असें ह्मणतां येत नाहीं.

**शास्त्री**—हें काय मला सांगायला पाहिजे. आपणांपेक्षां आह्मा ताबेदारांना जास्त काळजी आहे जेआहेत्ते. (उठतो व मुजरा करितो. राजा राणी उठून बसतात, शास्त्री जातो.)

खंडु०—सरकार, ( हात जोडून )

राजा—कां तयारी आहे? चलातर. ( उठून जातात. )

---

## प्रवेश चवथा.

**स्थळ:—राजकन्येचा महाल.**

( जिजाबाई एकटीच बसलेली आहे. )

जिजा०—( आपल्याशींच ) बाईची पुजा आटोपली असेल. आतां आम्याबरोबर शोध लागला का ह्मणून विचारील, तर हिला सांगावं तरी काय? परवां सटवाजी भेटल्यापासून वाड्यांत यायला माझं पाऊलच पुढें पडेना. दोन दिवस दुखण्याचा बहाणा करून आलें नाहीं. पण बाईनें पिच्छा पुरविला. निरोपावर निरोप कीं, जशा असाल तशा येऊन भेटून जा. शेवटीं मेणाही पाठविला, तेव्हां येणं भागच आहे. आतां खरं सांगितलं तर ही पडली वीज. आपल्या पुढल्या सुखाचा आणि आईबापांच्या मनोरथांचा एकदम चुराडा करून टाकील. सत्व राखण्याच्या तर तिला जशा काय लहरींवर लहरीच येतात. मरणाची सुद्धां परवा नाहीं. दोन समजुतीच्या गोष्टी सांगून मन फिरवावं ह्मटलं, तर हिच्यापुढें कोणाचं काय चालणार? हिचं मन पडलं तरवारीची तीक्ष्ण धार. माझं सांगणं तेव्हांच वाटेला लावून मला निरुत्तर करील. अशी तेजस्वी बायको आजपर्यंत आपल्या पहाण्यांत कांहीं आली नाहीं. खरोखरीच दुसरी सावित्री. [ जरा स्तब्ध राहून ] बरं, न सांगावं,—

तरीही पंचाईत. ही नाहीं नाहीं त्या शपता घालील, माझा पिच्छा पुरवील, व आंतल्याआंत आपणाला नाकून घेईल. पुन्हां, आज नाहीं उद्यां मांगावंच लागेल. मी फार मरंवशाची ह्मणूनच तिनें मला हें काम सांगितल आहे, व माझी मोठी आशा धरून आहे. तरी नेभ-रंवसा करून तिला विंवचनेंत ठेवणं चांगलं नाहीं. न-शीब पोरीचं. आपण काय करणार? देवानेंच तिचं मन फिरविलं तर बरी गोष्ट आहे; नाहीं तर मला धड गत दिसत नाहीं. ती का साधारण बायको आहे! अस्सल नागीण. केवळ शब्दाकरितां आईबाप, राज्य, संसा-रसुख, या सर्वांवर पाणी सोडील. फार तर काय पण प्राणही देईल, पण आपला शब्द कधीं खोटा करणार नाहीं. बरं हिनें कांहीं कमजास्त केलं, तर तें बाहेर कळल्याशिवाय रहाणार नाहीं, व येईल सर्व आप-ल्यावर. दुर्दैव तर मला छळण्याचीच वाट पहात आहे. नको नको देवा, कंटाळा आला जिवाचा. सुख दुःख करितां काय काय अपेक्षा होतील तें कोणाला माहीत. माझा बाळ दूर झाल्याला आज सोळा सतरा वर्षं झालीं, तो तरी भेटतो कीं नाहीं हें कोणीं सांगावं? त्यांचीही काय वाट आहे तें कळत नाहीं. एकेक गोष्ट मनांत आली ह्मणजे पोटांत कसें अगदीं भडभडून येतं. पण करावं काय! मुकाट्यानं सोसलं पाहिजे.. परमेश्वरा-च्या मनांत दुःखच द्यावयाचं आहे हें खरं; नाहींतर ही आणखी दुसरी काळजी कां पुढें उभी राहिली असती?

ती, आपला निश्चय सोडिलसं मला नाहीं वाटत. दुसरं कांहीं नाहीं, आपलं मातेरं करून घेईल, व दुसऱ्याच्या गळ्यास फांस लावील. पण हिच्यापुढें बोलावें कोणीं? सांगून पहावं. ऐकलं तर बरं, नाहीं तर नशीब तिचं आणि माझं. ( जरा स्तब्ध राहून ) बहुधा हिनें पाहिलेला पुरुष सटवाजीच असावा. सांगितलेल्या सर्व गोष्टी जमतात. तेव्हां त्याच्याशिवाय दुसऱ्यावर ह्मणजे हिचं मन जाईल, आणि ही लागलाच निर्धार करील, अशी गोष्टच नाहीं. तो तसाच आहे. मीही राजकुळांतलीच आहें, पुष्कळ राजे व भाग्यशाली पुरुष पाहिले, पण असा सुलक्षणी, तसाच विलक्षण तेजस्वी आणि सुंदर पुरुष माझ्या पाहण्यांत कांहीं आला नाहीं. मुद्राही किती गंभीर! लहान वयांत शांति, धैर्य आदिकरून गुण त्या सुंदर कपाळावर कसे झळकतात! बोलणं तरी किती मधुर व नम्रतेचं! त्याला पाहतांच मानी राजपुत्रांचे सुद्धां अभिमान गळून जातील, व त्याच्याठिकाणीं त्यांची पूज्यबुद्धि होईल. पण देवाची करणी विचित्र! असल्या अलौकिक पुरुषाला नीच जातींत निर्माण केलं आहे. धन्य धन्य त्याचे आईबाप कीं, मोठमोठ्या सार्वभौम राजांच्या पोटींसुद्धां जें महारत्न यावयाचं नाहीं, तें, मानवजातीमध्यें सर्वांत अगदीं नीच अशा चांडालकुलांतील क्षुद्र दंपत्यास परमेश्वरानें दिलं आहे. तेंही त्यांना पुष्कळ दिवस लाभलं नाहीं. हाच जर गरीब, पण स्वजातीपैकीं एखाद्याच्या पोटीं आला असता, तर श्रीम-

तीच्या भाग्यास व आनंदास पारावरच नव्हता. त्याला पाहिल्यावर प्रथम मला किती उमेद होती कीं, मीं श्रीमतीचं महत्कार्य करून दिलं, परंतु हा यशाचा भाग मिळण्याचं कुठचं या पापिणीच्या नशिबीं ? बाकी श्रीमती चतुर खरी. धन्य आहे तिच्या परीक्षेची. पण काय उपयोग ? दैवानं विघडं केलं. ( स्तब्ध राहून ) काय ? आली वाटतं ? हो. ( उठून उभी राहते. श्रीमती येते. )

श्री०—कां जिजाबाई, कशी काय प्रकृति आहे ? आतां कांहीं बरी आहे का ? बसा. (बसते. नंतर जिजाबाई बसते. )

जिजा०—आतां कांहीं बरी आहे. दुसरं कांहीं नाहीं, दोन दिवस एकसारखं डोकं दुखत होतं. सकाळपासून कांहीं बरं आहे.

श्री०--शोध लागला का. दोन दिवस तुह्मी भेटलां नाहींत, त्यामुळें मला अगदीं चैन पडलं नाहीं. जिजाबाई, दुसरं कांहीं नाहीं. माझ्या निर्धाराच्या पायीं माझं काय होणार हें पहायचं आहे. ही नशिबाचीच परीक्षा आहे, ह्मणून केव्हां शोध लागेल असं झालं आहे. कांहीं असो, माझा निश्चय खरा; नाहींतर मी लग्नच करणार नाहीं.

जिजा०--बाईसाहेब, मी आपली अडाणी तर खरीच पण माझं थोडसं ऐकावं. हें पहा, एखादा पुरुष दृष्टीस पडला आणि तो मनाला चांगलासा वाटला, कारण चांगलं माणूस आहे तें सर्वांना आवडणारच, ह्मणून त्याची

जातपात, कुलशील, हीं कांहींएक न पाहतां मला हाच पति करायचा ह्मणून आपणासारख्या राजकन्यांनीं एकदम निर्धार करावा, आणि आपण संकटांत पडून दुसऱ्यासही संकटांत पाडावं, हें चांगलं का? मन भ्रष्ट करूं नये खरं. पण त्याच्या मर्यादा आहेत, सारासार विचार आहे. कोणीं केलं नाहीं, कोणीं ऐकलं नाहीं, असं भलतंच कांहींतरी काढून आपल्या पुढच्या सुखा-वर पाणी सोडावं यांत काय हांशील? आईबापांच्या आज्ञेशिवाय मी अमुकच पति करीन, असं मुलीला आधीं आग्रहानें ह्मणतां येत नाहीं. धर्म, शास्त्र, रुढी, यांना अनुसरून जें करणं तें करावं, आणि मग मात्र मन भ्रष्ट करूं नये. आह्मी गरीब नोकरमाणसांनीं ह्मणजे आपणांला सांगावं असं नाहीं, पण सांगितल्या-शिवाय राहवत नाहीं.

श्री०—जिजाबाई, तुम्ही खुशाल सांगा. मी सर्व ऐकलें. त्यांत मला अगदीं राग यावयाचा नाहीं. कोणी हिताचं सांगत असलं तर शहाण्यानें त्याचा राग का मानावा? जी मूर्ख असेल तिला राग येईल, पण कांहीं तरी शोध लागला का?

जिजा०—कांहीं शोध लागत नाहीं, ह्मणूनच ह्मणतें कीं हा आग्रह सोडून द्या. बोलणं फार सोपं असतं, पण करण्याची वेळ आली ह्मणजे समजतं. डोंगर दुरून कसा चांगला दिसतो, पण तो चढायाला लागलं ह्मणजे डोळे पांढरे व्हायला लागतात. त्या पुरुषाचा शोधच

जर न लागला, तर जन्म का फुकट घालविणार? लोक काय ह्मणतील? महाराजसाहेब व आईसाहेब आपणांला लग्नावांचून कशा राहूं देतील? बरं, आपण लग्नावांचून राहिलां, तर तें त्यांना सुखाचं कां होईल? त्यांचं सर्व सुख आपणांवर आहे. तेव्हां त्यांना फार दुःख होईल याचा तरी कांहीं विचार कराल कीं नाहीं? "

श्री०—जिजाबाई, सुखदुख आपण काय देणार? जसं नशिबीं लिहिलं असेल त्याप्रमाणें सर्व घडून येणार. आपण कांहीं करीत नाहीं आणि सवरीत नाहीं. उगीच ह्मणतों मात्र.

जिजा०—या परमार्थाच्या गोष्टींत काय हांशील? नशिबानं अगदींच कांहीं मिळालं नसतं, तर एक प्रारब्ध ह्मणावयाचं. तसं कांहीं नाहीं. देवाच्या दयेनं सर्व कांहीं ह्मणून आहे. रूप आहे, संपत्ति आहे, राज्य आहे, आईबाप लग्नाची मोठी हौस धरून आहेत. आणखी काय पाहिजे? पण बळंच कांहीं तरी खुसपट काढून देवानं दिलेलं भोगावयाचं नाहीं, आणि ह्मणायचं नशिबींच सुख नाहीं. महाराजसाहेबांना नाहीं का आपली काळजी? ते आपणांला पति पहातील तो वाईट का पहातील? नीट विचार करा. त्यांचं ऐकावं. आपलंच घेऊन बसूं नये.

श्री०—जिजाबाई, हा भ्रम आहे. अहो, राज्य असलं आणि लक्ष्मी असली ह्मणजे सुख होतंच, असं नाहीं. तसंच आईबापांना मुलांपासून सुख मिळणं, मुलीला चां-

गला वर मिळणं, व मिळाला तर तो चांगला लाभून तिचें सौभाग्य राहणं, आणि पुन्हां सौभाग्य राहूनही शेवटपर्यंत दोघांची एकमेकांवर चांगली प्रीति राहून आनंदांत दिवस जाणं, या गोष्टी न आईबापांच्या स्वाधीन, न माझ्या स्वाधीन. प्राक्तनाप्रमाणें सर्व घडून यावयाच्या आणि त्या त्या प्रमाणें त्या त्या वेळीं बुद्धि व्हावयाची. सुखाकरितां ह्मणून सर्व प्रयत्न करितात, परंतु पदरीं सुख पडेल तें खरं. अशी जर सुखाची मुळचीच खात्री नाहीं, तर भ्रमावर आपलं सत्व तरी कां ढकूं द्यावं? शेवटीं तेंच यशस्वी होणार आहे. आपण नीट राहून जर दुःख आलं, तर त्याचा बोल परमेश्वराकडे, आपल्याकडे नाहीं. आणि परमेश्वर तरी काय करितो; जसं मागील जन्मीं आपण दिलं असेल त्याप्रमाणें या जन्मीं मिळेल. पण कांहीं तरी शोध लागला का?

जिजा०—बाईसाहेब, या शोधापासून आपणांला समाधान व्हावयाचं नाहीं, माझी खात्री आहे.

श्री०—समाधान होवो, अथवा न होवो. त्याची तुम्ही कां काळजी करितां? भोगणारी माझी मी आहें, आणि नशिबाप्रमाणें बुद्धि होणार. तुम्ही खुशाल सांगा. तुह्मांला माझी अगदीं काळजी नको. माझ्या निश्चयापुढें सुख व दुःख हीं दोन्हीं सारखीं आहेत. जिजाबाई, देव ज्यांना मोठीं प्रचंड आणि ईर्षेचीं मनं देतो, त्यांना या दोन दिवसांच्या सुखाची व संपत्तीची कांहींच परवा नसते. त्यांच्या

ईश्वरप्रीत्यर्थ प्राण जाण्याची जरी वेळ आली, तरी तें एक चांगलं बीजच होईल असं समजून आनंदानें आपले प्राण खर्च करितात. तर दुःख व आपत्ति यांची कथा काय? परंतु ते आपला बाणा कधींही सोडणार नाहींत. त्याप्रमाणें देवानें मला मोठं विलक्षण मन दिलं आहे. पुरुष असतें तर मोठमोठीं शौर्याचीं व अखंड कीर्तीचीं कामें करून नांव मिळविलं असतं. पण आपली पडली स्त्रीची जात. आपलं शौर्य, धैर्य, शहाणपण वगैरे सर्व गुण आपण एका पातिव्रत्याशिवाय दुसऱ्या कशांत दाखविणार? व मनाची शांति ती कशी होणार? राज्य, ऐश्वर्य, डागडागिने, व शारिरीक सुख यांतच माझी तृप्ति नाहीं. कांहीं विशेष कसोटीचे प्रसंग आले पाहिजेत व त्यांतून आपलं सत्व यशस्वी झालं पाहिजे, यांत जो मला आनंद आहे, त्यापुढें इतर स्त्रियांचं सुख व आनंद हीं अगदीं तृणवत् आहेत. आमचं समाधान बारीकसारीक गोष्टींनीं होणारं नाहीं. आणि परमेश्वर ज्यांना अशीं मनें देतो, त्यांची पुढची योजनाही तशीच करून ठेवितो. मात्र, खरं काय तें पाहिजे. दुसऱ्यानें केलं ह्मणून आपणही करावं असं मात्र कामाचं नाहीं.

जिजा०—बाईसाहेब, महाराजसाहेब आपणास असाच वर पाहून देतील.

श्री०—असाच पाहून देतील किंवा कसा देतील, याचा आतां विचारच नाहीं. जो निश्चय झाला तो झाला. आतां मन फिरणं नाहीं. कोणावरच माझं मन गेलं

म्हतं, तोंपर्यंत मी बाबाची होतें, व त्या मुदतींत त्यांनीं मला एकाद्या अगदीं वाईट व टाकाऊ अशाला जरी दिली असती, तरी तो पति मला प्रियच झाला असता. व त्याची कायावाचामनेंकरून मोठ्या भक्तीनें सेवा केली असती. पण तसा योग कांहीं घडून आला नाहीं. आतां न बाबांचा विचार, न माझं सुख. केवळ माझ्या प्रतिज्ञेची मी आहें. जिजाबाई, आतां दुसरा विचारच नाहीं. काय असेल तें सांगा. तुह्माला माझ्या गळ्याची शपत आहे.

जिजा०—मी सांगतें, पण त्या पुरुषाशीं विवाह होण्याची मुळींच आशा नाहीं. इतकेंच नाहीं, तर अशा प्रकारची गोष्ट काढणें ह्मणजे छिथू होण्याची पाळी आहे.

श्री०—आतां कांहीं होवो. सत्वाकरितां हरिश्चंद्रानं राज्य सोडिलं व प्राणांतिक हाल सुद्धां भोगिले. आपल्याला नुसतं लग्नाशिवायही राहवत नाहीं का? तेंच सुख पाहिजे तर पशूचा जन्म काय वाईट? सांगा काय आहे तें.

जिजा०—शपत घातली तेव्हां सांगितलंच पाहिजे. पण बाईसाहेब, आपला हिरमोड होईल. आपण सांगितलं त्याप्रमाणेंच तो पुरुष आहे यांत अगदीं संशय नाहीं. इतकंच नाहीं, तर असा पुरुष आढळणंही फारच कठीण. मलाही त्याला पाहिल्यानंतर मोठा आनंद झाला होता, व बाईसाहेबांनीं चांगली योजना केली, असं वाटलं होतं. आपण सांगितल्याप्रमाणें सर्व गोष्टी

पूर्ण आहेत, पण बाईसाहेब, जेव्हां त्याची जात कळली, तेव्हां मात्र माझी अगदीं निराशा झाली, व मोठ्या काळजींत पडलें. बाईसाहेब, खरोखरी त्याची जात ऐकून मला मोठा अचंबा वाटला कीं, असल्या कुजातींत असा सुलक्षणी, तेजःपुंज व सद्गुणी पुरुष कसा निर्माण व्हावा? धन्य त्याच्या मातेची.

श्री०—( चिंतायुक्त. ) अशी कोणती जात आहे? सर्व विचारपूस केलीतका?

जिजा०—सर्व विचारपूस केली. त्याला आईबाप नाहींत, बहीणभाऊ नाहींत, कोणी नाहीं. एकटा आहे. पण जातीचा मांग आहे. त्याचा बाप नुकताच मरण पावल्यामुळें सरकारी मांगाचें काम त्याजकडे आलें आहे. ह्मणूनच ह्मणतें कीं या नादीं अगदीं पडूं नका.

श्री०—( कांहीं वेळ स्तब्ध राहून आपल्याशींच. ) जातीचा मांग!!! हें कसं? निंबवृक्षाचीं फळं मूळचींच कडू, आणि त्यांमध्यें एकच फळ पक्क द्राक्षापेक्षांही मधुर? अथवा देवदाराच्या पुष्पांस मूळचीच अतिशय दुर्गंधी आणि त्यांमध्यें एकाच पुष्पास मदनबाणाहून अधिक सुगन्ध? असं कसं होईल? आणि असं अघटित करण्यांत विधात्याचा हेतु तरी काय असावा? आधीं मांग जात म्हटली ह्मणजे सर्व वर्णांत कुरूप, कुलक्षणी, क्रूर व अमंगळ; आणि हा पुरुष तर क्षत्रिय वर्णांतील राजकुलास सुद्धां दुर्लभ अशा दिव्याकृतीचा, पुन्हां ज्याच्या शांती, क्षमा, दयादि उत्तम गुणांची साक्ष

त्याची मुद्रीच देतें; तेव्हां तो मांग कसा असेल, व आतां जें मी ऐकतें आहें तें खरं कसं असावं? बरं, त्यालाच वरण्याचं मनांत आणण्यांत वेळेस मजकडून अविचारीपणा झाला असेल, परंतु त्याला पाहतांक्षणींच या पृथ्वीवरील कोणती कुलीन व मानिनी अशी राजकन्या हाच पति असावा अशी इच्छा करणार नाहीं? त्याप्रमाणेंच जातीसंबंधीं काडीमात्रही संशय न येतां जर माझं मन त्याजवर गेलं, आणि माझ्या प्रतिज्ञेप्रमाणें त्यासच वरण्याचा निर्धार जर मजकडून होऊन गेला आहे, तर त्याबद्दल मजकडे तरी काय दोष? खरोखरीच चांडाल कुलांत असं पुरुषरत्न कधींच निर्माण व्हावयाचं नाहीं. तेव्हां, वेळेस त्याचा जन्म मांगजातींत नसून दैवयोगानें बाळपणींच तो मांगाच्या हातीं सांपडलेला असावा, किंवा मी जन्मास येण्याच्या पूर्वींच विधीत्यास माझ्या सत्वाचा हेवा होऊन माझ्या संसारसुखाचा नाश करण्याकरितांच त्यानें चांडालकुलांत असा पुरुष निर्माण केला असावा, व तो माझ्या दृष्टीस पाडण्याचा योग त्यानें आणिला असावा. कांहीं असो, माझ्या प्रीतीचा ओघ त्यास जाऊन मिळाला आहे. आतां मनाचा खरेपणाच राखणं आहे, तर मजकडे कांहींच राहिलं नाहीं. कारण, साधारण ओहोळाची गोष्ट वेगळी, पण अनेक प्रदेशांतून प्रख्यात होऊन वहात जाणाऱ्या महानदीचा ओघ एकदां महासागरास जाऊन मिळाल्यावर तो कधीं माघारा उलटेल असं कधींच होणं नाहीं. त्याप्रमाणेंच एकाकडून

माझ्या मनाचं हरण झाल्यावर दुसऱ्या पुरुषाशीं विवाह करून त्याजवर कृत्रिम प्रेम करावं, अशी पाळी मी आपल्यावर कधींही आणणार नाहीं. आतां माझं संसार-सुख गेलं ही गोष्ट खरी आहे, पण कांहीं वर्षांनीं तें जा-णारच होतें. असो, देवा, तुझी इच्छा. [ जरा स्तब्ध राहून ) बरं तो राहतो कुठें तें विचारिलंत का?

जिजा०—हो. शहराबाहेर मांगवाड्यापासून हांके-वर त्याचं एकट्याचंच खोपट आहे. जवळच वडाचं मोठं झाड आहे.

श्री०—जिजाबाई, तुम्ही पूर्ण भरंवशाच्या आहांत, ह्मणून तुह्मालाच फक्त माझा पुढचा इरादा सांगतें बरं. दुसऱ्याशीं लग्न करणं नाहीं ही गोष्ट तर पक्कीच, पण पुढें लग्नावांचून रहावं किंवा त्या पुरुषास आपला निश्चय सांगून त्याच्या सेवेस हजर रहावं, हा विचार करावया-चा आहे. लौकिक पाहिला पाहिजे. पुढचे परिणाम पाहिले पाहिजेत. तो जर आपला पति झाला आहे, तर त्याच्या जिवाला धक्का न लागेल, अशी सावधगिरीही आपणाला ठेविली पाहिजे. वेळेस बाबा मजवरचा राग त्याजवर काढितील, आणि त्याचे हाल हाल करितील. तसं कामाचं नाहीं- तरी मी उद्यां संध्याकाळीं पुरुष-वेष घेऊन त्याजकडे जाईन, व बोलण्याचालण्यावरून मी आपली खात्री करून घेईन. नंतर पुढचा विचार कायतो करूं.

जिजा०—बाईसाहेब, आपण कराल तें खरं. मी काय

सांगूं! महाराजेसाहेबांना ही गोष्ट समजली ह्मणजे आमच्यासारख्या जवळच्या मनुष्यांची धड गत नाहीं.

श्री०—जिजाबाई, तुम्ही अगदीं काळजी करूं नका. मी जें करीन तें फार दूरवर विचार करून करीन. माझ्यामुळें दुसऱ्याच्या गळ्यास फांस लागेल असं मी कधीं करणार नाहीं, व परमेश्वर माझाही दुर्लौकिक करणार नाहीं. जिजाबाई, संसारसुख भोगण्याचा योग मला आतां नाहींच. मला वाटतं, मी आतां थोड्याच दिवसांची येथील तुमची सोबतीण आहे. माझ्याकरितां दुसऱ्याला दुःख झाल्याचं अपयश देव मला कधीं देणार नाहीं, ही माझी खात्री आहे. पण तुम्ही ही गोष्ट मी सांगितल्याशिवाय कोणाजवळ बोलूं नकाहो. कोणास दुःख न होतां व माझ्या सत्वाचा भंग न होतां अन्नमध्यें लवकरच माझा शेवट होवो, इतकंच देवा पाशीं माझं मागणं आहे. दुसरी कसली इच्छा नाहीं (दुसरी दासी येते.)

दु० दा०—बाईसाहेब, आईसाहेब आपली वाट पहातात. लौकर चलायचं.

श्री०—येतें, चल. जिजाबाई, जाऊं नका. इथेंच अंमळ बसा. (जाते. दासीही जाते)

जिजा०—(आपल्याशींच) परमेश्वरा, तुला काळजी. असल्या बाण्याच्या माणसांना आह्मी काय शिकविणार? बाईचं ह्मणणं तरी खरंच आहे. सुखदुःख केवळ तुझ्या इच्छेवर आहे. माझं सुख काय कमी होतं! का कोणत्याही गोष्टीची वाण होती? पण आज वीस वर्षें वन-

वास व दासीपणा हीं नशिचीं आलीं आहेत." तुलाच फक्त माहीत प्राण्यांच्या नशिबीं काय काय लिहिलं आहे तें. महाराज साहेबांचा विचार हिला त्या भोळा साहेबाला द्यावयाचा आहे, पण हिच्यापुढें त्या मूर्खाचें तेज काय पडणार ? ही उग्र सिंहीण कोणीकडे आणि तो उन्मत्त बैल कोणीकडे ! संपत्ति, ऐश्वर्य, आणि महाराजसाहेबांचा मायाचा, यांनीं सर्व झांकून गेलं आहे, इतकंच कायतें. असल्या मूढाशीं जन्माची गांठ घालून आपलं मातेरं करून घेण्यापेक्षां तिनं तसंच रहावं, हें चांगलं. आणि योगही तसाच आला आहे. ही गोष्ट अजून तिला समजली नाहीं; नाहींतर ही वीज काय आकांत करील कोण जाणे. धन्य आहे सटवाजी तुझी कीं, या जातवंत नागकन्येनं तुलाच निवडून पसंत केला, व तुझ्याकरितां प्रत्यक्ष प्राणांविषयीं ही अगदीं निरिच्छ झाली आहे. यापेक्षां तुझ्या अलौकिक योग्यतेचं मोल तुला आणखी काय पाहिजे ? मागील जन्मीं महान् योगी असतांना काय थोडसं चुकला होतास ह्मणून देवानें तुला मांगाच्या नीच जातींत जन्म दिला; नाहींतर आजला काय सुंदर व अप्रतिम जोडा घडून आला असता ! प्रत्यक्ष लक्ष्मीनारायणाची हुबेहुब प्रतिमा. पण हें सुख पहाण्याचं कुठचं या हतभाग्येच्या कपाळीं ?

**दु० दा०**—( पडद्यांत ) अहो जिजाबाई, लौकर चला कीं, बाईसाहेब तुह्माला बोलावतात. ( येते ) आज काय बाई तुमचं नशीब फळफळलं आहे. आज तुह्माला

बाईसाहेबांच्या पंक्तीचा लाभ आहे बरं. आह्मीही तुखण्यानं पडतों, पण आह्मांला नाहीं कोणी असं सांगत. चला चला, जिजाबाईला घेतल्याशिवाय येऊं नकोस, असं छोट्या बाईसाहेबांनी सांगितलं आहे.

**जिजा०**—चला तर. ( जातात. )

### पहिला अंक समाप्त.

---

# अंक दुसरा.

---

## प्रवेश पहिला.

स्थळः—मांगाचें घर

( सटवाजी एकटाच बसला आहे. )

**सटवाजी**—( आपल्याशींच ) आहाहा ! ! ! परमेश्वरा, तुझी मजवर केवढी कृपा आहे ? नीच जातींत जन्म देऊन पिता चांगला दिलास, यामुळेंच मला ज्ञान आणि सदाचरण यांची आवड लागली, व त्यायोगानें आज मी आनंदी स्थितीमध्यें आहे. अगदीं निष्काळजी आहें. पुन्हा कोणाच्या वियोगाचें दुःख होईल ही भीतिच नाहीं. पित्यावर जीव होता, तोही गेला. आतां मला मायेंत गुंतविणारें कोणीएक नाहीं. नीच जातींत जन्म असल्यामुळें सौंदर्य, चातुर्यादि गोष्टी असून नसून अगदीं सारख्या आहेत. नाहींतर यांचा केवढा गर्व झाला असता ? महत्वाकांक्षा किती वाढली असती ? द्रव्यसंचय, अधिकार, मोठेपणा वगैरे संपा-

दन करण्याची यातायात व विवंचना, आणि इच्छेप्रमाणें घडून न आल्यास त्याबद्दल तळमळ, हीं किती करावीं लागतीं! अशा स्थितींत द्वेषादि दुष्ट मनोविकार किती अनावर झाले असते व त्यांच्या भरांत विनाकारण दुसऱ्यांना किती दुःख देतों? परंतु नीच जातीमुळेंच या सर्व गोष्टींचें अगदीं निवारण झालें आहे. खरेंच, आशेचा अंकुर निवण्यासच जर जागा नाहीं, तर तिचा प्रचंड वृक्ष वाढून त्याच्या भारानें त्रस्त होण्याची भीति कोठून असणार? लहानपणापासून आचरण कसें अगदीं शुद्ध असून प्राणीमात्रास निरुपद्रवी आहे. त्यामुळें कोणत्याही गोष्टींचें दुःख व पश्चाताप, किंवा कोणाच्या वैमनस्यापासून भीति, हीं मुळींच नाहींत. कसलाही लोभ नसल्यामुळें आयुष्य वाढण्याची इच्छा नाहीं, व कोणत्याही गोष्टीचें दुःख नसल्यामुळें आयुष्याचा कंटाळाही नाहीं. अशा रीतीनें दुनयेंतील सुखदुःखापासून मी अगदीं मुक्त आहें. धन्य माझें नशीब. बाबाच्याचमुळें मी या मार्गावर आहें, नाहींतर आज मी माझ्या जातीच्या दुष्ट व्यवसायांत गढून गेलों असतों! पूर्ण अज्ञानावस्थेंत राहून द्रव्यसंचयाकरितां अनेक हत्यादि पातकें करून पुढच्या भोक्तृत्वाकरितां संचय करण्याच्या उमेदींत असतों! उंच वर्णांत जन्मलों असतों, तर कामक्रोधादि मनोविकारांच्या तडाक्यांत सर्वस्वी सांपडलों असतों, व आपल्या स्वार्थाकरितां अनेकांच्या दुःखास कारणीभूत झालों असतों! याच सुंदर व मनोहर देहा-

च्या अभिमानांत अनेक रूपवती स्त्रियांना भ्रष्ट करण्याची उमेद करितों, व त्यांना भ्रष्ट करून शेवटीं मी आपलीही दुर्दशा करून घेतों! अशा रीतीनें या व आणखी दुसऱ्या अनेक गोष्टींचें दुःख व पश्चाताप यामुळें शेवटीं माझी काय अवस्था होती कोणजाणे! परंतु केवळ नीच जातींत जन्म असून सद्गुणांची आवड असल्यामुळें मी आज खरा खरा सुखी आहें. परमेश्वरा, ही तुझी मोठी कृपा आहे. (इतक्यांत पुरुषाचा वेष घेतलेली श्रीमती येऊन दूर उभी राहते.)

श्री०—(आपल्या पोषाकाकडे पाहून व नीट सांवरून पुढें येते.) सटवाजी आहेत काय?

सट०—(श्रीमतीस पाहून विस्मयपूर्वक आपल्याशींच) हा थोर इसम कोण बरें आला असावा? (एकदम उठून मुजरा करून) जी सरकार, ताबेदार हजूर आहे. मज गरिबाच्या घरीं आपणा थोरांचे पाय कसे लागले? कांहीं आज्ञा असेल तर हा ताबेदार हजर आहे. (जवळचा पाट पुढें करून) सरकार बसावें.

श्री०—(पाटावर बसून) आज्ञा कांहीं नाहीं. सहज भेटावेंसें वाटलें ह्मणून फिरत फिरत आलों.

सट०—माझी गरिबाची भेट? शिव शिव!!! सरकार, असे शब्द काढूं नयेत. आपण श्रीमंत थोरलोक कोणीकडे, व मी आपल्या पायांचा नोकर कोणीकडे?

श्री०—कोणी गरीब झाला ह्मणून त्याच्या भेटीस जाऊं नये वाटतें? सज्जन मनुष्य कोणत्याही स्थितींत असला, तरी त्याची योग्यता विशेष आहे.

सट०—सरकार, मी आपला एक नीच यत्किंचित् मनुष्य आहे. सज्जन शब्द मला कसा शोभेल?

श्री०—न शोभण्याला काय झालें? मनुष्याची योग्यता त्याच्या गुणांवर आहे. मग तो कोणत्याही जातींतला असो व कोणत्याही स्थितींत असो. दोनचार दिवसांपूर्वी आमच्या चाकरमाणसांकडून ऐकिलें कीं, आपल्या गांवांतील सरकारी मांग सटवाजी ह्मणून आहे, तो फार भला व साधुपुरुष आहे, ह्मणून ह्मटलें कीं, असल्या मनुष्याची भेट घ्यावी. मला भल्या मनुष्याशीं स्नेह करण्याचें फार आवडतें मग तो कोणत्याही जातीचा असो.

सट०—सरकार, आपण तसें म्हणतां, पण माझी अशी योग्यता नाहीं. मी नीचाहून नीच आहें.

श्री०—पण तुमच्या रंगरूपावरून व बोलण्याचालण्यावरून तुमची जात मांग आहे, असें कोणाला वाटणार नाहीं, तुमचें अंतःकरणही निराळेंच दिसतें. मोठी आश्चर्याची गोष्ट आहे.

सट०—परमेश्वरी लीला. दुसरें, माझा बाप चांगाजी फारच योग्य माणूस होता, त्याची पुण्याई. तो मरण पावल्यास वर्ष होऊन गेलें. आई मी दोन वर्षांचा असतांनाच गत झाली- तिच्यामागें बापानेंच मला वाढविलें.

श्री०—हल्लीं दुसरें कोण कोण आहे?

सट०—कोणी नाहीं. माझा मी एकटाच आहें.

श्री०—लग्न नाहीं केलं वाटतं?

सट०—जी नाहीं. माझ्या बापाचें सांगणें आहे कीं एकविसाव्या वर्षापर्यंत लग्न करूं नये. पण माझा इरादा मुळींच लग्न करण्याचा नाहीं.

श्री०—कां बरें ?

सट०—सरकार, हल्लीं मी फार सुखी आहें. आधींच माझी जात अमंगळ, मूढ, व क्रूर. त्यांतून आमच्या बायका ह्मटल्या ह्मणजे फारच गलिच्छ, घाणेऱ्या व अमंगळ. तरी तशी बायको करावयाची, मग तिला हा देह विकून टाकावयाचा, पोरें बाळें झालीं ह्मणजे त्यांचे काबाडकष्ट करून त्यांच्या सर्व प्रकारच्या काळज्या वहावयाच्या, आणि तीं दुखण्यानें पडलीं किंवा मेलीं ह्मणजे दुःख करीत बसावयाचें, यापेक्षां हल्लीं मी जे दिवस काढीत आहें, ते फारच सुखाचे आहेत, तशांतून सर्व गोष्टींनीं, माझ्या आवडीनुरूप अशी बायको आमच्या जातींत मिळण्याची आशाच नाहीं. मग त्याबद्दलची गोष्ट तरी कां मनांत आणावी ? व होऊन उपाधि कां लावून घ्यावी ?

श्री०—हें खरें, पण बायको असली म्हणजे घरच्या कामांस मदत असते; नाहींतर सर्व कामें एकट्या पुरुषासच करावीं लागतात.

सट०—घरचीं कामें तीं काय ? का जेवणखाण आहे? का कांहीं दळणकांडण आहे ? कांहीं नाहीं. माझ्या बापानें लहानपणापासून मला अशा कांहीं गोष्टी लावून दिल्या आहेत कीं, त्या जोंपर्यंत मी पाळीन, तोंपर्यंत मला कोणत्याच गोष्टीची दगदग करावी लागणार नाहीं.

श्री०—तर मग जेवणाखाण्याची नेहेमीची सोय दुस-ऱ्याकडे किती दिवस रहाणार ?

सट०—सरकार, मी मुळींच जेवीत नाहीं. तर दुस-ऱ्याकडे जेवण्यास जाण्याची गोष्ट कशाला ? लहानपणा-पासून गाईचें दूध व फळफळावळ यांवर मी आहें. त्या-शिवाय दुसरी कोणतीही वस्तु मला माझ्या बापानें खा-ऊं दिली नाहीं, व त्याच्यामागें मीही चाखिली नाहीं. पुढेंही खाण्यापिण्यासंबंधीं माझी कसलीच इच्छा नाहीं. माझा बाप जेवणखाण करीत असे.

श्री०—यावरून आजपर्यंतचें तुमचें आयुष्य एखाद्या तपस्व्याप्रमाणेंच गेलें आहे तर ?

सट०—सरकार, तपस्वी तो तपस्वी. त्याची माझी बरोबरी कशी होईल? पण ही गोष्ट खरी कीं, आजपर्यंतचें माझें आचरण कायावाचामनेंकरून सर्व गोष्टींनीं अगदीं शुद्ध आहे, असें मी ह्मणूं शकतों. पुढच्याबद्दल सांग-वत नाहीं. रात्रंदिवस परमेश्वरापाशीं माझें हें मागणें आहे कीं, अशा स्थितींतच माझा शेवट कर.

श्री०—मनुष्याच्या मनाला कांहीं व्यवसाय असल्या-शिवाय त्यास चैन पडत नसतें. मग तुह्मांला करमणूक कशाची असते ? वेळेस एकटें राहण्याचा मोठा शीण येत असेल !

सट०—नाहीं सरकार. प्रथम एकटेंच हिंडण्यांत मला मोठी मजा वाटत असे. पुढें माझ्या बापानें माझा वि-द्याभ्यास करविला. चांगलें वाचतां येऊं लागल्यावर

नानाप्रकारचीं पुस्तकें वाचण्यांत व एकटेंच बसून दुन-येंतील नानाप्रकृति, त्यांची स्थिति, त्यांच्या खटपटी, व त्यांचे परिणाम, यांवर विचार करण्याची मला मोठी करमणूक होऊं लागली. कांहीं वेळ माझे बरोबरीचे जात-वाले यांना लिहिण्यावाचण्यास शिकविण्यांत व त्यांस सदाचरणाची गोडी लावण्यांत जात असतो. बहुतेक मंडळी पुढें चांगली निघेल असें वाटतें. कारण एक दोन वेळां त्यांना मारेकऱ्यांचीं कामें आलीं होतीं, व दुष्ट लोकांनीं त्यांस मोठमोठ्या देणग्या देऊं केल्या होत्या. पण त्या गोष्टीचा त्यांना मोठा तिटकारा आला, व उंच वर्णांत असे दुष्ट लोक कसे असतात ह्मणून मजपाशीं ते आश्चर्य करूं लागले. इतकेंच नाहीं, तर आमच्या जातींत हें काम कोणींच करूं नये, ह्मणून ते सावध-गिरी ठेवितात. माझ्या सहवासानेंच या मंडळीला पापाची भीति वाटूं लागली.

श्री०—तुमचीही हकीकत ऐकून मोठें समाधान होतें. तुह्मी जरी नीच जातींत जन्मलां आहां, तरी फारच पु-ण्यशील आहांत. तुमच्या विरक्ततेचीही धन्य आहे. बरें, वेळ फार झाला, आतां मी जातों. कधींकधीं भेटत जा.

सट०—हें, काय सरकार ? जेव्हां हुकूम होईल तेव्हां पायांपाशीं मी हजरच आहें.

श्री०—तुह्माला हुकूम करणार आह्मी कोण ? पण एखाद्या दिवशीं तुमच्याशीं बोलावेंसें वाटलें, तर मी को-णी मनुष्य पाठवीन, तरी तुह्मी येत जावें.

श्री०—तर मग जेवणाखाण्याची नेहेमीची सोय दुसऱ्याकडे किती दिवस रहाणार?

सट०—सरकार, मी मुळींच जेवीत नाहीं. तर दुसऱ्याकडे जेवण्यास जाण्याची गोष्ट कशाला? लहानपणापासून गाईचें दूध व फळफळावळ यांवर मी आहें. त्याशिवाय दुसरी कोणतीही वस्तु मला माझ्या बापानें खाऊं दिली नाहीं, व त्याच्यामागें मीही चाखिली नाहीं. पुढेंही खाण्यापिण्यासंबंधीं माझी कसलीच इच्छा नाहीं. माझा बाप जेवणखाण करीत असे.

श्री०—यावरून आजपर्यंतचें तुमचें आयुष्य एखाद्या तपस्व्याप्रमाणेंच गेलें आहे तर?

सट०—सरकार, तपस्वी तो तपस्वी. त्याची माझी बरोबरी कशी होईल? पण ही गोष्ट खरी कीं, आजपर्यंतचें माझें आचरण कायावाचामनेंकरून सर्व गोष्टींनीं अगदीं शुद्ध आहे, असें मी ह्मणूं शकतों. पुढच्याबद्दल सांगवत नाहीं. रात्रंदिवस परमेश्वरापाशीं माझें हें मागणें आहे कीं, अशा स्थितींतच माझा शेवट कर.

श्री०—मनुष्याच्या मनाला कांहीं व्यवसाय असल्याशिवाय त्यास चैन पडत नसतें. मग तुह्मांला करमणूक कशाची असते? वेळेस एकटें राहण्याचा मोठा शीण येत असेल?

सट०—नाहीं सरकार. प्रथम एकटेंच हिंडण्यांत मला मोठी मजा वाटत असे. पुढें माझ्या बापानें माझा विद्याभ्यास करविला. चांगलें वाचतां येऊं लागल्यावर

नानाप्रकारचीं पुस्तकें वाचण्यांत व एकटेंच बसून दुनयेंतील नानाप्रकृति, त्यांची स्थिति, त्यांच्या खटपटी, व त्यांचे परिणाम, यांवर विचार करण्याची मला मोठी करमणूक होऊं लागली. कांहीं वेळ माझे बरोबरीचे जातवाले यांना लिहिण्यावाचण्यास शिकविण्यांत व त्यांस सदाचरणाची गोडी लावण्यांत जात असतो. बहुतेक मंडळी पुढें चांगली निघेल असें वाटतें. कारण एक दोन वेळां त्यांना मारेकऱ्यांचीं कामें आलीं होतीं, व दुष्ट लोकांनीं त्यांस मोठमोठ्या देणग्या देऊं केल्या होत्या. पण त्या गोष्टीचा त्यांना मोठा तिटकारा आला, व उंच वर्णांत असे दुष्ट लोक कसे असतात ह्मणून मजपाशीं ते आश्चर्य करूं लागले. इतकेंच नाहीं, तर आमच्या जातींत हें काम कोणींच करूं नये, ह्मणून ते सावधगिरी ठेवितात. माझ्या सहवासानेंच या मंडळीला पापाची भीति वाटूं लागली.

श्री०—तुमचीही हकीकत ऐकून मोठें समाधान होतें. तुह्मी जरी नीच जातींत जन्मलां आहां, तरी फारच पुण्यशील आहांत. तुमच्या विरक्ततेचीही धन्य आहे. बरें, वेळ फार झाला, आतां मी जातों. कधींकधीं भेटत जा.

सट०—हें काय सरकार? जेव्हां हुकूम होईल तेव्हां पायांपाशीं मी हजरच आहें.

श्री०—तुह्माला हुकूम करणार आह्मी कोण? पण एखाद्या दिवशीं तुमच्याशीं बोलावेंसें वाटलें, तर मी कोणी मनुष्य पाठवीन, तरी तुह्मी येत जावें.

सट०—सरकार, वाटेल तेव्हां हा तांबेदार हुजर आहे. आपण खरोखरीच फार थोर मनाचे, ह्मणून मज नीच जातीच्या माणसाजवळ दोन शब्द मोठ्या प्रेमानें बोललां. यावरून आपलीही योग्यता फार मोठी आहे. पण सरकार, आपण आलां, आणि आपलें आदरातिथ्य मजकडून कांहींच झालें नाहीं; याची मला मोठी दिलगिरी वाटते.

श्री०—छे, छे, तें कांहीं नको. मनुष्याच्या प्रेमापेक्षां कांहीं हें जास्त नाहीं. बरें मी आतां जातों. ( उठते सटवाजी उठून मुजरा करितो. श्रीमती जाते. मागें सटवाजी चार पावलें जातो व परत येतो. )

सट०—( उभ्यानें आपल्याशींच ) आजपर्यंत गांवांतील कोणीही वडा गृहस्थ मजकडे आला नाहीं, आणि आज हा सोळा सतरा वर्षांचा तरुण मुद्दाम कोण आला असावा बरें! कोणी मोठ्या घराण्यांतला आणि फारच भला मनुष्य आहे, यांत कांहीं संशय नाहीं. किती तेजःपुंज ! किती सुंदर! बोलणें किती मधुर! आणि लहान वयांतच सद्गुणांची इतकी आवड ! या सर्व गोष्टींनीं तो फारच मनोहर दिसतो. खरोखर असल्याशीं स्नेह झाला, तर त्याच्या सहवासानें काळ अति आनंदांत जाईल. आपल्या व त्याच्या ओळखीचा योग घडून आला, ही एक परमेश्वराची कृपाच समजावयाची. चला आतां आपल्या कामाला लागावें. ( जातो. )

## प्रवेश दुसरा.

**स्थळ:**—राजकन्येचा बाग.

(श्रीमती एकटी खुर्चीवर बसली आहे जवळ दोन खुर्च्या आहेत.)

**श्री०**—(आपल्याशींच) आज सटवाजींना मी आपला मनोदय तर सांगणार. त्यावर ते काय ह्मणतात ही काळजी आहे. पण माझं मन गेलं तें चांगल्यावरच गेलं, यांत कांहीं संशय नाहीं. इतकंच नाहीं, तर सर्व गोष्टींनीं ते मजपेक्षां अधिक योग्यतेचे आहेत. परंतु भिन्नजाती मुळें दोघांनीं एके ठिकाणीं राहून आनंदानें संसारसुख भोगण्याचा योग नाहीं. मर्जी परमेश्वराची. आतां त्यांची जी आज्ञा होईल ती मानणं मला भागच आहे, व त्याकरितां जीं जीं संकटं येतील त्यांना तयार झालंच पाहिजे, व मी तयारही आहें. परंतु तेही फार दूर-वर विचार करणारे आहेत. मीच होऊन जरी त्यांच्या-पायांशीं ज्ञात आहें, तरी ते बहुधा विचार टाकणार ना-हींत; व दोघांनाही हिताचा असाच मार्ग काढितील. त्यांनाही ऐहिक सुखापेक्षां सद्गुणांची फार आवड आहे. लौकिक राखण्याकरितां माझ्याप्रमाणेंच विरक्त राहण्या-चा त्यांचाही विचार झाला, तर मोठ्या समाधानाचेंच होईल. (थांबते.) जिजाबाई जाऊन बराच वेळ झाला, अजून कां बरं येत नाहींत? त्या आहेत तेव्हां येण्यास बहुधा हरकत येणार नाहीं. [जिजाबाई येते.] का जि-जाबाई, काय झालं?

**जिजा०**—त्यांना घेऊन आलें. त्यांना जरा उभे करून मी आपणांस सुचवावयास आलें.

श्री०—त्यांना इकडे घेऊन या. (उठते.)

सट०—[ स्वगत ] बाई, मला इकडे कोणीकडे घेऊन चालली!

जिजा०—आमच्या बाईसाहेबांना आपल्यापाशीं कांहीं बोलावयाचं आहे. या इकडे असे.

सट०—(येतो, विस्मयपूर्वक श्रीमतीकडे पाहतो. व मुजरा करून आपल्याशींच.) परवां भेटावयास आलेला इसम हीच स्त्री तर नसेल! कारण एक वेष खेरीज करून बाकी एकून एक गोष्टी मिळतात. पहावें. [ काय आहे तें. ]

श्री०—यावं. (आपल्या हातानें खुर्ची पुढें करिते.) बसावं.

सट०—(उभ्यानें) सरकार, [ हात जोडून ] खुर्चीवर बसण्याची माझी योग्यता नाहीं. ताबेदारास काय आज्ञा असेल ती सांगावी.

श्री०—बसणं झाल्याशिवाय मला कांहीच बोलतां येत नाहीं. तरी बसलंच पाहिजे. कांहीं संकोच धरूं नये. (सटवाजी स्तब्ध उभा राहतो) बसल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

सट०—सरकार, मी बसल्याप्रमाणेंच आहे. आपण मात्र बसावें.

श्री०—नाहीं. आपण आधीं बसावं, मग मी बसेन.

सट०—बरें, आपला आग्रहच आहे तर बसतों. (बसतो.) आतां आपण बसावें.

श्री०—(बसते.) जिजाबाई, तुह्मी कोणी आलं तर पहा. (जिजाबाई जाते.)

सदु०—( आपल्याशींच ) हा काय प्रकार आहे ! कांहीं समजत नाहीं.

श्री०—( उभी राहून व सदबाजीस हात जोडून ) महाराज, जरी आपला जन्म नीच जातीमध्यें आहे, तरी आपली योग्यता महान् योगीजनाच्याही पलीकडे आहे, हें मीं सांगावं असं नाहीं. तरी माझी थोडीशी विनंती आहे, ती ऐकण्याची दासीवर कृपा व्हावी. महाराज, क्षमा असावी. मीच परवां संध्याकाळीं पुरुषाचा वेष घेऊन आपली माहिती कळण्याच्या हेतूनें आलें होतें. मी येथील राजाची कन्या आहें. माझं नांव श्रीमती. महाराज, आपण सुज्ञ पुरुष जाणतांच कीं, सर्व प्राणीमात्राला बुद्धि देणारा परमेश्वर आहे व त्याच्या इच्छेप्रमाणें सर्व गोष्टी घडून येतात. जगामध्यें आमची नायकांची जात मूळचीच मूढ, अपवित्र, व परस्वाधीन, तेव्हां एका पातिव्रत्याशिवाय दुसऱ्या कशानेंही आमच्या देहाचं सार्थक होणं नाहीं. तरी, एकदां ज्या पुरुषावर मन जाईल, त्याशिवाय दुसरा पति करावयाचा नाहीं, व त्याच्याच सेवेकरितां देह अर्पण करावयाचा, असा माझा कृतनिश्चय होता. त्याप्रमाणें थोडे दिवसांपूर्वी नदीवर आपल्या दर्शनाचा योग आला, व त्याचवेळीं आपल्या चरणीं मी सर्वस्वी अर्पण झालेली आहें. परमेश्वराची मोठी कृपा कीं, ज्यांवरून मी आपला देह ओंवाळून टाकावा, अशाच पवित्र चरणीं मनानें धांव घेतली. तरी या अबलेची विनंती मान्य व्हावी, व समर्थांनीं या दासीचा

हेतु शेवटास न्यावा. कितीही अरिष्टें आलीं तरी माझं मन दोन जागीं होणं नाहीं, यावर मात्र लक्ष्य असावं.

सट०—( कांहीं वेळ आश्चर्यचकित मुद्रेनें स्तब्ध राहून ) मोठें आश्चर्य आहे!!! (०पुन्हां स्तब्ध राहतो.)

श्री०—( हात जोडून ) महाराज, आश्चर्य न वाटावं. ही श्रीमती नाशवंत व ऐहिक सुखाची भुकेली नसून सद्गुणांची व सत्कीर्तीची फार भुकेली आहे. आपण कोणत्याही गोष्टीची काळजी करूं नये. ज्यामुळें आपणांस खेद व पश्चाताप होईल अशी कोणतीही गोष्ट या दासीकडून होणार नाहीं, यावर विश्वास असावा.

सट०—राजकन्ये, तें सर्व खरें आहे. परंतु तूं कुलवंत राजकन्या, मी अपवित्र व नीच अशा चांडाल जातीचा एक यत्किंचित् मनुष्य, तेव्हां धर्म, शास्त्र, आणि लौकिक, यांनीं कधींही न होणारा असा तुझा व माझा विवाहसंबंध घडावा कसा हें एक,व दुसरें, असा संबंध बळेंच घडवून आणिला तर तुला आणि मला नाना प्रकारच्या काळज्या व महत्संकटें किती येतील, याचा कांहीं विचार केला आहेस काय? आणि पुन्हां तुझा हा संकल्प शेवट पर्यंत न चालून दुनयेंत दोघांचाही दुर्लौकिक होईल तो वेगळा. तरी तुजसारख्या महा चतुर राजकन्येकडून अशी दुर्घट प्रतिज्ञा कशी व्हावी, व झाली तरी ती अशा या रीतीनें शेवटास नेण्याची तुझी बुद्धि तशीच कशी रहावी, याचें मला मोठें आश्चर्य वाटतें.

श्री०—महाराज, सर्व दुःखें व अडचणी जे ऐहिक

सुखाच्या आशेनें बांधले आहेत, त्यांना आहेत. ज्यांना केवळ मानसिक गुणांचीच आवड आहे, त्यांना कसल्याही अडचणी व भीति, येत नसतात.

सट०—तूं माझी पत्नी होणार म्हणजे तुझा माझा जन्माचा संबंध राहणार हें खरेंना?

श्री०—होय महाराज.

सट०—मग या गोष्टीस अडथळे व संकटें येणार नाहींत हें कसें? आधीं असें असें होणार असें लोकांत कळतांच नानाप्रकारच्या संकटांना सुरुवात होणार. मग विवाह होऊन तो पुढें सुखावह होण्याचा प्रकारच वेगळा. तरी या तुझ्या विचारापासून तुला सुख तें काय होणार हें मला समजत नाहीं.

श्री०—महाराज, ही गोष्ट लोकांत फुटण्याचें कारणच नाहीं. आपण, मी, व जिजीबाई, अशा तिघांनाच काय ती माहीत असणार.

सट०—काय? विवाहासारखी गोष्ट तिघांशिवाय इतरांस कळणार नाहीं? असें कसें होईल; अशा कार्यांत तुझ्या पित्याचें अनुमोदन नको काय?

श्री०—महाराज, आतां त्या अनुमोदनाचें कारण नाहीं. जोंपर्यंत मी मनानें कोणालाच वरलें नव्हतें, तोंपर्यंत पित्याची मजवर सत्ता होती. आतां मी आपल्या वचनाशीं बांधलेली आहे.

सट०—तर काय पित्याच्या नकळत गुप्तरीतीनें तुझा व माझा पतिपत्नीचा संबंध राहणार? असें असेल तर

ही गोष्ट तुजसारख्या राजकन्येला फारच अनीतीची व लांछनाची आहे, आणि मज गरिबालाही मोठी अधमपणाची आहे. राजकन्ये, तुझी जात कोण, माझी जात कोण; याचा नीट विचार कर. भलतेंच मनांत आणूं नकोस. तूं फार विचारवंत आहेस.

श्री०—महाराज, जातपात या नाशवंत देहाला आहे. मनाला नाहीं. मनाचा श्रेष्ठपणा त्याच्या संस्कृतपणावर. त्याप्रमाणें आपण मजपेक्षां श्रेष्ठ आहांत; व या साधारण योग्यतेच्या दासीचा अंगीकार करणें आपणा समर्थाचा अधिकार आहे. जसं मी मनानें आपणांस पति केलं आहे, त्याप्रमाणें माझ्या विनंतीस आपण नुसतं अनुमोदन दिलंत, म्हणजे माझं सर्व कार्य झालं. मग मला दुसरी कोणतीही इच्छा नाहीं. यांत लोकांत तें काय कळणार? व संकटें तीं काय येणार! येणारीं सर्व संकटें देहादिक संबंधांच्या मागें आहेत. तशा सर्व गोष्टी आपण सोडून दिल्या; म्हणजे कोणत्याही गोष्टीची भीति राहिली नाहीं.

सद०—म्हणजे मनानें आपण पतिपत्नी होणार व देहानें दोघेंही अगदीं शुद्ध राहणार असें!

श्री०—होय महाराज. परमेश्वरानें आपणा उभयतांना दिलेल्या स्थितीमध्यें हाच मार्ग उचित आहे. तरी माझ्या विनंतीचा अव्हेर होऊं नये. आपल्या कोणत्याही पारमार्थिक हेतूला व असलेल्या सुखाला मी आड येणार नाहीं.

सट०—पण हें तुझें व्रत जन्मपर्यंत चालेल? मनुष्य आहे, मनोविकार आहेत, कालमानानें आप्त, सोयरेधायरे इत्यादिकांच्या आग्रहावरून मन फिरणें स्वाभाविक आहे; तशांतून तुझा पिता राजा असून त्याची तूं एकुलती एक कन्या आहेस. अशा स्थितींत तुझा विवाह झाल्याशिवाय कसा राहील! तरी सद्गुणी राजकन्ये, या सर्व गोष्टी समजून उमजून आपले उद्गार बाहेर काढावेत, दुसऱ्याचेही काढून घ्यावेत, पुढें ते व्यर्थ व्हावेत, आणि शेवटीं दोघांनींही वचनभ्रष्ट व्हावें, यांत अर्थ तो काय?

श्री०—( हात जोडून ) महाराज, याबद्दल मी तोंडानें काय सांगावं? अनुभव घ्यावा. दुनयेंतील एकंदर स्त्रियां प्रमाणें मला समजूं नये. संसारसुखाच्या ज्या गोष्टींकरितां सर्व स्त्रिया रात्रंदिवस फार इच्छा करितात, परंतु त्या त्यांस मिळत नाहींत, त्या सर्व गोष्टी परमेश्वरानें मला परिपूर्ण दिल्या आहेत, आणि त्या सर्व मोठ्या आनंदानें सत्वाकरितां मीच होऊन सोडून देत आहें. त्यांत ज्यास्त, आपणांसारख्या समर्थांच्या केवळ एकवार दर्शनानेंच जगांतील सर्व गोष्टींची माझी तृप्ति होऊन गेली आहे, व मन अगदीं निष्काम झालं आहे. तरी आतां मन फिरेल ही कल्पनाच आणूं नये. आपण हें माझं मागणं न दिल्यास माझा सर्व जन्म दुःखांत जाणार आहे. या जन्मीं दुसरा पुरुष पति व्हावयाचा नाहीं ही गोष्ट तर निर्विवादच, परंतु मी कोणाची पत्नी झालें

नाहीं, पातिव्रत्याला अनधिकारी राहिलें, या गोष्टी रात्रंदिवस मनाला तळमळ लावणार आहेत, व या दुःखांत झुरतां झुरतां मरण येऊन माझी आशा रहाणार आहे. आणि माझी विनंती मान्य केल्याबद्दलचा आपला शब्द मिळाल्याशिवाय मी आपली पत्नी होऊं शकत नाहीं. तरी तोंडच्या केवळ शब्दांकरितां शरण आलेल्या अनाथ अबला दासीला तळमळत ठेवून तिचा अंत करावा, हें आपणा दयाळू, कोमल अंतःकरणाच्या महापुरुषांना उचित होणार नाहीं. जास्त काय सांगावें?

सट०—( विचार करीत स्तब्ध राहून नंतर ) श्रीमती, असें जर आहे तर मी तुला पत्नी केली. पण तुला सांगतों ऐक, या जन्मीं हा वेळपर्यंत माझ्या मुखांतून कोणत्याही निमित्यानें असत्य भाषण निघालेलें नाहीं, व पुढें निघणार नाहीं. ऐहिक सर्व सुखांवर पाणी सोडून तूं मला पति केलेंस व मी तुला पत्नी केली. तरी तूंही वैराग्यांत ईश्वरआराधना करावीस व मीही करावी. तेव्हां तुझ्या माझ्या भेटीचें अतःपर कारण आहे असें नाहीं. त्यामुळें हें वर्तमान बहुधा कोणाला कळणार नाहीं, व न कळेल तितकें चांगलेंच आहे. परंतु दैववशात् कळलेंच व कोणी विचारिलें, तर मी खोटें बोलणार नाहीं, व माझ्या पत्नीनेंही खोटें बोलतां कामा नये. मला स्वताला प्राणाची सुद्धां अपेक्षा नाहीं.

श्री०—मीही प्राणाचीसुद्धां आशा ठेवणार नाहीं, व असत्य भाषण करणार नाहीं.

सट०—श्रीमती, पुन्हां सांगतों, तुझ्या पित्याच्या आज्ञेशिवाय तुझामाझा स्पर्श होणार नाहीं.

श्री०—पण माझं एक मागणं आहे.

सट०—कोणतें?

श्री०—आपल्या चरणीं मस्तक ठेवण्याची मात्र आज्ञा असावी.

सट०—श्रीमती, ही गोष्ट आपणांस करितां येत नाहीं. धर्मशास्त्रानें तुला माझ्या नातीचा स्पर्श होतां कामा नये. झाल्यास सचेल स्नान केलें पाहिजे, व आपणाला धर्माच्या आज्ञा मोडावयाच्या नाहींत. आणि यतीचा स्पर्श झाला ह्मणून तूं स्नान करावेंस हेंही चांगलें नाहीं.

श्री—प्राणनाथ, निदान कधींतरी एकदां या चरणांवर मस्तक ठेवण्याची आज्ञा असावी.

सट०—बरें, तुझ्या इच्छेप्रमाणें कधींतरी एकदां चरणांला स्पर्श करण्याची तुला मोकळीक आहे. दुसरें, माझ्या आज्ञेशिवाय तूं माझ्या घरीं येऊं नयेस. तसेंच कांहीं कारण लागल्यास मी तुजकडे येईन. जिनाबाईस पाहिजे असल्यास प्रसंगीं पाठवीत जा.

श्री०—जशी अपली आज्ञा त्याप्रमाणें मी वागेन. पण आठवड्यांतून एकदां तरीं दर्शन मिळावं.

सट०—दर शुक्रवारीं सायंकाळीं मी नदीवर येत जाईन. त्यावेळीं तूंही श्रीमहालक्ष्मीच्या दर्शनास यावेंस. तेव्हां मी दुरून भेटेन.

श्री०—कधीं कधीं फराळाच्या जिनसा पाठविल्या तर स्वीकार होईल का?

सट०—श्रीमती, हें मात्र करूं नकोस. ह्या जिभेस नानाप्रकारच्या चटी लावण्यांत कांहीं अर्थ नाहीं. दूध व हीं माझीं साधीं स्वच्छ वस्त्रें हीं मला सर्वांत जास्त आहेत. मला दुसरी कशाची इच्छा नाहीं, व तूं पाठवूं नकोस.

श्री०—प्राणनाथ, आजचा मोठा सुदिन आहे. आज आपला व माझा जन्माचा संबंध घडून आला आहे. तरी यानिमित्य कांहीं गोड सेवन केलें पाहिजे. आज्ञा झाल्यास थोडं दूधसाखर आणवितें.

सट०—श्रीमती, तूं एकेक जास्त काढूं नकोस व मला मोहपाशांत पाडूं नकोस.

श्री०—मोहपाशाचा बंदोबस्त आपल्या आज्ञांनींच झालेला आहे, तरी त्यांना अनुसरून प्रसंगीं जें उचित तें झालं ह्मणजे बरं.

सट०—बरें तर एक मला, एक तुला, व एक जिजाबाईला असे तीन प्याले आणीव.

श्री०—( उठून जाऊन आणण्यास सांगते व परत येते. ) प्राणनाथ, आणखी एक माझी इच्छा आहे.

सट०—कोणती? पण श्रीमती, आतां मात्र तुला बसलें पाहिजे.

श्री०—( खुर्चीवर बसून ) प्राणनाथ, आपल्या गुणांवरून व योग्यतेवरून आपणांला सत्वशीलमहाराज हें नांव फार चांगलं शोभतें, व मला तें फार आवडतं.

सट०—कोणतेंही नांव असलें तरी मी आहें तो तोच आहें. इतक्यानेंच जर तुला बरें वाटत असेल तर तसें नांव समज. ( जिजाबाई साखर घातलेलें दूध व प्याले घेऊन येते व श्रीमती पुढें ठेविते. )

श्री०—जिजाबाई, पाण्याचा तांब्या घेऊन या. ( जिजाबाई जाते. श्रीमती दूधसाखरेचे तीन प्याले भरिते. )

सट०—श्रीमती, दिसण्यांत उदासीनता दाखवून जवळच्या माणसांस काळजी लावणें चांगलें नाहीं, इतक्याकरितां वस्त्रप्रावर्ण वगैरे सर्व गोष्टी नेहमीप्रमाणेंच ठेव, व एक लग्नाच्या गोष्टीशिवाय आईबापांचें मन कोणत्याही प्रकारें दुखवूं नकोस.

श्री०—जशी आपली आज्ञा, ( जिजाबाई येते तीस ) जिजाबाई, इकडे या अशा. तांब्या खालीं ठेवा, आणि ( खुर्चीस हात लावून ) इथें बसा.

जिजा०—बाईसाहेब, माझी बटकीची अशी योग्यता नाहीं. पाहिजे तर मी खालीं बसतें.

सट०—नाहीं, नाहीं.—खुर्चीवरच बसलें पाहिजे ह्मणजे आह्मांला बरें वाटेल. आह्मांला तुह्मी वडील मनुष्य आहांत, तुह्मी न ऐकाल तर आह्मांलाही खालीं बसावें लागेल.

श्री०—( उठून व जिजाबाईचा हात धरून ) जिजाबाई, बसाना पण. (हंसत) आज दोहींकडल्या मानकरिणी तुह्मीच आहांत. ( जिजाबाई बसते. श्रीमती प्याला हातीं घेऊन ) जिजाबाई, हें घ्या. आज आमचें सुख दुधांत साखर घातल्याप्रमाणें अधिक गोड झालें आहे, तरी या निमित्य

तुह्मी हें घ्या. नाहीं ह्मणूं नका. (जिजाबाई घेते व प्राशन करिते. श्रीमती नंतर सटवाजीस देते. सटवाजी घेतो व प्राशन करितो.)

सट०—श्रीमती, आतां तूंही घे.

श्री०—(प्राशन करिते. सटवाजीच्या पेल्यांत पाणी घालते, तो धुतो व ठेवितो. नंतर श्रीमती हात जोडून उभी राहते) प्राणनाथ, आतां दुसरं कांहीं मागत नाहीं, पण मी दिलेला हा प्याला मात्र आपण आपल्याजवळ ठेवावा, व यानेंच नेहमीं दूध प्राशन करावं. पतीच्या घरीं पत्नीकडून आलेली कांहींतरी वस्तु पाहिजेच. व मलाही आपणांकडून कांहींतरी वस्तु मिळाली पाहिजे. तरी घरीं आपल्या पादुका आहेत, त्या मला मिळाव्या. त्या मला पुजा करण्याकरितां पाहिजेत. यांत मी कांहीं विशेष मागत नाहीं.

सट०—श्रीमती, तुझ्या इच्छेप्रमाणें हेंही ऐकतों. आतां झालें? परवानगी आहे?

श्री०—(गहिंवरून हलक्या स्वरानें) प्राणनाथ, परवानगी मी अबला कोण देणार? आपण समर्थांनीं माझा अंगीकार केला, व त्रैलोक्यांत धन्य होण्यास मला अधिकारी केलं, यानं माझं अंतःकरण आनंदाच्या लहरींनीं में कांहीं सद्गदित होऊन गेलं आहे, तें माझ्यानं सांगतां येत नाहीं. ज्या सर्वगुणसंपन्न मूर्तीवरून मजसारख्या अनेक स्त्रियांचे देह ओंवाळून टाकावेत, अशांच्या पवित्र चरणांचा नेहेमीचा आश्रय मिळाला, याहून आणखी तें काय पाहिजे? (नमस्कार करिते.)

सट०—श्रीमती, तूंही अलौकिक योग्यतेची स्त्री आहेस यांत संशय नाहीं. माझा जन्म जरी मांग जातींत आहे, तरी मी खरोखर जितेंद्रिय आहें. पण तूंही तशाच प्रकारची महासाध्वी आहेस, ह्मणूनच तुला माझा शब्द मिळाला. यावरून तुझीही महत् योग्यता दिसून येते. बरें, मी आतां येतों. ( जिजाबाईस ) जिजाबाई, मज लेंकरावर लोभ असूं द्यावा. आपण खरोखरी कुलीन व थोर मनाच्या आहांत ह्मणून श्रीमती तुमच्यावर विशेष प्रेम करिते. तुह्मी फार योग्य आहांत. जशी आपल्याला श्रीमती, तसाच मीही आहें.

जिजा०—महाराज, आपली कृपा इतकंच. बाकी मी कांहीं तशी नाहीं. आपणां उभयतांकडे पाहिलं, ह्मणजे माझ्या मनाला जें कांहीं वाटतं, तें देव जाणतो. मीही अमळशानें पादुका आणावयास येतें.

सट०—बरें या. मी जातों तर आतां. ( त्याला घेऊन जातो. दोघी त्यांत पंचविण्यांत जातात. )

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळ:**—बाळासाहेबाचा दिवाणखाना.

[ बाळासाहेब लोडाशीं टेंकून ऐटींत बसला आहे, हातांत पुस्तक आहे. जवळ दामाजी हुजऱ्या उभा आहे. ]

बाळा०—[ पाय पसरून पुस्तकाचीं पानें उलटतो, व मधून मधून नाक मुरडतो. ] काय खराब पुस्तक! वाचण्यासारखें कांहींच नाहीं. दोन ओळी वाचल्या कीं, डोकें दुखा-

मला लागतं. (पुस्तक टाकतो, दुसऱ्या उचलण्यास जातो.) गाढवा, (बोट दाखवून) आधीं तें तांबडें पुस्तक आण.

दामा०—सरकार कोणतें? तांबडीं पुष्कळ आहेत.

बाळा०—विचारतोस काय मूर्खा? खुणेनें दाखविलेलें इतकें समजत नाहीं? तें वरचें फार मोठें आहे तें आण. शिचे सगळेच कसे अगदीं दगड!? एकसुद्धां मनासारखा नाहीं. (दामाजी पुस्तक आणून हातांत द्यावयास जातो. बाळासाहेब रागानें) हरामखोरा, खालीं ठेव. चालला धन्याच्या हाताला हात लावायला. (तो खालीं ठेवितो. बाळासाहेब पुस्तक घेऊन चार ओळी वाचितो व पानें उलटूं लागतो. दामाजी तोंडावर हात देऊन तिरस्कारयुक्त मान हालवितो. तिकडे नजर जाऊन रागानें) काय खातोस रे माझ्या समोर?

दामा०—सरकार, कांहीं नाहीं.

बाळा०—चोरा, तोंडाजवळ हात नव्हता नेलास? आणि नाहीं ह्मणतोस?

दामा०—सरकार, खाजवीत होतों.

बाळा०—टोणगा कुठला. शंखाला खाजविण्याची सुद्धां अक्कल नाहीं. बैला, दरबारच्या रीतिभाती तुला येणार तरी कधीं? (पानें उलटतो व नाकडोळे मुरडतो.) पैसे खर्चून पुस्तकें सुद्धां चांगलीं मिळत नाहींत. शेकडों ग्रंथ आहेत, पण एक सुद्धां शेवटपर्यंत वाचण्यासारखा नाहीं. ठेवरे हें. (खालीं टाकितो. दामाजी नेऊन ठेवितो.) आरसा आणरे. (दामाजी आणितो व पुढें धरून उभा राहतो. बाळासाहेब आरशांत नीट रोखून पहातो.) कायरे दाम्या, मा-

झ्या गोऱ्या तोंडाला कोणत्या रंगाचें पागोटें खुलतें? लाल नाहीं?

दामा०--सरकार, गोऱ्या बायकोला काळा शालू छानदार खुलतो, तसें आपल्या गोऱ्या तोंडाला काळें छान खुलेल.

बाळा०--गाढवाच्या टेंकाला चव असेल तर नाही बैला, माणूस कशाला झालास? (आरशांत पहातो.) कारे, वसंतमाधवापेक्षां रूपानें मी चांगला आहें, नाहीं?

दामा०--सरकार, रूपवीपं मला कांहीं समजत नाहीं.

बाळा०--रूप नाहीं समजत तर बायको कशी पाहून करशील? शिरोमणी कुठचा. (विडे खातो, आरशांत पहातो) कारे, सगळे मला भितात किंवा नाहीं?

दामा०--हें काय सरकार? वाड्यांतील एकूनएक मनुष्य आपल्या एका डरकणी बरोबर--

बाळा०--(एकदम संतापानें बसला राहून अवसानानें) गध्ध्या, मी बैल आहे रे तर डरकणी ह्मणतोस? शद्बा-बरोबर ह्मण.

दामा०--सरकार, आपला शद्ब हळू निघतो, त्याला कोणीं इतकें भीत नाहीं, पण ओरडलांत कीं, सगळे अगदीं भेदरून जातात. मग आपलेजवळ यायला सर्व घाबरतात. मी मात्र आपल्या जवळ येतों.

बाळा०--पाजी हरामखोर. मादरचोदा, तूं कोण माझा काकोबा तर मला भीत नाहींस? बोल, आजपासून मला घाबरशील कीं नाहीं?

**दामा०**—( हात जोडून ) सरकार, तसा मी आपल्याला रोज भितों. सकाळ पासून आपली स्वारी निजायला जाईपर्यंत रोज मोठी धास्ती असते.

**बाळा०**—दरोडखोरा, मग धास्तीनें रोड कसा नाहीं झालास? चांगला बोकयासारखा तर दिसतोस. बोकड कोठचा. (दामाजी बोलत नाहीं.) बोल बोल लवकर.

**दामा०**—तें आतां अगदीं अंगवळणीं पडलें आहे. ( हात जोडून ) सरकार, आतां मला फार भीति वाटते.

**बाळा०**—असें. चोरा दमधर. तुला माझा दरारा दाखवितों. चाबुकाशीं गांट ठेविली पाहिजे. (विडा खातो. रागानें ) उभा कसा राहिला आहेस ? नीट हातपाय जोडून उभा रहा. (दामाजी तसें करितो. दुसरा चाकर येतो. )

**दु० चा०**—( मुजरा करून ) सरकार, बाळशास्त्री आले आहेत, भेटायचें ह्मणतात.

**बाळा०**—मग ? त्यांना येऊं दे. चल नीघ. ( चाकर जातो. शास्त्री येतो. )

**शास्त्री**—( मुजरा करून ) आशीर्वाद. (बाळासाहेब उठतो.) प्रकृति ठीक आहेना ? जेआहेत्त आपण सुखरूप असावें. हीच आमची रात्रंदिवस इच्छा.

**बाळा०**—शास्त्रीबुवा, या, बसा. ( हंसत ) आज अवचित् कसे आलां ? ( बसतात. )

**शा०**—आज तुह्मांला एक आनंदाची गोष्ट कळवायची आहे ह्मणून जेआहेत्त आलों. तुमच्याकरितां आह्मी आपल्याकडून किती परिश्रम करितों, पण तुमच्या

कोठचें तें धर्मानांत यायला? ( दामाजीस ) अरे, तूं जरा दूर हो जेआहेत्ते. ( दामाजी जातो. )

**बाळा०**--शास्त्रीबुवा, मी तशांपैकीं नव्हे.

**शा०**--( हंसत ) बाळासाहेब, तुमच्याबद्दल जेआहेत्ते माझी पूर्ण खात्री आहे. आजकाल आह्मांसारख्यांचा आदरसत्कार करायला आपल्याचयेथें चांगला होतो. बाकी हल्लीं चोहोंकडे कलीची छाया पडली आहे. तो वसंतमाधव प्रधान व नवीन न्यायाधीश आला आहे तो, हे अगदीं कुचकामाचे जेआहेत्ते. धड बोलत सुद्धां नाहींत. ह्मणे सरकारी काम आहे. पण मागें नाहींत का कोणीं सरकारी कामें केलीं? महाराज साहेबही त्यांच्याच नादीं लागले आहेत. या वसंतमाधवाच्या हातीं अधिकार आल्यापासून तर माझें फारच नुकसान झालें आहे. गुलामांना जेआहेत्ते श्रद्धाच कमती. संपत्ति आहे तो चांगली भोगावी हेंही या हतभाग्यांचे नशिबीं नाहीं.

**बाळा०**--आणि हे लोक बुद्धीचे जडच खरे. ह्मणूनच त्यांच्यानें अशी हमालासारखी मेहनत होते. खराखरा बुद्धिवान आहे त्यानें जरा जास्त वाचलें कीं, त्याची प्रकृतिच बिघडते. आपल्याच्यानें नाहीं बुवा फार उरस्फोड होत.

**शा०**--बाळासाहेब, तुह्मी गर्भश्रीमंत भाग्यशाली कोणीकडे? आणि जेआहेत्ते हे भारवाही कोणीकडे? बेटे सर्वकांहीं असून दरिद्री.

बाळा०— आणखी, यांना खरेंखरें व्यवहारज्ञान मुळींच नसतें शास्त्रीबुवा.

शा०—[ तर्जनी करून ] हो, खरेंच. बाळासाहेब, तुम्ही बुवा फार सूक्ष्म नजर चालवितां. तुम्ही ह्मणतां तसाच जें-आहेत्ते मलाही अनुभव आला आहे. यांजकडे एखादें कांहीं असलें ह्मणजे हे बेटे मुळींच तिकडे पाहत नाहींत व पाहूं लागले, तर अगदीं गडबडून जातात. मग ध्यावयाची जेआहेत्ते वेंठ उरकून. तर लग्नसमारंभा-सारखीं महत्कृत्यें यांच्यानें बिनबोभाट कशीं होणार हें दिसतच आहे. अहो, यांची अक्कल कागदामध्येंच..

बाळा०—तर हे पशू राज्याचीं कामें कशीं करीत असतील? आपल्याकडे कांहीं असलें ह्मणजे शास्त्रीबुवा, मी आळशाप्रमाणें मुळींच बसून रहात नाहीं. चोहोंकडे मी स्वतः नजर ठेवितों. सारा दिवस इकडून तिकडे व तिकडून इकडे अशी एकसारखी दगदग करावी लागते. बोलून बोलून तर कधींकधीं घसाही बसतो. पण शास्त्रीबुवा, सर्व कसें अगदीं जिथल्यातेथें होतें. दुस-ऱ्यावर अवलंबून आणि हातांत पुस्तक धरून अशीं कोठें कामें होतात?

शा०—वः, तुमची गोष्ट कोणीकडे बाळासाहेब? जें-आहेत्ते तुमचेकडील प्रत्येक कृत्य चांगलेंच व्हावयाचें. ( हंसत ) बाळासाहेब, अहो याच गोष्टी ध्यानांत आणून मी एका मोठ्या उद्योगास लागलों होतों, परंतु काम झाल्याशिवाय कळविणें चांगलें नाहीं ह्मणून जेआहेत्ते

तुह्मांला पूर्वी कळविलें नव्हतें. अगोदर न सांगतां जो काम करील तोच खरा. बाळासाहेब, काम पण कामच. या शास्त्रीबुवाचे जन्मपर्यंत महत्‌उपकार मानिले पाहिजेत बरें.

बाळा०—असें काय आहे? सांगा पाहूं.

शा०—श्रीमती तुह्मांला द्यावयाचें ठरवून टाकिलें जे-आहेत्ते. मामासाहेब व मामीसाहेब यांचा विचार पक्का झाला. कार्यही बहुधा यंदाच होणार. पण, मग या शास्त्रीबुवाला विसरूं नका बरें. मामासाहेबांच्या मागें तुह्मीच महाराजसाहेब होणार जेआहेत्ते.

बाळा०—फारच उत्तम केलेंत. शास्त्रीबुवा, अगदीं माझ्या मनांत होतें तें झालें. आतां मी दाखवितों एके-काला. हें पहा, लग्न होऊन मला राज्याचा अधि-कार मिळूं द्या कीं खोडच मोडितों सर्वांची. मामासाहेब आहेत तोंपर्यंत बोलतां येत नाहीं.

शा०—जेआहेत्ते वेळ तर येऊं द्या, मग पाहूं. पण आम्हांला विसराल बरें.

बाळा०—छे, छे असें कसें होईल? तुह्माला विचार-ल्याशिवाय मी कांहीं एक करणार नाहीं. शास्त्रीबुवा, तुमचा विचार घेतल्याशिवाय राज्य चालवीन इतका का मी मूर्ख आहें? [ मोठ्यानें ] कोण आहेरे? [ दामाजी हात जोडून येतो त्यास ] जारे जामदारखान्यांतून पंचवीस मोहोरा घेऊन ये. ( दामाजी जातो. ) हें पहा, आधीं या वसंतमाधवाची जाहागीर जप्त करून त्यास हद्दपार केला पाहिजे. तो औरस मुलगा नाहीं. कोठला

विकत आणिलेला आहे. मूळचे हे दरिद्री व कंगाल असतात, कसली रुचि नसते, ह्मणून एकसारखी घोकपट्टी करितात, आणि मग त्या घोकपट्टीच्या जोरावर आह्मा गर्भश्रीमंतांचा ठेवावा तसा मान ठेवीत नाहींत, व आह्माला वचकत नाहींत. त्यांचें पाहून सगळेच तसें करूं लागतात. तरीं राज्यांतलें हें रोगाचें मूळ अगदीं काढून टाकिलें पाहिजे, राज्यांत पोपटी विद्या फार झाली ह्मणजे मर्यादा, मर्जीसंपादन वगैरे चांगल्या गोष्टींचा ऱ्हास होतो, व त्याच्या जागीं तकरार, बेपर्वाई व पूर्वापार चालत आलेल्या जुन्या रीतिभातींविषयीं अनास्था, हीं येतात. हें कामाचें नाहीं,

शा०—जेआहेत्त वेळ तर येऊं द्या, ह्मणजे मी पहा कसें राज्य ठेवितों तें. आपण आमचें ऐकिलें मात्र पाहिजे. मगदूर आहे कोणी स्वच्छंदपणें व मर्यादा सोडून चालेल? लागलेच गुलामाला कडक शासन मिळेल जेआहेत्त.

(हुजुऱ्या येतो व मोहोरांची पिशवी बाळासाहेबापुढें ठेवून जातो.)

बाळा०—[ पिशवी घेऊन ] शास्त्रीबुवा, आनंदाच्या खबरेबद्दल ध्या हें इनाम. हें पहा, हें कांहींच नाहीं बरें.

शा०—( दोन हातांनीं घेऊन ) बाळासाहेब, याचें काय कारण आहे जेआहेत्त? अशानें बुवा माझें मस्तक अगदीं फिरून जातें. मी इतकें केलें तें याकरितां का? तुमच्यापेक्षां आम्हाला काय अधिक आहे? आपलें कार्य झालें म्हणजे जेआहेत्त आम्हाला आनंद. पण करावें काय? आपला स्वभाव पडला कडक, ह्मणून भीति

वाटते. नाहीं म्हटलें तर वेळेस नामर्जी व्हावयाची. ह्मणून जेआहेत्ते घ्यावें लागतें.

बाळा०—हें तर खरेंच. मी इनाम दिलें आणि तुम्ही तें न घेतां, तर मला मोठा राग आला असता खरा.

शा०—पण बाळासाहेब, आम्ही कां असें करूं? अहो, असा उदार पुरुष कोटीमध्यें सुद्धां विरळा, आणि त्याचें मन मोडावयाचें? मग कशाला जन्मास आलों आहोंत जेआहेत्ते? शिव, शिव, परमात्मा नारायण तुह्माला सुखरूप ठेवो आणि तुह्मी राजे लोकांनीं असाच जेआहेत्ते आमचा प्रतिपाळ करावा.

बाळा०—या श्रीमतीला शहाणपणाचा फार डौल आहे, व नेहमीं माझा पाणउतारा करिते. पण आतां बरी मस्ती जिरली. शास्त्रीबुवा, मजा काय आहे कीं, बायकांची जात पडली ढोरांची. त्यांना एकदां ज्या कामाला जुपावें, तेंच त्या करीत बसतात. कंटाळाच येत नाहीं. आह्मी पुरुष थोडेच आहोंत त्यांच्या सारखीं ढोरें तर सारादिवस डोकेफोड करीत बसूं? आम्हाला वाटेल तोंपर्यंत आह्मी अभ्यास करणार. यामुळें झालें काय कीं, श्रीमतीनें आपली ती पोपटी विद्या वाढविली आणि वेहिय्या मात्र झाली आम्ही वाढविली नाहीं ह्मणून ती आम्हांला मूर्ख समजते. आजपर्यंत उपायच नव्हता. मी पडलों सरदार, तर ती पडली राजाची मुलगी व पुढली राणी, ह्मणून मुकाट्यानें सर्व ऐकून घ्यावें लागत होतें. पण घे आतां. गाढवे, पुरुष

तो पुरुष. तू राणी तर मी राणीचा नवरा. तूं मोठी शहाणी पण माझ्या मुखांचा तर पायपोस; बायकोच्या जातीला फार फुशारकी असलेली देवाला सहन होत नाहीं. आतां पहा माझी कदर कशी आहे ती. एकदां लग्न होऊं दे, ह्मणजे डौलानें हंसत हंसत व ठुमकत ठुमकत माझ्यापुढें आलीस कीं, कमरेंत लाथ बसलीच; किंवा जरा जास्त बोललीस कीं, पाठीवर चाबूक ओढिलाच, असें समज. ( शास्त्रीबुवास ) कांहो, नवरा ह्मटला ह्मणजे स्त्रियांचें आदिदैवत; त्याच्या मर्जीकरितां वेळेस त्यांनीं प्राणसुद्धां खर्च केला पाहिजे, मग माराची ती कथा काय. खरेंना?

शा०—वः, हें काय विचारावें? स्त्रियांना पतीपेक्षां अधिक असें जेआहेत्ते त्रिभुवनांतही कांहीं नाहीं. बरें, आतां मी आज्ञा घेतों. देवदर्शनास जाण्याची वेळ झाली. ( बाळासाहेब विडे देतो.)

बाळा०—तयारीला सुरवात कधीं पासून होणार?

शा०—त्याबद्दल जेआहेत्ते अजून विचार होणें आहे. फक्त निश्चित झालें, आतां पुढचा विचार ठरला तो मी कळवीनच. आपण जेआहेत्ते निर्धास्त असावें. ( उठतो. मुजरा करून जातो. बाळासाहेब पोंचविण्यास जातो. )

---

## प्रवेश चवथा.

स्थळः—श्रीमतीचा महाल.

( श्रीमती व जिजाबाई बसल्या आहेत. )

श्रीमती—जिजाबाई, बाबांनीं किती केलं तरी माझा

रुकार मिळणार नाहीं; आणि मी हो म्हटल्याशिवाय ते तयारीला लागणार नाहींत. माझा स्वभाव त्यांना माहीत आहे. तयारी करून मग पस्ताव्यांत पडणारे बाबा नाहींत.

जिजा०—बाईसाहेब, आपण जेव्हां ह्मणालांत कीं, मला लग्न करायचं नाहीं, तेव्हां आईसाहेबांना तर फारच वाईट वाटलें. मला त्या मागाहून विचारीत होत्या आपल्या मनांत तरी काय आहे ह्मणून. त्यांच्या समजुतीकरितां मी खोटें बोललें व सांगितलें कीं, मला माहीत नाहीं. पण जेव्हां मी त्यांना सांगितलें कीं, वर्ष दोन वर्षं धीर धरा, मनाजोगा पति आढळला ह्मणजे त्या होऊनच हो ह्मणतील, तेव्हां त्यांना अंमळ धीर आला.

श्री०—तें बरं केलंत. तुह्मी असंच सांगत जा. मला याबद्दल एक अक्षरसुद्धां तोंडांतून काढितां येत नाहीं. कारण, बोलण्याशीं गांठ पडली आणि कोणी खोदखोदून विचारूं लागलं, तर खरं सांगावं लागेल, आणि त्यांची आज्ञा तर मोडावयाची नाहीं. इतक्याकरितां मौन्य धरावं हें चांगलं.

जिजा०—बाईसाहेब, मला मोठी काळजी आहे. माझं मन जाणतं मला पुढं काय काय दिसतं तें.

श्री०—जिजाबाई, काळजी करूं नका. सत्व राखण्याकरितां रात्रंदिवस जर मी शुद्धमनानें देवाचा धांवा करितें आहें, तर तो माझं गाऱ्हाणं ऐकेलच, व माझी

आणि त्यांची विटंबना करणार नाहीं. लौकरच देवानं मला या दुनयेंतून सोडविलं, ह्मणजे सर्वत्र बाजार आटो-पला. मग मी देवापाशीं जाऊन माझ्या आईबापांना दुसरं अपत्य देण्याबद्दल प्रार्थना करीन. जिजाबाई, देव त्यांना दुःखांत ठेवणार नाहीं.

**शा०**--( पडद्यांत ) जिजाबाई, ताईसाहेब आहेत का ?

**जिजा०**—कोण ? गुरुमहाराज ? यावं. बाईसाहेब बसल्या आहेत. ( शास्त्री येतो. दोघी उठतात व नमस्कार करितात. )

**शा०**—( श्रीमतीस ) अष्टपुत्रा सौभाग्यवती भव.

**श्री०**—शास्त्रीबुवा, बसावं. ( शास्त्री बसतो. श्रीमती बसते. )

**शा०**—कां ताईसाहेब, काय चाललें आहे ?

**श्री०**—कांहीं नाहीं. जिजाबाईबरोबर सहज बोलत बसलें होतें.

**शा०**—कां ? आह्मांला लग्नाचे लाडू मिळणार ना ? ताईसाहेबांचें लग्न, मग काय कमी ? जेआहेत्ते न कधीं झालं, व न पुढें होणार, असा मोठ्या थाटामाटाचा समारंभ होईल. खरें नां ? ( श्रीमती बोलत नाहीं. ) कां ताईसाहेब, बोलत कां नाहीं ?

**श्री०**—बोलायचं काय शास्त्रीबुवा !

**शा०**— बोलायचें इतकेंच, आपल्या लग्नाची देणगी आह्मांला देणार किंवा नाहीं ?

**श्री०**—मी कोण देणार ?

शा०–हें काय? जेआहेत्ते लग्न आपलें, आणि ह्मणतां मी कोण देणार!

श्री०–मग? लग्न होईल तेव्हां मिळेल. आतांच काय आहे त्याचं?

शा०–महाराजसाहेब ह्मणत होते कीं, आपण लग्नच करावयाचें नाहीं ह्मणतां. तरी हें खरें का?

श्री०–खरंच मला लग्न नाहीं करायचं.

शा०–कां? लग्न कां नाहीं करायचें? महाराज साहेब तर मोठ्या उमेदीनें लग्न करायचें ह्मणतात, स्थळही जेआहेत्ते उत्तम व आपल्यांतलेंच, मुलगा तर फारच योग्य, पुन्हां गादीही घरांतल्या घरांत राहील, आणि आपण मध्येंच काय हें खूळ आरंभिलें आहे जेआहेत्ते?

श्री०–खूळ नाहीं न बीळ नाहीं. मला लग्नच करायचं नाहीं, आणि आपण याबद्दल कांहीं बोलूंही नका. तुह्मांला दुसरं कांहीं बोलायचं असलं तर बोला.

शा०–दुसरें कसें बोला? जेआहेत्ते महाराजसाहेबांनीच मला आपली समजूत करण्यास पाठविलें आहे.

श्री०–शास्त्रीबुवा, मग आपणाकडून माझी समजूत व्हावयाची नाहीं. उगाच कां त्रास घेतां?

शा०–त्रास घेतलाच पाहिजे. ताईसाहेब, अशानें मी ऐकणार नाहीं. (हंसत) जेआहेत्ते आपल्यापेक्षां चार पावसाळे माझे अधिक गेले आहेत बरें.

श्री०–आणखी दहा गेले असतील, त्याच्याशीं काय

करावयाचं आहे? मुळीं माझ्या मनांतच जर लग्न करायचं नाहीं, तर तुह्मी माझी समजूत ती काय करणार?

शा०—पण लग्न कां करावयाचें नाहीं हें सांगाल तर खरें.. मग पहा समजूत होते किंवा नाहीं. बाळासाहेब आपल्या पसंतीस येत नाहींत, असें? जेआहेत्ते बाळासाहेबाहून चांगलें स्थळ मिळेल, असें आपल्या नाहीं बुवा ध्यानांत येत. (श्रीमती बोलत नाहीं.) बोला बोला काय आहे तें. मी आपल्या मनांतलें काढून घेतल्याशिवाय जावयाचा नाहीं जेआहेत्ते. दुसरा कोणी आपल्या मनास आला असेल तर तसें सांगा, ह्मणजे त्याबद्दल तरी तजवीज करितां येईल. (श्रीमती बोलत नाहीं.) ताईसाहेब, माझ्या गळ्याची शपत आहे आपणांला, सांगा आपल्या मनास कोण आला आहे तो. (श्रीमती बोलत नाहीं.) काहो जिनाबाई, तुम्हाला यांच्या मनांतलें ठाऊक असल्यास तुम्ही तरी सांगा. जेआहेत्ते आपणच होऊन सांगावयास यांना लाज वाटत असेल.

जिजा०—गुरुमहाराज, बाईसाहेबांच्यापुढें बोलण्याचं माझं कुठचं सामर्थ्य? मी त्यांच्या हुकुमाची तांबेदारीण.

शा०—पहा ताईसाहेब, सांगा काय आहे तें. आपल्या मनांत कोणाला वरावेंसें वाटतें? त्याचें नांव सांगा, नाहींतर जेआहेत्ते त्याच्याच पायांची शपत आहे आपणांला.

श्री०—शास्त्रीबुवा, चारपांच दिवसांत सांगेन. झालें आतां?

शा०—[ हंसत ] हां, आतां कशा बोलत्या झाल्या. जे आहे ते आमच्या ताईसाहेब मोठ्या खोल मनाच्या खऱ्या, या दुसऱ्या तिसऱ्याला का दाद देणार आहेत? कांहीं हरकत नाहीं बरें. आपल्या मनासारखें होईल. महाराजसाहेबांना आपणापेक्षां का कांहीं जास्त आहे?

श्री०—बरं शास्त्रीबुवा, आतां आपण जायचं. मला वेणीफणी करून देवीच्या दर्शनास जायचं आहे.

शा०—बरें आहे. ( उठतो. दोघी नमस्कार करितात. ) अष्टपुत्रा सौभाग्यवती भव. ( जातो. श्रीमती बसते. जिजाबाई बसते. )

जिजा०—बाईसाहेब, मला आतां धडगत दिसत नाहीं. आतां आपली गोष्ट चोहोंकडे फुटणार. पायांची शपथ घातली आहे तेव्हां खरें सांगणं भाग आहे.

श्री०—जिजाबाई, आतां परमेश्वराला काळजी. समुद्रासारखं गंभीर मन करून जें जें होईल तें मुकाट्यानें सहन केलं पाहिजे. पण आपलं सत्व ढळूं द्यावयाचं नाहीं. तुम्ही भिऊं नका. मी जिवंत आहें तोंपर्यंत तुमच्या केंसालाही धक्का लावूं देणार नाहीं. माझ्यामागें मी तुह्मांला परमेश्वराच्या पदरांत घालून जाईन.

जिजा०—माझं मेलीचं कांहीं होवो. मला काय आतां जगून करायचं आहे? पण आपली व त्यांची मोठी काळजी आहे. आपणांला वेळेस त्यांच्या वियोगानें सारा जन्म दुःखांत काढावा लागेल, आणि त्या गरीब प्राण्याची हे काय वाट लावतील कोण जाणे. राजाचा क्रोध झटला ह्मणजे सगळी दुनयां उलटून जावयाची.

**श्री०**—कठीण वेळ आली आहे खरी. पहावं आतां देवाच्या मनांत काय आहे तें. आधीं त्यांना ही गोष्ट कळविली पाहिजे. जिजाबाई, उद्यां सकाळीं जाऊन विचारा कीं, मीच येऊं किंवा आपण यायचं.

**जिजा०**—मी सकाळींच जाऊन विचारून येईन. आज देवीला जातांना बोलायला साधायचं नाहीं. बाई-साहेब, मग वेणीफणी करायला चलतांना?

**श्री०**—हो चला. ( उठते जातात. )

---

## प्रवेश पांचवा.

स्थळः—राजकन्येचा बाग.

( श्रीमती एकटी बसली आहे. )

**श्रीमती०**—( आपल्याशींच ) आतां माझे प्राणनाथ येतील. त्यांनीं माझा अंगीकार केल्या दिवसापासून त्यांच्या माझ्या भेटीचा हाच पहिला प्रसंग, आणि याच प्रसंगीं त्यांच्या जिवाला धोका आलेलं वर्तमान त्यांना कळवायचं. काय विचित्र दैवयोग! काय हे पूर्व जन्मींचे अशा रीतीनें शेवट होणारे संबंध! त्या शास्त्रीबुवांच्या तोंडून पायाची शपत असे शद्ब निघाले मात्र, तेंव्हांच माझ्या कोमळ अंतःकरणावर पुढील संकटांची धोंड एकदम येऊन पडली. क्षणोक्षणीं नानाप्रकारच्या भीति मनांत येऊं लागल्या. माझा उल्हासचंद्र उदासीनतेच्या अभ्रांमध्यें कोणीकडे कसा अगदीं एकाएकीं नाहींसा झाला, व आतां पुन्हां त्याचा उदय होईल ही आशाच

नाही. सर्वत्र स्वमतत्. या शास्त्रीबुवाचं खोदखोदून विचारण्यावांचून कांहीं अडलं होतं? कांहीं नाहीं. बाबांनीं सांगितलं तसं झालं तर पहायचं आणि जायचं. पण नाहीं; मोठं अगत्य दाखवायचं आणि लग्नाची मिळकत पदरांत पाडून घ्यायची. पण अरेरे!!! तुझ्या या क्षुद्र हेतूकरितां आह्मा दोघां गरीब व अल्पसंतोषी प्राण्यांच्या आनंदाची जोत तूं मालविलीस, आणि क्षणोक्षणीं उद्भवणाऱ्या भयंकर धास्तीचं कारण झालीस, इकडे धनलुब्धा, तुझं कशाला लक्ष्य जाईल? हा कर्मठ दुराग्रही ब्राह्मण, याला मनाच्या सत्काराची आवडच नाहीं, सारं लक्ष्य द्रव्याकडे, भूतदयेचं नांवच नाहीं, बोलेल एक करील एक, धर्माचं ढोंग करून ज्यांत त्यांत आपला पगडा बसवायास आणि स्वार्थ साधावयास जाणारा, अंतःकरणांत खऱ्या ज्ञानाचा प्रकाश मुळींच नाहीं, नीच जातींच्या लोकांना पशूवत् तुच्छ मानाणारा, अशा या ब्राह्मणाला लग्न करायचं नाहीं ही गोष्ट कशी गोड वाटेल? त्यांतून माझ्या प्राणनाथांची जात ऐकिल्यावर तर त्याच्या पायाची आग मस्तकाला कशी नाहीं जाणार? हा त्यांच्या जिवाला अपाय आणण्याच्या अनेक खटपटी करील, चोहोंकडे भलतेसलते कुतर्क उठवील, वेळेस बाबांच्या मनांत ही कांहींतरी भरवून देईल, आणि शेवटीं माझ्या प्राणनाथांचे हाल हाल करवून त्यांना अंत करवील. ( जरा शब्ध राहते. ) पण गडे एक उपाय आहे, करून पहावा. लागू पडल्यास बरंच आहे.

नाहींपेक्षां दुर्दैव आपलं. हा असा जरी आहे तरी कांहीं भित्रा आहे. याला नीट ताकीद दिली तर वेळेस ही गोष्ट तो कोणाजवळ बोलणार नाहीं. ( जरा स्तब्ध राहून.) पण त्याच्याकडे तरी काय बोल? त्यानं केलं तें रीतीचंच केलं. मीच मोठी वाईट आहें. सर्वांना सुख द्यावयाचं सोडून पतीसुद्धां सर्वांना दुःख देण्याकरितांच मी जन्मास आलें आहे. दुसरं काय?( जिजाबाई येते.)

जिजा०—बाईसाहेब; महाराजांची स्वारी आली.

श्री०—स्वारी आली? ( उठते. नंतर सटवाजी येतो श्रीमती नमस्कार करून खुर्ची पुढें करितें. ) बसावं प्राणनाथ.

सट०—( बसून ) श्रीमती तूंही बैस. ( श्रीमती बसते. जिजाबाई दूर जाते. ) श्रीमती; आज अशी खिन्न कां दिसतेस! इतकें म्लान वदन कां केलें आहेस?

श्री०—जिजाबाईनें आपणांला सर्व कळविलंच असेल.

सट०—होय. शास्त्रीबुवांनीं शपत वातल्याची हकीकत कळली. मग इतकें भिण्याचें कारण काय?

श्री०—प्राणनाथ, आतां ही गोष्ट लोकांत फुटेल व बाबांनाही कळेल. मग मला बरी गत दिसत नाहीं.

सट०—बाबांना कळली ह्मणून काय झालें! त्यांत डगमगण्यासारखा प्रकार कांहींच नाहीं.

श्री०—प्रकार कांहींच नाहीं कसा प्राणनाथ! बाबा रागावले ह्मणजे आपल्या प्राणाशींच गांठ. सर्प सर्प ह्मणून विनाकारण आपणा योगीजनांच्या प्राणाचा नाश करितील, आणि असं झालं तर याचं मूळ कारण मी

आहे. कश्य मागील जन्मींची आपली वैरीण होतें, ह्मणूनच आपणाला या घोर संकटांत घातलें. आपला आयुष्यक्रम मोठ्या सुखाचा चालला होता त्यांत ग्यां पापिणीनें विघ्न आणिलें, यामुळें माझें मन मला खातें.

सट०—श्रीमती, तुजसारख्या धीर, ज्ञानी, आणि विरक्त अशा स्त्रीनें या गोष्टीची खंत करावी, याचें मला मोठें आश्चर्य वाटतें. अग, तूं कोण मला संकटांत घालणार, आणि माझ्या प्राणाचा नाश तो कसा होणार? आणखी परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध माझा नाश करण्यास समर्थ तरी कोण आहे, आणि तूं आपल्याला कां व्यर्थ पापिणी ह्मणवून घेतेस? हें पहा, ज्या विद्युल्लतेच्या शुद्ध तेजानें आसमंतांतील पाप दग्ध होऊन जाईल, तीच प्रत्यक्ष पापिणी कशी होईल? श्रीमती, या सर्व गोष्टी प्रथमच आपल्या लक्षांत येऊन चुकल्या होत्या, आणि त्या सर्व समजून उमजून आपण एकमेकांस प्रेमाचा शब्द दिला आहे. आपले देह जरीं या भूमीवर पडले तरी आपलें प्रेम आहे तें निरंतरचेंच आहे, व त्याकरितां तूं प्राणावर उदार आहेस व मीही आहें. मग यांत नवीन संकट तें काय आलें आहे, व याचें तुला इतकें अवघड तें काय वाटतें? मला माहीत आहे कीं, शास्त्रीबुवांच्या तोंडून ही गोष्ट चौघांत फुटेल, वेळेस तुझ्या पित्यालाही समजेल, तुझा पिता सत्ताधीश राजा आहे, त्याला आपला दोघांचा संबंध मोठ्या लांछनाचा व काळिमेचा वाटेल, अतिशय संताप होईल, आणि त्या संता-

पाच्या भरांत तो माझा वध करवील. फार झालें तर हाल-हाल करवून वध करवील. इतकेंच ना? का यापेक्षां कांहीं जास्त करणार आहे? श्रीमती, या सर्व गोष्टी मला पाण्यावरील तरंगांप्रमाणें अगदीं क्षुल्लक वाटतात. त्या आल्याच, तर मी मोठ्या आनंदानें व उल्हासानें सहन करीन. अग, बाहेर प्रचंड वायूनें आपलें सर्व सामर्थ्य खर्च केलें, तरी महासागराच्या उदरांतील अगाध शांततेमध्यें तो थोडासा तरी विकार करूं शकेल, असं तुला वाटतें? कधींच नाहीं. त्याचप्रमाणें माझ्या शांतीपुढें तुझ्या पित्याचा क्रोध व त्याची मोठी सत्ता हीं अगदींच दीन व दुर्बळ आहेत. श्रीमती, या प्रसंगीं आपल्या थोड्याशा असत्य भाषणानें हीं सर्व संकटें दूर होत आहेत. आणि इतकें जर या निंद्य अशा असत्य भाषणाचें सामर्थ्य आहे, तर हे महा साध्वी, तुझ्या प्रखरतर सत्वाचा प्रभाव केवढा असला पाहिजे, व त्याच्या योगानें काय नाहीं होणार? दुसरें, श्रीमती, तूं उत्तम कुलांतील राजकन्या, मी नीच जातीचा मांग, असें असतांनाही प्रिये, तूं आपल्या सर्व सुखाचा त्याग केलास, व आपणच होऊन मोठ्या प्रेमानें मला पतीचा श्रेष्ठ मान दिला आहेस; तरी या सन्मानाप्रीत्यर्थ या जन्मींच काय, पण अनेक जन्मींसुद्धां घोर हाल सहन करून प्राण देण्यांत मला मोठी धन्यता वाटेल. तशांतून, जिला केवळ सत्वाचीच आवड अशा साध्वीचा जो भ्रतार झाला आहे, आणि ज्याला त्याच्या एकवचनी

पत्नीकडून सत्वशील असें नांव मिळालें आहे, त्याच्या मुखांतून क्षणिक आयुष्याकरितां असत्य भाषण निघून सत्वहानीची गोष्ट कधींही घडणार नाहीं; इतकेंच नाहीं, तर त्याच्या प्रियपत्नीकडूनही असत्य भाषण होणार नाहीं ही खात्री आहे. तरी असल्या केवळ सत्वप्रिय दंपत्याला या दुनयेंतील कोणत्या दुःखाची भीति आहे, आणि प्रिये, तूं खेद कां करावास ?

श्री०—प्राणनाथ, एकेक माझ्या मनांत येतं, तें सांगतां येत नाहीं. माझ्यामुळें आपल्या पवित्र देहाला हे लोक नाहींनाहीं त्या यातना देतील.

सट०—श्रीमती, ज्या तुझ्या सुवर्णकांती दिव्यदेहाचा थोडासाही भाग मोठमोठ्या राजपुत्रांच्या नजरेस पडणें अति दुर्घट आहे, व जो दैववशात् दृष्टीस पडलाच, तर यावत्पुरुषमात्र त्यामुळें भ्रमिष्ट होऊन जाईल, आणि भूकतहान सोडून तो दृष्टीस पडलेला मनोहर भाग पुन्हपुन्हां ध्यानांत आणून त्या आनंदांतच तल्लीन होऊन डुलत राहील, जो खरोखरी विधात्याच्या अगाध चातुर्याचें केवळ सारच, असा आपला अनुपम देह मनाच्या शुद्धतेकरितां अगदीं काष्ठवत् मानितेस; आणि अशा रीतीचा, तूं अल्पवयी व पुन्हां अबला जाती होऊन जर तुझ्या मनाचा प्रभाव आहे, तर मी पुरुष होऊन व त्यांतून तुजसारख्या तेजस्वी सतीचा भ्रतार होऊन प्राणांत होण्यापूर्वीच्या देहाच्या थोड्याशा यातनाही सहन करूं नयेत काय ? बरें, यारीतीनें मरण आलेंच,

तर त्या वेळीं प्रिये, तुझें शुद्ध प्रेम मनांत येऊन त्या आनंदांत मी इतका कांहीं निमग्न होऊन जाईन कीं, त्या समयींच्या या शरिराच्या यातना मला भासणार सुद्धां नाहींत. आणखी श्रीमती, माझी जात मांग आहे. आह्मां मांगांमध्यें सर्व वर्णांहून लोकोत्तर असा एक गुण जन्मतःच आलेला असतो,व त्यामुळेंच प्राणीमात्रांचे घोर हाल करणें हा आमचा पूर्वापार चालत आलेला धंदा आहे. तो गुण कोणता ह्मणशील तर हृदयाचें पूर्ण काठिण्य. तो गुण मजमध्यें पूर्णपणें आहे व त्या वेळीं त्याचा मला चांगला उपयोग होईलच. पुन्हां, ज्यानें तुला शब्द दिला, व जिनें मजपाशीं शब्द मागितला, तीं दोघेंहीं अमर आहेत. मरण व हाल देहाला आहेत आणि देहाचे सर्व संबंध व त्यांचा मोह, हीं आपण पहिल्यानेंच सोडून दिलीं आहेत. मग प्रिये, तूं काळजी कां करावीस ?

श्री०—प्राणनाथ, आपण ह्मणतां हें खरं आहे, पण सर्व प्रकार स्वप्नवत् होणार आहे.

सत्य०—श्रीमती, नाहींतरी सर्वच स्वप्नवत् आहे. कांहीं काळानें सर्वांचा अखेर नाशच आहे. तरी जें जें कांहीं होतें तें सर्व परमेश्वराच्या इच्छेप्रमाणें घडून येतें, व त्या त्याप्रमाणें प्राणीमात्राला प्रेरणा होते. मग विनाकारण या गोष्टी तूं मनांत कां आणाव्यास ! जो आपला व्यवहार झाला आहे तो खरा खरा सांग. परमेश्वराच्या इच्छेप्रमाणेंच शास्त्रीबुवांनाही बुद्धि होईल.

श्री०—खरंच. त्याचा काय नेम आहे? वेळेस देवानें शास्त्रीबुवांना ही गोष्ट गुप्त ठेवण्याची बुद्धि दिली, तर अनायासंच आपलीं संकटें दूर होणार आहेत. देवावरच भरंवसा ठेवावा. त्याच्या इच्छेशिवाय पानही हालत नाहीं.

सद०—असा नीट विचार कर. इतक्यांतच धैर्य सोडूं नको. झालें! आतां नाहींना कसली भीति? मी येऊं तर आतां?

श्री०—बरं, यायचं तर मग. [ श्रीमती नमस्कार करिते. सदुबाजी जातो. श्रीमती पोंचविण्यास जाते. ]

---

## प्रवेश सहावा.

**स्थळ**:—शास्त्रीबुवांची ओटी.

( शास्त्रीबुवा बटवी सोडून पानसुपारी खातात. )

शास्त्री—( आपल्याशीच ) जेआहेत्ते हाच विचार पक्का. हैबतरावाच्या साहायानेंच हें काम ठीक होईल, आणि पुन्हां आपण भलेच्याभले. चांगल्या रस्त्यानें काम होत आहे, तर कोणी जावें आड रस्त्यानें आणि पडावें खाड्यांत. आपलें काय जातें त्यांत ती मांगाशीं रत झाली ह्मणून? आपणाला लग्न होण्याशीं कारण. यंदां नाहीं पुढील सालीं. झाल्याशिवाय जेआहेत्ते थोडेंच राहतें. तिनें पुन्हपुन्हां बजावून सांगितलें आहे कीं कोणाला सांगूं नका ह्मणून. पण बाळासाहेबाला व हैबतरावाला कळविल्याशिवाय आपला कार्यभाग कसा होईल? जे-

आहेत्ते त्यांना सांगितलेंच पाहिजे. कांहीं लालूच दाखविल्याशिवाय हैबतराव वळणार नाहीं, व त्याचें साह्य तर अवश्य पाहिजेच; आणि बाळासाहेबास अशी अशी कामगिरी आहे असें सांगितल्याशिवाय त्याचा हात ढिला होणार नाहीं. आपलें काय अडलें आहे जेआहेत्ते पदराचा दाम खर्चून शेटची चाकरी करावयास? तरी फक्त महाराजसाहेबांना कळवूं नये ह्मणजे झालें. जेआहेत्ते पर्यायानेंच सटवाजीस दुनयेंतून नाहींसा करावा. तो नाहींसा झाला ह्मणजे आपोआप ही बाळासाहेबास पसंत करील, आणि आपलेंही काम होईल. काय ह्मणे लग्नच करावयाचें नाहीं. कां? तर प्रतिज्ञेचा भंग होईल. पण पोरी, शिकवितेस कोणाला? हा शास्त्रीबुवा भोळा नाहीं. तुझा निंद्य क्रम मी अगदीं समजून चुकलों. फार कठीण गोष्ट आहे जेआहेत्ते. माझें तृतीय कुटुंब आटोपलें, करितां माझ्यासुद्धां मनांत आणखी लग्न करावयाचें आहे. कारण राहवतच नाहीं. जेआहेत्ते सत्तावन्नी उलटलेल्यांची ही कथा, तर सोळासतरा वर्षांच्या भरज्वानीमधील पोरीचें दिमाख ते किती चालणार? माझें लग्न मात्र तूर्त या पोरीनें लांबणीवर टाकिलें. कारण, मोठ्या कारखान्यांत माझेंही तेवढें उरकून गेलें असतें. अगोदर करणें ह्मणजे शिलकेंतली रक्कम जेआहेत्ते खर्च करावी लागणार. निदान पंधराशें रुपयांखालीं मुलगीच मिळावयाची नाहीं. [हैबतराव तुरुंगावरील अधिकारी येतो.] या हैबतराव, बसा.

हैबत.–रामराम शास्त्रीबुवा. [ वसतो. ] प्रकृति बरी आहेना ? कधीं नाहीं आणि आज कां बोलावलें होतें ?

शा०--तसेंच काम असल्याशिवाय का कोणी बोलावितो?

हैबत०--शास्त्रीबुवा, असें काय काम आहे ? सांगा. मजकडून होण्यासारखें असलें तर मी करीन. आपण महाराजसाहेबांचे शास्त्रीबुवा, मग आपलें काम कोण नाहीं करणार ?

शा०--जेआहेत्ते आधीं वचन द्या, नाहींतर मागाहून ह्मणाल माझ्यानें व्हायचें नाहीं.

हैब०--छे, छे, असें नाहीं होणार. इतका माझा भरंवसा नाहीं ना शास्त्रीबुवा ? हें घ्या तर वचन. ( हातावर हात मारितो. ) सांगा आतां काय आहे तें.

शा०--पण कोणाला सांगू नका हो. नाहींतर—

हैबत०--छे हो, भलतेंच. इतकें का मला समजत नाहीं.

शा०-- (हैबतरावच्या कानाशीं बराच वेळ लागतो. ) पण अगदीं कोणापाशीं बोलावयाचें नाहीं हो.

हैबत०--( विचारांत पडल्यासारखें दाखवून ) शास्त्रीबुवा, ही गोष्ट मला खरी वाटत नाहीं. कारण सटवाजी तशा प्रकारचा माणूस नाहीं. तो रूपानें चांगला आहे, भर ज्वानींत आहे, राजकन्येचें मन त्याजवर गेलें असेल, या गोष्टी खऱ्या आहेत. त्याबद्दल माझें कांहीं ह्मणणें नाहीं. परंतु आपण ह्मणतां तसा प्रकार झाला असेल असें आपल्याला नाहीं बुवा वाटत.

शा०--हैबतराव, तुह्मांला जेआहेत्ते दुनयेचा कांहींच अनुभव नाहीं. अहो, जारकर्मांच्या गोष्टी कोणी आपल्या तोंडानें का कबूल करित असतो. त्या नाहींच ह्मटल्या पाहिजेत. पण ता ह्मटलें कीं ताकभात हें जेआहेत्ते चतुर पुरुषानें ताडलें पाहिजे. हैबतराव, श्रीमती किती झाली तरी ती कालचें पोर. मी तिच्याच तोंडून सर्व काढून घेतलें आहे. सटवाजीची भेट बागांत झाली होती ह्मणून तीच ह्मणत होती. आतां आणखी काय पाहिजे तुह्मांला? अहो, दोघांचीं मनें जर मिळालेलीं आहेत, आणि पुन्हां एकांतांत भेट ही झालेली आहे, तर तो कपिलापष्ठीचा योग त्यांनीं कोरडाच घालविला असेल नाहीं? अगदींच बुवा तुम्हीं भोळे. (मान हालवून.) फार कठीण आहे जेआहेत्ते, श्रीमतीसारखी अप्सरा पायांशीं चालून आल्यावर नाहीं ह्मणावयाचें. साठ साठ हजार वर्षं लोहपिष्ट खाऊन तपश्चर्या केलेले विश्वामित्रा सारखे सुद्धां लटपटून गेले. मग तुमची आमची काय कथा? ह्मणे सटवाजी नाहीं तशा प्रकारचा. पण हैबतराव, या गोष्टीची कोणालाच ओळख द्यावयाची नाहींहो. शपत आहे माझ्या पायाची. आपलें काम होण्याशीं कारण.

हैबत०--शास्त्रीबुवा, इतकें आपण सांगतां तर असेल बुवा तसा प्रकार. नेम नाहीं सांगवत. पण जो करील तो भोगील. आपणांला काय त्याच्याशीं करावयाचें आहे?

शा०--काय करायचें आहे? अगदींच बुवा अजाग-

कसारख्या गोष्टी सांगतां तुम्ही. अहो हैबतराव, जे आहेत्ते आपण अन्न कोणाचें खात आहोंत?

हैबत०—महाराजसाहेबांचें.

शा०—हें खरेंना? मग आपणांस्त्रा नाहीं का कांहीं करावयाचें? जेआहेत्ते सरकारचें व राणीसाहेबांचें लक्ष्य मुलीचें लग्न केव्हां होईल, इकडे एकसारखें लाग-लेलें आहे. आणि पोरीचें मन गेलें आहे त्या मांगाच्या पोरावर. जेआहेत्ते मुखानें उच्चार करण्याचें सुद्धां महा-पातक. तिला लागली आहे त्या सटवाजीची गोडी आणि ह्मणते मला लग्नच करायचें नाहीं. यामुळें महाराजसा-हेबांना व राणीसाहेबांना कांहींच सुचेनासें झालें आहे व दोघें मोठ्या काळजीमध्यें आहेत. तेव्हां त्यांची काळजी नको का जेआहेत्ते दूर करावयास?

हैबत०—मग आपण कशी त्यांची काळजी दूर करणार?

शा०—[ गर्विष्ट मुद्रेनें ] जेआहेत्ते कांहींच कसें तुम-च्या ध्यानांत येत नाहीं? सांगतों तर ऐका. हें पहा, श्रीमती सरकारचे भाचे यांना देण्याचें ठरलें आहे. पण पोर लग्नच करायचें नाहीं ह्मणते. आणि ती नको ह्मणत असतां बळेंच लग्न करण्याचें महाराजसाहेबांच्यानें तर होत नाहीं. तिचें ठीकच आहे. लग्न न झालें तरी बागामध्यें सटवाजी पाहिजे तेव्हां हजर आहेच, पण महाराजसाहेबांना मोठी काळजी आहे राज्याची. जेआ-हेत्ते बाळासाहेबाला मुलगी देऊन गादी घरांतल्याघरांत

ठेवावी, असा त्यांचा इरादा आहे. ह्मणून हैबतराव, या सत्वशीलेलाच दुनयेंतून नाहींसा केला ह्मणजे जेआहेत्ते सुंठीवांचून खोकला गेला. मग आपोआप ती बाळासाहेबाला कबूल करील, लग्नही होईल, महाराजसाहेब व राणीसाहेब यांची काळजी दूर होऊन जिकडे तिकडे आनंदीआनंद होऊन जाईल, व सर्व श्रेय आपणांकडे येईल. आणखी हैबतराव, महाराज साहेबांचा दुर्लौकिकही होणार नाहीं. त्याचा काय नेम आहे जेआहेत्ते? पापाची गोष्ट फुटल्याशिवाय थोडीच राहते. आज नाहीं वर्ष सहा महिन्यांनीं तें बाहेर येणारच. आणि असें झालें तर मग महाराजसाहेबांना तें किती वरें वाईट वाटेल? त्यांच्या कीर्तीला तें किती लांछनांचें होईल? आणि हैबतराव, (जरा तोंड वांकडें करून) तुह्मा क्षत्रियांना नाहीं का ही गोष्ट शरमेची? वरें, बाळासाहेबाचेंही मोठेंच काम केल्यासारखें होईल. तोच पुढें महाराजसाहेब होणार. मग जेआहेत्ते सर्व राज्य आहे आपल्याहातांत. इकडे नीट लक्ष द्या. खात्रीनें तुह्मालाच पहिल्यानें चांगली बढती देववीन. तरी हा कांटा पार नाहींसा केला पाहिजे.

**हैबत०**—शास्त्रीबुवा, आपण फारच धोरणी आहांत बुवा. आपल्या दूरवर नजरेची जितकी वाहवा करावी तितकी थोडीच आहे. पण या चांडाळीला नाहींसा कसा करावा? मारेकऱ्यांकडून मारवावें ह्मटलें तर ते पडले त्याच्याच जातीचे.

शा०—( हांसतो ) हं, हं, हैबतराव, असल्या बिकट कामांत अक्कल चालविणें फार कठीण आहे बरें. अहो, काम असें करावें कीं, तें करून सवरून आपण जेआहेत्ते नामानिराळेच. हें पहा, शत्रूला जर मारावयाचें आहे तर त्याच्याच धंद्यांत त्याला कायद्यानें धरून मारावा, आणि यानेंच नांव शहाणपण. जेआहेत्ते त्यास लोभ दाखवून किंवा त्यास कांहींतरी समजावून त्याजकडून गैरकायदा काम करवावें. आणि हैबतराव, तुह्मांला तर हें फारच सोपें आहे. एखाद्या कैदीला पळविला, किंवा पळविण्याचा प्रयत्न केला, ह्मणून चांगलें कचाट उभारावें, सत्रा आणे साक्षपुरावा तयार करावा, आणि राजद्रोहाचा आरोप आणावा, ह्मणजे झालें. आहे काय त्यांत? जेआहेत्ते गुलाम फांशीच जाईल. आतां समजलां?

हैबत०—आतां मी समजलों. आतां पहा मी कसें काय करितों तें. आपण अगदीं स्वस्थ असा.

शा०—हैबतराव, जेआहेत्ते इतकें काम तर करा, मग पहा. मी मघां सांगितलेल्या गोष्टी तर तूर्त लांबच आहेत, पण सध्यां बाळासाहेबाकडूनच कांहीं चांगलें इनाम देववीन.

हैबत०—शास्त्रीबुवा, इनामाचें राहिलें, पण सरकारचें काम होईल. राजाराणी आनंदी तर आपण प्रजा आनंदी. मी येऊं आतां आज्ञा!

शा०—हां, आतां कसें बोललां? जेआहेत्ते मधून मधून भेटत जा. मलाही बाळासाहेबांकडे जावयाचें आहे.

तुह्मी येतां का हैबतराव? तुमचा व त्यांचा परिचय तरी होईल.

हैबत०— आपले मोठे उपकार होतील. शास्त्रीबुवा,

शा०—बरें, चला तर. ( उठतात व जातात. )

## दुसरा अंक समाप्त.

---

# अंक तिसरा.

---

## प्रवेश पहिला.

स्थळ:—न्यायकचेरी.

( कारकून, शिपाई, प्रेक्षक, हजर आहत. )

शिरस्तेदार—मोरोपंत, सर्व तयारी आहे? कैदीस आणून उभा करा. न्यायाधीशसाहेब येण्याची वेळ झाली.

मोरोपंत—भाऊसाहेब, सर्व तयारी आहे. ( नाईकास ) अहो नाईक, कैदीस आणा.

नाईक—जी. ( जातो. सटवाजीस घेऊन येतो व त्यास आरोपीच्या जागेवर उभा करितो. दोहींकडे दोन शिपाई उभे राहतात. )

शिबंदी—शिरस्तेदार साहेब, खावंदस्वारी आली.

शिरस्ते०—स्वारी आली? ( उठतो सर्व उभे राहतात. भालदार छडी उभी धरून पुढें येतो. मागें न्यायाधीश येतो. )

भालदार—आस्ते कदम चलना खाविंद न्यायाधीश साब. ( खुर्ची नीट करितो. न्यायाधीश बसतो. सर्व आपापल्या जागेवर बसतात. सटवाजी मुजरा करितो व हात जोडून उभा राहतो )

न्याया०-शिरस्तेदार, आज, कोणता मुकदमा आहे?

शिरस्ते०-खावंद, सरकारी मांग सटवाजी बिन चांगाजी यानें आपल्या कर्तव्यामध्यें कपट करून खोटे फांस केले व देहांत शिक्षा झालेल्या गुन्हेगाराचा प्राण वांचविला. येणेंकरून त्यानें सरकारशीं राजद्रोह केल्याबद्दलचा मुकदमा आहे. हाच तो मांग.

न्यायाधी-( आश्चर्यानें ) काय? हा मनुष्य मांग आहे? ( तोंडाशीं लेखणी धरून खुर्चीवर कोंके टेकतो व सटवाजीकडे टक लावून पहातो. कांहीं वेळानें ) आरोपीवरील फिर्याद त्यास समजावून सांगा.

शिरस्ते-( सटवाजीस. ) तुझें नांव काय?

सट०-खावंद, माझें नांव सटवाजी.

शिरस्ते०-तुझ्या बापाचें नांव?

सट०-चांगाजी.

शिरस्ते-उमर?

सट०-एकोणीस.

शिरस्ते०-जात कोण?

सट०-मांग.

शिरस्ते०-धंदा काय?

सटवा०-राजधानी तुरुंगावरील सरकारी मांग.

शिरस्ते०-सटवाजी, तुजवर फिर्याद आहे ती ऐक. गेल्या महिन्यांत प्रांतन्यायाधीश साहेब यांचेसमोर खटला चालून मैना जोगण नांवाच्या स्त्रीस फांशीची देहांत शिक्षा झाली होती, व ती शिक्षा अमलांत येण्या-

करितां गुन्हेगार मैनाजोगण इजला राजधानीतुरुंगांत आणिलें होतें. फांशीची देहांत शिक्षा देण्याचे कामीं दैवयोगानें तिनदां फांस चढवून ते तुटून गेल्यास व गुन्हेगार जिवंत राहिल्यास तो गुन्हा माफ होऊन गुन्हेगार याजला सोडून देण्यांत येतें. त्याप्रमाणें गुन्हेगार मैनाजोगण इचे गळ्यास तिनदां फांस चढविले, परंतु ते तिन्ही फांस तुटून ती जिवंत राहिली. यामुळें तिची शिक्षा महकूब होऊन तिजला मुक्त करण्यांत आलें. त्या कामीं ते तीन फांस मैनाजोगण इजला वांचविण्याच्या हेतूनें तूं जाणूनबुजून कायद्याप्रमाणें न करितां कपट करून थोड्याशा वजनानें सहज तुटण्यासारखे केले होतेस. व हें कृत्य तूं सरकारी नोकर असून लांच घेऊन कपटानें केलेंस, अशा प्रकारचा एक निनावी अर्ज शहरसुभे यांजकडे आला. त्यावरून पुढें चौकशी झाली. त्यांत अर्जांत लिहिलेला प्रकार झाला असावा अशा प्रकारचा अभिप्राय राजधानीतुरुंगावरील अधिकारी यांचाही आलेला आहे. तेव्हां हें कृत्य तूं राजद्रोहानें केलेंस, ह्मणून तुला शहरसुभे यांजकडून इकडे इनसाफ होण्याकरितां पाठविण्यांत आलें आहे. तरी अशा प्रकारचें कृत्य तूं केलेंस काय?

सट०—खावंद, मी लांच घेतला नाहीं, पण निरपराधी बाईस सोडविलें ही गोष्ट खरी.

न्याया०—खोटे फांस करून?

सट०—होय खावंद.

न्याया०—जाणून बुजून किंवा चुकून?

सट०—समजून उमजून.

न्याया०—स्वतांच्या बुद्धीनें किंवा दुसऱ्याचे सांगण्यावरून?

सट०—बाईस सोडवावें ही बुद्धि माझी. खोटे फांस करण्याची युक्ति दुसऱ्याची.

न्याया०—त्या दुसऱ्या इसमाचें नांव काय?

सट०—खावंद, त्याचें नांव मला सांगतां येत नाहीं. नांव सांगणार नाहीं ह्मणून मीं वचन दिलें आहे.

न्याया०—तूं वचन दिलें असलें तरी राजद्रोहाच्या गुन्ह्यामध्यें सामील असणारांचीं नांवें सांगणें कायद्यानें तुला भाग आहे.

सट०—त्याबद्दल सर्व शिक्षा भोगण्यास मी तयार आहें. मी नांव सांगणार नाहीं.

न्याया०—अशी गोष्ट केल्यानें राजद्रोह होईल हें तुला माहीत होतें काय?

सट०—खावंद, मी राजाशीं द्रोह मुळींच केला नाहीं. उलटें राजाचें हित केलें. गरीब व निरपराधी स्त्रीला अन्यायानें देहांत शिक्षा होत होती, व तें पाप राजावर येत होतें. त्याचें मीं निवारण केलें.

न्याया०—गुन्हेगाराला न्यायानें शिक्षा झाली अगर अन्यायानें शिक्षा झाली, हें पाहण्याचें काम तुझें नाहीं. तुझें कर्तव्य फक्त सरकारी हुकूम होईल तो अमलांत आणण्याचें आहे. दुसरें, मैना जोगण ही निरपराधी असून

तिजला अन्यायानें शिक्षा झाली होती असें तुला ह्मणतां येत नाहीं. तूं सरकारी कायद्याच्या व वहिवाटीच्या विरुद्ध वर्त्तन केलेंस किंवा नाहीं?

सट०—होय खावंद, जें काम माझें होतें तें मीं केलें नाहीं, ही गोष्ट खरी.

न्याया०—तुला तुझ्या बचावासंबंधीं कांहीं सांगावयाचें आहे?

सट०—खावंद, माझ्या बचावाविषयीं मी काय सांगणार, व सांगितलें तरी तें मनांत कोण आणणार? खावंद, मी केवळ दयार्द्र बुद्धीनें व केवळ निरिच्छ बुद्धीनें त्या निरपराधीबाईस सोडविलें आहे. दुष्ट फिर्यादीनें कोतवाल, शिपायी वगैरे अमलदारांस अनुकूल करून घेऊन व बनावट पुरावा करून तिला न्यायासनापुढें आणिलें. प्रांतन्यायाधीशसाहेबांनीं पुरावा होता ह्मणून देहांत फांशीची शिक्षा दिली. खावंद, कोणत्याही प्राण्याचें खरें खरें अंतःकरण त्याच्या एकांतामध्यें निघालेल्या उद्गारांवरून कळतें. त्याप्रमाणें एके दिवशीं मी कैदी लोकांच्या कोठड्यांवरून जात असतांनां या बाईच्या कोठडीजवळून गेलों, तेव्हां तिचे जे उद्गार मीं तिच्या नकळत ऐकिले, त्यांनीं माझें अंतःकरण फारच कळवळून गेलें. ती बाई कोणी मोठ्या घराण्यांतली असून फारच भली असावी, व दुर्दैवानें आपल्या मुलाच्या शोधाकरितां देशोदेश हिंडत असावी. तिजवरील फिर्यादी स्त्री महाजारिणी असून तिनें आपल्या मनच्यास

मारण्याचा प्रयत्न करून तें सर्व कचाट मेनावर आणिलें. याबद्दलची चौकशी मी फार बारकाईनें केली आहे. खावंद, मला माहीत होतें कीं या बाईस सोडविण्यांत मला देहांत शिक्षा भोगावी लागेल, व ती भोगण्यास मी आनंदानें तयार आहें. परमेश्वराच्या येथें सत्याच्या कामीं माझा प्राण खर्ची पडत आहे, याची मला मोठी धन्यता वाटते. मी प्रत्येक गोष्ट नाकबूल गेलों असतों, तर मजवर कांहीं पुरावा न होता त्या बाईचा प्राण वांचून मीही सुटलों असतों. परंतु अशी निंद्य गोष्ट मला कर्तव्य नाहीं. तरी खावंद, माझी थोडी प्रार्थना आहे ती ऐकावी. मी देहांत शिक्षा भोगण्यास तयार आहें, परंतु खूनवगैरे दुष्ट कृत्यें करणाऱ्यांना ज्या रीतीची देहांत शिक्षा देण्यांत येते, त्या प्रकारची अपकीर्तीची फांशीची शिक्षा मला मिळूं नये. तरी मी आपल्या राजीखुषीनें सरकारमहाराजसाहेब यांच्या चरणांसमोर विष प्राशन करून प्राण सोडीन. व तोंपर्यंत मला अटकेंत न ठेवितां खुला ठेवावा. मी नेमिल्या वेळेस इमानानें हजर होईन. खावंद, बंदी, कैद, व फांस या गोष्टी दुष्ट कृत्यें करणाऱ्यांना आहेत. मी त्या प्रकारचा मनुष्य नाहीं.

न्याया०—(गालावर हात टेकून सटवाजीकडे एकाग्र नजरेनें पहातो व आपल्याशीं) हा मातीचा मांग, आणि याचें अशा रीतीचें शुद्ध व अस्खलित भाषण आणि असें अलौकिक वर्तन!!! हा काय चमत्कार आहे? (उघड) तुला आणखी कांहीं सांगावयाचें आहे?

सट०—खावंद, कांहीं नाहीं. ( न्यायाधीश ठराव लिहितो व शिरस्तेदाराजवळ देतो )

शिरस्ते०—सटवाजी, तुझा इनसाफ होऊन ठराव करण्यांत आला आहे तो ऐक. ( वाचतो. ) " आरोपी " सटवाजी बिन चांगाजी याजवर आणिलेल्या आरोपां- " पैकीं लांच घेण्याशिवाय सर्व गोष्टी आरोपीनें स्वतांच " होऊन कबूल केल्या आहेत. यामुळें पुरावा घेण्याचें " कारण न लागून आरोपी सटवाजी याजवर राजद्रो- " हाचा गुन्हा शाबूत झाला आहे. व सदरहु गुन्ह्यास " कायद्यानें ठरविलेली देहांत शिक्षा आरोपी याजला " देण्यांत येत आहे. परंतु ही देहांत शिक्षा आरोपीनें " समक्ष अर्ज केल्याप्रमाणें श्रीमंत सरकार महाराज- " साहेब यांचे समोर त्यानें विष प्राशन करून अमलांत " यावी, असाही ठराव करण्यांत येत आहे. शिवाय, " हल्लींचे चाललें कामांत आरोपी सटवाजी याचें सरळ " वर्त्तन, त्याचा स्तुत्यहेतु, व प्राणाची ही परवा न " करितां सत्याच्या ठिकाणीं पूर्णनिष्ठा, व दया, हीं " सर्व पूर्णपणें दिसून येत आहेत. व या गोष्टींचा " विचार केला असतां आरोपी सटवाजी यावर विशेष " रहीम नजर होऊन ठरविलेली शिक्षा माफ होण्यास " तो पूर्णपणें पात्र आहे. परंतु तो विशेष अधिकार " तख्ताधिपती श्रीमंत सरकार महाराजसाहेब यांचाच " फक्त असल्यामुळें सटवाजीनें केलेला गुन्हा माफ " होण्याबद्दल हुजूर शिफारस करण्यांत आली आहे.

"आरोपीनें एक लक्ष रुपयांचा जामीन दिल्यास त्याज-
"ला खुलें ठेवण्यांत येईल."

सट०—खावंद, मला एक लक्ष रुपयांचा जामीन कोण राहणार?

न्याया०—देहांत शिक्षा झालेल्या इसमास कायद्यानें निदान एक लक्ष रुपये रकमेपेक्षां कमी रकमेच्या जामिनावर सोडतां येत नाहीं. आतां, तुझें अलौकिक सुवर्त्तन पाहून माझा तुजवर पूर्ण भरंवसा आहे. तरी वसंतमाधव प्रधानसाहेब यांजकडे जाऊन त्यांना माझें नांव सांग. ते तुला जामीन राहतील. तसें न ऐकल्यास मी समक्ष सांगेन. निरुपाय आहे, कीं न्यायाधिशास स्वतः जामीन राहतां येत नाहीं.

सटवा०—खावंदांचे मजवर मोठे उपकार होतील.

न्याया०—शिरस्तेदार, सटवाजीबरोबर कोणी देऊन त्यास प्रधानसाहेबांकडे पाठवा. त्यांनीं जामीन राहण्याचें कबूल केल्यास अटकेंत ठेवूं नका. (सटवाजीस) सटवाजी, प्रधानसाहेब दयाळू होऊन जामीन राहिल्यास त्यांना रोज हजिरी मात्र देत जा.

सट०—खावंद, सकाळीं व संध्याकाळीं अशी दोनदां हजिरी देत जाईन. (मुजरा करितो.)

न्याया०—(भालदारास) अर्जदार पुकार.

भालदार०—कोणी अर्जदार आहे? (आणखी दोनदां ह्मणतो. न्यायाधीश उठतो.) आस्ते कदम चलना खाविंद न्यायाधीश साब. (असें ह्मणत पुढें चालतो. न्यायाधीश जातो. कचेरी बरखास्त होते.)

## प्रवेश दुसरा.

**स्थळः**—न्यायाधीश साहेबांचा वाडा.

( कमलिनी बसलेली आहे. )

**कमलिनी**–( आपल्याशींच ) एकंदरींत परमेश्वरानें ज्याला शहाणपण, सद्गुण, व समाधानवृत्ति, हीं दिलीं आहेत, तोच खरा सुखी, व त्याचेंच खरं खरं धैर्य. कोणतंही संकट आलं, तरी तो आनंदीच असणार. आजचाच आरोपी पहा. दुनयेमध्यें प्राणापेक्षां प्रिय वस्तु कोणतीच नाहीं, पण या पुरुषाला त्याची कांहींच किंमत नाहीं. केवळ परदुःखानें कळवळून कोणत्याही स्वार्थाकडे दृष्टि न ठेवितां व एक अक्षर खोटं न बोलतां आपिला प्राण खर्च करण्यास जो आनंदानं तयार झाला, अशा पुरुषाला ह्मणावं तरी काय ? का याला सांग ह्मणावं, किंवा गुन्हेगार ह्मणावं, किंवा शूर वीर ह्मणावं, किंवा महासाधु ह्मणावं, किंवा योगीराज ह्मणावं ? खुरोखरीं कांहींच अक्कल चालत नाहीं. मनुष्याचा त्याच्या उंच वर्णाचा अभिमान अगदीं व्यर्थ आहे. परमेश्वर कोणत्या वर्णांत, कोणत्या स्थितींत, कोणा विभुतीच्या ठिकाणीं, कायकाय अलौकिक गुण ठेवील, याविषयीं मानवी प्राण्याचा कांहींच तर्क चालावयाचा नाहीं. प्रत्यक्ष मातोश्रीकरितां प्राण खर्चणारे विरळा. त्यांत अगदींच परकीय, जात नाहीं, संबंध नाहीं, ओळख सुद्धां नाहीं, अशा एका अनाथ स्त्रीची कींव येऊन तिचा प्राण सोडविण्याकरितां प्रत्यक्ष आपल्या प्राणावर

ज्यानें संकट ओढून घेतलं, असा मनुष्य परमेश्वराच्या येथें किती धन्यतेचा गणला जाईल? पण हें न्यायाचं काम घेतल्यापासून गुन्हेगार ठरवून पहिली प्राणांत शिक्षा अशा देवपुरुषाला देण्याची पाळी मजवर यावी-ना! परमेश्वराची इच्छा. असा सुंदर, तेजःपुंज व विलक्षण वैराग्यशाली पुरुष मांगजातीमध्यें कसा निर्माण झाला, हीच मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. मला वाटतं, त्याला दुसरं कोणी नसावं, ह्मणूनच त्याला आपल्या जिवाची अपेक्षा नाहीं; किंवा याची आई व बायको असल्यास, याचं तें सर्व कुटुंब याच्याच प्रमाणें ऐहिक सुख तुच्छ मानून जनांस परोपकारव्रत शिकविण्याकरितां कोणी संतमंडळी अवतरली असावी. अहाहा!!! काय हें अपूर्व कुटुंब! असल्या कुटुंबाचा समागम तरी किती आनंदाचा होईल! पण करावं काय, ही लोकलज्जा आड येत आहे; नाहींतर मी हें सर्व ढोंग व त्याचे व्याप सोडून यांच्या सहवासांत सद्गुणांच्या पूर्ण आनंदांत काळ घालविला असता. [हुजऱ्या येतो.]

हुजऱ्या—सरकार, प्रधानसाहेबांची स्वारी आली.

कमलिनी—(नीट हुशार होऊन दरवाज्यापर्यंत जाते.) यावें प्रधानसाहेब, (वसंतमाधव येतो. बसतो. कमलिनी बसते.)

वसंत०—कां न्यायाधीशसाहेब, काय चाललें होतें?

कम०—कांहीं नाहीं. आज मजसमोर एक आ-

रोपी आला होता त्याच्या संबंधानें विचार करीत होतों. मी आपलें नांव सांगून त्याला आपणांकडे पाठविलें होतें. तो आला होता ?

वसंत०—होय, आला होता, व त्यास मी जामीनही राहिलों. मित्रा, तुझ्या नांवाची शिफारस ज्याणें आणिली, त्याला वसंतमाधव मान देणार नाहीं अशी गोष्ट कधीं तरी होईल काय ?

कम०—बरें केलेंत; नाहींतर मी त्याकरितां ह्मणून मुद्दाम येणार होतों. फारच भला मनुष्य. याचेंच० नांव परदुःख जाणणें. असल्या पुरुषाचे आईबाप खरोखरी धन्य आहेत.

वसंत०—चंद्राकरा, असा मनुष्य खरोखरी माझ्याही पाहण्यांत आला नाहीं. आपल्यापेक्षां त्याची योग्यता अधिक असावी, असें त्याला पाहिल्याबरोबर माझ्या बुद्धीला वाटतें. आज मला आनंद वाटण्याजोगें काम तूं केलेंस. त्यानें सोडविलेल्या बाईची हकीकत मला कळली आहे. प्रांतन्यायाधीशसाहेबांनीं केवळ कागदी पुरावा न घेतां चांगला सारासार विचार केला असता, तर त्या निरपराधी बाईवर फांशीचा प्रसंग येताना व आजचा मनुष्यही संकटांत पडताना. तुझा उपाय न्हता; त्यांतूनही तूं केलेंस तें योग्य केलेंस. बहुधा सरकारस्वारी त्याला गुन्हा माफ करितील. सरकारच्या पोटीं दया आहे, व तुजविषयीं त्यांचें फारच चांगलें मत आहे.

कम०—तो सुटेल तर फारच चांगलें होईल. चांगल्या मनुष्याला देहांत शिक्षा दिली, याबद्दल माझें मन मला खात आहे.

वसंत०—त्याविषयीं तूं काळजी करूं नकोस. फार करून तो सुटेलच. बरें, दुसरें कांहीं नवल विशेष तुझ्या कानावर आलें आहे काय ?

कम०—कशाबद्दल ?

वसंत०—श्रीमतीच्या विवाहाबद्दल? बाळासाहेब सरकारचे भाचे यांच्याविषयीं विचार चालला आहे. पण तो श्रीमतीच्या मनास येत नाहीं.

कम०—मी असें ऐकिलें आहे कीं, ती मुळींच लग्न करावयाचें नाहीं ह्मणते.

वसंत०- असेल, पण बाळासाहेब तिच्या मनास येत नसेल ही गोष्ट खरी. कारण तिचें शहाणपण, समजूत व लहान वयांतच भारदस्तपणा, यांचा विचार केला तर तो खुळा तिच्या अगदींच योग्यतेचा नाहीं.

कम०—खरेंच, तिच्याअनुरूप जर त्याचा स्वभाव नसला तर तिनें आईबापांकरितां का आपला सारा जन्म क्षणोक्षणींच्या मानखंडणा व नाना अपेष्टा यांमध्यें घालवावा ? आपण पुरुषांनीं पाहिजे तें करावें व तें चालतें. त्यांनीं मात्र गरीब गाईप्रमाणें जे जे हाल व जोजार होतील ते मुकाट्यानें सोसावेत. हा कोठला न्याय ?

वसंत०—तुझें ह्मणणें खरें आहे. गुणांनीं स्त्रीपेक्षां जर पती अधिक आहे तरच त्या स्त्रीपुरुषांचें प्रेमसुख आणि त्यांचें संसारसुख.

कप०—आणि स्त्रीलाही त्यामुळें विशेष शोभा येते. पतीच्या गुणांनीं व तेजानें स्त्री कशी नम्र व त्याच्या ठिकाणीं प्रेमयुक्त पूज्यभाव धरणारी होते; आणि असें झालें तरच जन्माच्या संबंधाचें बीज.

वसंत०—महाराजसाहेबांच्यानें तिच्या मर्जीविरुद्ध वागवत नाहीं. परवां या संबंधानें ते मजपाशीं बोलत होते. तेंव्हां तुजविषयीं त्यांचा विचार दिसला. चंद्राकर, मला वाटतें, श्रीमती तुला मोठ्या खुषीनें पसंत करील.

कप०—( हंसत ) वसंतमाधव, माझी पूर्ण खात्री आहे कीं ती माझ्यापेक्षा आपणांलाच फार फार खुष होईल.

वसंत०—मजबद्दलची गोष्टच नको. कारण, मागें माझे वडील असतांनाच माझ्याविषयीं महाराजसाहेबांनीं गोष्ट काढिली होती. पण आमच्या बाबांना कोणी-एकानें सांगून ठविलें होतें कीं माझें लग्न पंचविसाव्या वर्षापर्यंत करूं नये. आमचे बाबा फार पापभीरू होते. त्यांनीं या भोक्यामध्यें न पडण्याबद्दल तेंव्हांच अर्ज केला. त्यावरून महाराजसाहेबांनींच तो नाद तोडून दिला. ही हकीगत मला कळल्यापासून एखाद्या अबलेला कुढविण्याचें माझ्या मनांत येत नाहीं. मुली पुष्कळ येतात. परमेश्वरकृपेनें पंचविसावें वर्ष पाहिलें, तर मग लग्नाचा विचार.

कप०—असीच माझी हकीगत आहे. मलाही बाविसावें वर्ष संपण्यापूर्वीं लग्न करण्याचें मनांतही आणूं

नये, असें एकानें सांगून ठेविलें आहे. त्यामुळें विरक्त होऊन देशाटन करण्याकरितां ह्मणून मी निघालों होतों.

वसंत०—मग महाराजसाहेबांना मोठी काळजी आहेतर तूर्त. पण तुझी माझी मात्र ठीक जोडी आहे, आणि आपली मुदतही जवळ आहे. चंद्राकरा, तसा दिवस आलाच तर आपणा उभयतांना ज्या स्त्रिया करावयाच्या त्या आपल्या दोघांच्या विचारानें पसंत करूं, आणि आपलीं लग्नेंही एकाच दिवशीं बरोबर करूं. मग आपण खरेखरे मित्र, आणि राहूंही एकाच ठिकाणीं. आहाहा!!! आपण दोघे आपापल्या पत्नींसहित एकाच ठिकाणीं राहिल्यावर किती आनंदाचे दिवस जातील! जसें आपलें प्रेम तसेंच आपल्या स्त्रियांचेंही एकमेकींवर प्रेम, मग आनंदाला काय कमी!

कम०—( हांस्यवदन करून ) वसंतमाधव, या गोष्टी फार कठीण आहेत. आपल्या मनांत लग्न करावयाचें आलें आणि तें केलेंत, मग तुमच्या नव्या नव्या राणी साहेब मजसारख्या मित्रांना आपणांजवळ थाराही करूं देणार नाहींत, आणि आपणांलाही माझी आठवण व्हावयाची नाहीं. बोलण्याचालण्यांत व्यर्थ वेळ घालविणारे आमच्या सारखे स्नेही त्यांना वैऱ्याप्रमाणें भासतील.

वसंत०—चंद्राकर, ही तूं आपली गोष्ट सांगतोस वाटतें? मी तर कधीं असें करणार नाहीं. हें घे वचन.

( कमलिनी हांसत हात पुढें करिते. वसंतमाधव हातावर हात

मारितो. ) तूं व मी नेहेमीं एके ठिकाणीं राहूं, असें जिला पसंत असेल तिच्याशींच मी लग्न करीन. तूं दे आतां वचन. ( कमलिनी वचन देते. )

कम०—मी तर वचन मोडणार नाहींच, किंवा लग्न-च करणार नाहीं. पण आपला मात्र भरंवसा नाहीं. एखाद्या मृगाक्षीच्या नेत्रकटाक्षांत सांपडलांत, कीं मग या चंद्राकरासारख्या मित्राचें नुसतें स्मरणसुद्धां रहावयाचें नाहीं.

वसंत०—इतका का तूं मला चंचळ बुद्धीचा समजतोस चंद्राकर?

कम०—चंचळ बुद्धीचे असें नाहीं. हा प्रकारच तसा आहे. या कामांत पुरुषमात्र गडबडण्याचा संभव आहे. असो, या पुढच्या गोष्टी आहेत. ( हांसत ) तूर्त विडे तर खा. [ विडे देते व आपणही खाते. ] आज आपण बराच वेळ बोलत बसलों. आज कोणीकडे फिरावयास जायचें.

वसंत०—जिकडे तुझी मर्जी लागेल तिकडे.

कम०—चला तर. ( उठतात. जातात. ).

---

## प्रवेश तिसरा.

### स्थळ:—राजवाडा.

( राजा बसला आहे. जवळ हुजऱ्या आहे. )

राजा—अरे, शास्त्रीबुवा आले आहेत काय?

हुजऱ्या [ हात जोडून ] जी आले आहेत.

राजा—बोलाव त्यांना. [ हुजऱ्या जातो. शास्त्री येतो. मुजरी करितो. राजा उठून बसतो. ) यावें शास्त्रीबुवा, बसा. ( शास्त्री बसतात ) शास्त्रीबुवा, या पोरीनें मला मोठी काळजी लाविली आहे. बाळासाहेब तिच्या मनास येत नसल्यानें म्हणून चंद्राकर न्यायाधीश यांच्याविषयीं दिवाणसाहेबाकडून गोष्ट काढविली. परंतु तेथही जमत नाहीं. आतां करावें तरी काय?

शास्त्री—( हात जोडून ) सरकार, न्यायाधीश व दुसरे तिसरे पाहण्याची जरूरच जेआहेत्त काय आहे? आपण कां काळजी करितां? काळजी करण्याचें कांहीच कारण नाहीं.

राजा—कां! तुम्हीं माझ्या ताईची समजूत केली वाटते?

शा०—अजून पक्कें नाहीं, पण होईल जेआहेत्त. धीर धरिला पाहिजे. सरकार, दुसरी तिसरी योजना करण्याचें बिलकुल कारण नाहीं. चंद्राकर न्यायाधीश कितीही चांगले व विद्वान असले, तरी ते जेआहेत्त परस्थ. त्यांचे कुळ, गोत, खानदानी वगैरे आपणांला खरीखरी माहीत नाहींत. ते सांगतील त्यावर विश्वास ठेवावयाचा. असल्यांना अधिकाराचीं कोणतीही कामें देण्याचा अधिकार सरकारचा आहे, पण शरीरसंबंधाच्या कामांत आपण नाहीं जेआहेत्त अशांशीं गांठ घालूं देणार. मग खरें सांगितलें याबद्दल सरकाराला राग आला तरी पत्करलें. सरकार, बाळासाहेबच जेआहेत्त योग्य स्थळ. मी पुष्क-

क विचार केला. सर्व गोष्टींनीं असें चांगलें स्थळ दुसरें मिळणेंच नाहीं.

**राजा**—शास्त्रीबुवा, दुसऱ्या सर्व गोष्टी चांगल्या असल्या तरी बाळासाहेब तिच्या मनास येत नसेल हें खरें, आणि ह्मणूनच तिला निक्षून सांगून तिचें मन दुखवितां येत नाहीं. शास्त्रीबुवा, माझ्या ताईचें रूप व तिचे गुण किती किती ह्मणून तुह्माला सांगूं? परमेश्वरानें माझ्या नशिबीं तें सुख दिलें नाहीं. वडेमहाराजसाहेबांना ताईजोगा पुत्र असता, तर ते किती आनंदानें माझ्या ताईला आपली स्नुषा करिते? मी मांडलिक होऊन त्यांचा व्याही झालों असतों. माझी लाडकी मजवर सार्वभौम चक्रवर्तिनी झाली असती. आणि तें दोघांनीं पाहून मला किती आनंद झाला असता! परंतु तें नाहीं या नशिबीं. परमेश्वराची मर्जी!!! राज्याकरितां ह्मणून बाळासाहेबाला द्यावयाची ह्मणतों.

**शा०**—सरकार, ताईसाहेबांचें मन मोडून कोणतीच गोष्ट जेआहेत्ते कर्तव्य नाहीं. पण यांहीं अवकाश आहे, कांहीं अडथळा आहे तो ईशकृपेनें नाहींसा झाला, ह्मणजे त्याच होऊन बाळासाहेबांना पसंत करितील; आणि एवढ्यासाठींच जेआहेत्ते त्यांना मी एव्हां कांहीं सांगूं शकत नाहीं.

**राजा**—काय शास्त्रीबुवा, कांहीं अडथळा आहे? असा कोणता अडथळा आहे तो सांगा पाहूं.

**शा०**—सरकार, (हात जोडून) आपणांपर्यंत सांगण्या-

सारखें नाहीं. जेअहेत्ते आपलें कार्य झालें ह्मणजे झालें. बाकी गोष्टींशीं आपणास काय कर्तव्य आहे? परमेश्वर-कृपेनें अनायासेंच तो अडथळा दूर होत आहे, मग कां तिकडे लक्ष्य द्यावें?

राजा०—तें खरें शास्त्रीबुवा, पण माझ्या मुलीच्या लग्नांत कसला अडथळा आहे, व तो करणारा कोण, हें तर समजलें पाहिजे? आश्चर्य आहे. सांगा काय आहे तें.

शा०—( हात जोडून ) सरकार, इतकें मात्र होऊं नये. जेआहेत्ते आपण तें एकूं नये हेंच बरें आहे. त्यापासून आपल्या मनाला असमाधान होणार आहे. शिवाय, ऐकींव गोष्टीवर भरंवसा ठेवणें चांगलें नाहीं. आपलें कार्य झालें ह्मणजे झालें जेआहेत्ते.

राजा—इतकें काय गूढ आहे तें समजलेंच पाहिजे. माझ्या गळ्याची शपत आहे शास्त्रीबुवा तुह्माला, सांगा.

शा०—शिव शिव!!! हें काय सरकार! जेआहेत्ते माझीच चूक झाली. ( तोंडांत मारून घेतो. ) मीच चुकून बोललों नसतों तर ही वेळ कां येती? जेआहेत्ते ह्मणतातना, कीं भिक्षुकें बिचारीं भोळीं बापुडीं, त्यांना धोरण नसतें, तें अगदीं खोटें नाहीं. आजच जेआहेत्ते खराखरा अनुभव आला. मूर्ख बेटे आह्मी.

राजा—शास्त्रीबुवा, कांहीं संकोच धरूं नका. जें असेल तें सांगा. तुमच्याकडे काय आहे त्याचें? हें पहा,

एखादा माझ्या वाईटावर असला आणि तें तुम्हांला कळलें, तर तुम्ही तें मला सांगूं नये काय?

शा०—सरकार, सांगतों तर. दुसऱ्यास समजण्यापेक्षां आपणांस समजणें वाईट नाहीं. पण जेआहेत्ते ऐकीव बातमी आहे. भरंवसा ठेवितां येत नाहीं. त्यातून माझा तर काडीचाही भरंवसा नव्हता. आपणाला नाहीं बुवा वाटत अशी गोष्ट असेलशी; पण थोडा प्रत्यय आला ह्मणून जेआहेत्ते भरंवसा ठेवावा लागतो. सरकार, आपण कोणापाशीं बोलणार नाहींत, किंवा दिसण्यांतही आणणार नाहींत, असें वचन मिळालें तर सांगतों. अजूनपर्यंत मलाच काय तें माहीत आहे. पण बुवा खरें असेल तर अधमाच्या धाडसाचें जेआहेत्ते मोठें आश्चर्यच आहे. ( धिकार युक्त ), आहाहा!!! मांत्र बेटा. यांत आश्चर्य मुळींच नाहीं. जातीप्रमाणेंच बद्धि आणि कर्म. त्यांना काय प्रत्यक्ष अन्नदाता आणि भूपति! सरकार, ( हात जोडून ) सागूंच तर? पहा बरें, माझा गरीब ब्राह्मणाचा मात्र जेआहेत्ते विनाकारण नाश होईल.

राजा०—सांगा. अगदीं भिऊं नका. माझ्यासमोर तुमचा नाश करणारा कोण आहे?

शा०—जेआहेत्ते आग्रहच आहे, आणि त्यांतून गळ्याची शपथ घातली आहे, तेव्हां सांगणें भागच आहे. ( राजाच्या कानाशीं लागून सांगतो. ) पण ( हात जोडून ) कोणाल्हीही याची ओळख द्यावयाची नाहीं बरें.

राजा०—त्याविषयीं काळजी करूं नका. ( स्तब्ध राहतो )

शास्त्रीबुवा, एकून कार्टी अशी लाजलाची निघालीना! अवदसे, मज राजाच्या पोटीं येऊन माझाशीं रत झालीस! आग लागो तुझ्या तोंडाला. शास्त्रीबुवा, मला आतां तिचा अगदीं तिटकारा आला आहे.

शा०—( जरा जोरानें व रागानें ) हेंच जआहेत्ते. आणि याचमुळें मी सांगत नव्हतों. झालें तें झालें. आतां त्याचें कशास पाहिजे. अशानें जेआहेत्ते आपल्यांच मुखानें आपला दुर्लौकिक मात्र होणार आहे. दुष्टाचें पाप भरलें, परमेश्वरानें पारिपत्य केलें. झालें जेआहेत्त. आतां त्याविषयीं उद्गार काढण्याचें कारणच काय?

राजा०—पारिपत्य तें काय झालें?

शा०—त्यानें जेआहेत्ते कपटानें खोटे फांस करून फांशीची देहांत शिक्षा झालेल्या गुन्हेगाराचा प्राण वांचविला. काय जब्बर छाती ही! याबद्दल तुरुंगावरील अधिकारीसाहेब यांजकडून मागाहून जेआहेत्ते चौकशी झाली. त्यावरून तो प्रकार खरा ठरला. त्यामुळें त्याजवर राजद्रोहाचा आरोप येऊन खटला झाला, व इनसाफ होऊन कायद्याप्रमाणें त्यास देहांत शिक्षाही झाली आहे. कायद्यापुढें उपायच नव्हता; नाहींतर ते नवे आलेले अतिशहाणे न्यायाधीश यांना हा दुष्ट हरामखोर मोठा भला व सज्जन मनुष्य वाटला, ह्मणून त्यांनीं त्यास सोडून दिलें असतें. तरी त्यांनीं दिलेली शिक्षा माफ व्हावी ह्मणून जेआहेत्ते आपणाकडे शिफारस केली आहे. आणि न्यायाधीशाच्या नादीं

लागलेले ते दीड शहाणे वसंतमाधव दिवाणसाहेब या चोरास एक लक्षाचे जामीन राहिले आहेत, व त्यास अगदीं मोकळें ठेविलें आहे. जेआहेत्ते आपणांसमोर कागद येतील तेव्हां सर्व कळेलच. ( हात जोडून ) पण सरकार, ही कोठली न्यायाची रीत? आपण नाहींत बुवा कधीं ऐकिल्या अशा गोष्टी.

राजा०—काय? वसंतमाधव एक लक्षाचा जामीन राहिला आहे? आश्चर्य आहे. बरें, पाहून घेईन. कैदी तर पळूं द्या, कीं तीच शिक्षा जामिनाला. त्या चांडाळाला जामीन राहण्यावांचून याचें काय अडलें होतें? आतां करावें तसें भोगावें.

शा०—( हांसत ) न्यायाचीच गोष्ट आहे जेआहेत्ते. पण बरें झालें कीं, सुंठीवांचून खोकला गेला, आणि आपलें कार्य होईल. बदनामी होण्याचेंही चुकलें. त्याबद्दल आतां जेआहेत्ते गोष्टच काढणें नको. तो दुनयेंतून गेला ह्मणजे बाळासाहेबांना ताईसाहेब आपणच होऊन पसंत करितील. आपण काळजी करूं नये.

राजा०—शास्त्रीबुवा, तुह्मी ह्मणतां तसें होईल खरें, तुमचा तर्क बरोबर आहे. थोडी काळजीही कमी झाली.

शा०—( हात जोडून ) सरकार, आतां आज्ञा?

राजा०—चालला? बरें. ( शास्त्री उठून मुजरा करितो. राजा उठल्यासारखें करितो. शास्त्री जातो. राजा आपल्याशींच ) मुलीचा मी केवढा अभिमान वहात होतों? पण कार्टीनें मला खालीं पाहण्याची वेळ आणिली. शास्त्रीबुवा सा-

रखा ताब्यदार मनुष्य मला कांहींतरी बनवून सांगेल, असें कधींच व्हावयाचें नाहीं. दुसरें, बाळासाहेब एक तिच्या मनास येत नसेल, पण ती मुळींच लग्न करायचें नाहीं ह्मणते, तेव्हां शास्त्रीबुवा ह्मणतात तो प्रकार असला पाहिजे खरा. यांत संशय नाहीं. ( स्तब्ध राहतो. ) काय कार्टीचें धाडस! अवदसे, तूं मेलीस तरी आतां मला त्याचें वाईट वाटणार नाहीं. शिव शिव!!! ( मोठ्यानें ) कोण आहे रे?( हुजऱ्या येतो. ) स्वारीची तयारी आहे?

हुज०—( हात जोडून ) जी सरकार. (राजा उठतो. जातो. हुजऱ्या जातो. )

( पडदा पडतो )

## तिसरा अंक समाप्त.

# अंक चवथा.

## प्रवेश पहिला.

स्थळः—बाळासाहेबाचा वाडा.

( शास्त्रीबुवा व हैबतराव बाळासाहेबाची वाट पहात बसले आहेत एक हुजऱ्या जवळ आहे. )

**शास्त्री**—कायरे? बाळासाहेब केव्हां येतील?

**हुजऱ्या**—गुरुमहाराज, आतां येतील. जरा थोडा वेळ बसा.

**शा०**—अरे, स्वारी यावयाला झाली किंवा नाहीं तें पाहून ये बरें. ( हुजऱ्या जातो. ) कां? हैबतराव, बहु-

तेक काम जेआहेत्ते अगदीं सुयंत्र झालें. सटवाजीची शिक्षा महाराजसाहेबांनीं कायम केली. दिवसही नेमिला गेला. हें पहा, सरकारपाशीं तुमच्या हुशारीबद्दल मी फारच शिफारस जेआहेत्ते केली बरें. आणि सरकारस्वारीही फार प्रसन्न झाली.

हैबत०—शास्त्रीबुवा, हे सर्व आपले उपकार आहेत. आपण हातार्शी धरिलें ह्मणून या सर्व गोष्टी, आणि चांगलाच उदयकाळ येण्याची आशा.

शा०—जेआहेत्ते तुह्मी थोडा धीर धरा; ह्मणजे तुह्मीच ह्मणाल कीं, शास्त्रीबुवांनीं माझें फारफार कल्याण केलें. आजच पहा तुह्मांला दोन हजार रुपये बक्षीस देववितों. आणखी एक हजार जास्त देण्याबद्दल मी आपले कडून जेआहेत्ते शिकस्त करीन, पण खाजी नाहीं हो देत. कारण, बाळासाहेब जरा कंजुष मनुष्य आहे.

हैबत०—शास्त्रीबुवा, बाळासाहेबांची मर्जी दुखवूं नका हो. न मिळालें बक्षीस ह्मणून काय झालें? आपणांला पुढची उमेद आहे कीं नाहीं. ते खुषीनें देतील तें पुष्कळ आहे.

शा०—तें खरें, पण तुमच्या मेहनतीप्रमाणें तुह्मांला कांहींच का नको जेआहेत्ते? निदान पांच हजार तरी मिळाले पाहिजेत. पण हा बाळासाहेब कोठला द्यावयाला? मी तिहींबद्दल होईल तितकें करीन, पण दोन हजार तर देववीनच. त्यानें न दिल्यास मी जेआहेत्ते आपल्या पदरचे घालून पुरे करून देईन. मला स्वताला जेआहेत्ते

कसलीच अपेक्षा नाहीं. केवळ अन्नवस्त्रामध्यें आह्मी आनंदी. इतकेंच, आपल्याकडून होईल तितकें तुमच्यासारख्यांचें बरें करावें. हैबतराव, दुनयेमध्यें येऊन करावयाचें आहे काय दुसरें? मनुष्यमात्रावर उपकार करावे, यांतच जेआहेत्ते आह्माला सुख आहे. बरें पण हैबतराव, रुपयांबद्दलची गोष्ट तुम्ही स्वतः जेआहेत्ते काढूं नका हो. मीच तें सर्व करीन. स्वतः मागण्यानें आपलें महत्व रहात नसत. इतकेंच नाहीं, तर त्या गोष्टी तुमच्यासमक्ष होणेंसुद्धां चांगलं नाहीं, या साठीं मी इषारा केल्यावर तुह्मी कांहींतरी निमित्यानें उठून जावें. मग मी आहें आणि जेआहेत्ते तो बाळासाहेब आहे. फार वेळ झाला. स्वारी केंव्हां येते कोणजाणे. (हुजऱ्या येतो.)

हुज०—शास्त्रीबुवा. यजमानसाहेब आले. (बाळासाहेब येतो; शास्त्रीबुवा व हैबतराव उठून मुजरा करितात. बाळासाहेब बसतो. ते बसतात. हुजऱ्या जातो.)

बाळा०—कां शास्त्रीबुवा. फार वेळ बसलां आहांत वाटते?

शा०—छे, छे, नुकताच जेआहेत्ते आलों. (हंसत) सटवाजीची शिक्षा कायम होऊन दिवसही जेआहेत्ते ठरला. आतां काम खात्रीनें झालें असें समजा. महाराज साहेबांचें ह्मणणें चंद्राकर न्यायाधिशाविषयीं होतें, पण मीं तें अगदीं हाणून पाडिलें, आणि तुमच्याविषयींच सरकारच्या मनांत पक्कें भरवून दिलें. त्याचवेळेस सटवाजीवरील खटल्याची गोष्ट निघाली होती. तेंव्हां वसंत

माधव अव्वल दर्जाचा मोठा सरकारी अमलदार असून मांगाम जामीन राहिला, यामुळें सरकारस्वारी फारच जेआहेत्ते रागावली होती. गुन्हेगार पळून गेल्यास तीच शिक्षा जामिनाला देईन असेंही ह्मणत होते.

बाळा०- छानदार गोष्ट होईल. वसंतमाधव फांशी गेला तर मी सहस्र ब्राह्मणभोजन घालीन. भरलेंच गुलामाचें. फार माजला होता.

शा०--त्याच्याशीं तर जेआहेत्ते आपणांस काय कर्तव्य आहे? अनायासें आपला अडथळा गेला. आतां हजारहिस्से यंदांच कार्य होईल. पण बाळासाहेब, हें सर्व श्रम (बोट दाखवून) हैबतरावाकडे आहे हो. खोटें फांस करून कैदीचा प्राण वांचविण्याची युक्ति यांनींच जेआहेत्ते सटवाजीस शिकविली, आणि पारही पाडिली.

बाळा०—खरेंच. हैबतराव, तुह्मी मोठें काम केलेंत. फारच नामी युक्ति लढविली.

हैबत०--आपली कृपा. अशीच कृपानजर पुढें रहावी.

बाळा०--हैबतराव, मला राज्याचा अधिकार मिळाल्यावर शास्त्रीबुवा माझा उजवा हात आणि तुह्मी डावा हात. तुमच्या दोघांशिवाय तिसऱ्यावर भरंवसाच ठेवणार नाहीं. (शास्त्री इषारा करितो.)

हैबत०--[हात जोडून] आतां आज्ञा होईल? पहाऱ्यावर लोक नेमण्याची वेळ झाली.

बाळा०--बरें तर, जा तुह्मी. रोज येत जाहो.

[ हैबतराव मुजरा करून जातो. ]

शा०--बाळासाहेब, हैबतरावाला श्रीमतीसंबंधी सर्व गोष्टी जआहेतें म हीत आहेत. तेव्हां त्याला आतां अगदीं आपला करून ठेविला पाहिजे.

बा०--खरेंच, सटवाजी मेल्यावर त्याचा प्रकार फक्त आपणा तिघांनांच काय तो माहीत; काय सांगूं शास्त्रीबुवा ? या अवदसेची वर्त्तणूक मनांत आली ह्मणजे माझ्या अंगाची अगदीं आगआग होऊन जाते. पण काय करूं ? राज्य मिळवावयाचें आहे. मामासाहेब मरून राज्य माझ्या हातीं येऊं द्या कीं, या रांडेचे हाल हाल करून तिला मारीन, आणि मी दुसरी राणी करीन. अशी जारकर्मी राणी मला राजाला कामाची नाहीं. शास्त्रीबुवा, मला राजाला हो काय राण्यांचा तोटा? दुसऱ्या दिवशीं तिच्या सारख्या दहा राण्यांचा नवरा होण्याचें मनांत आणीन तर मी तें तेव्हांच करीन. अवदसेला मांग आवडतो नाहीं ? बरें. शास्त्रीबुवा, लग्न झालें कीं मामासाहेब असले तरी तिला मी अगदीं डोळ्याच्या धाकांत ठेवीन. भिणार नाहीं. मामासाहेब राजे झाले ह्मणून काय झालें ? मी तर तिचा नवरा आहे. धर्मशास्त्रानें मामासाहेबांना आह्मा नवराबायकोच्या कामांत बोलण्याचा बिलकूल अधिकार नाहीं.

शा०--जआहेत्ते स्त्रीची खोड मोडण्यास किती उशीर? वेळ आल्यावर सर्व कांहीं होऊन जाईल. तुह्मांला सां-

गावयाला नको. बरें, पण हैबतरावाला चांगलेंसे बक्षीस दिलें ह्मणजे तो जेआहेत्त अगदीं आपला होऊन जाईल. मला वाटतें त्याला निदान पांच हजार तरी द्यावेत, ह्मणजे तुमच्या नांवलौकिकाप्रमाणें त्यालाही बरें वाटेल.

बाळा०--( नाक मुरडून ) अं. त्यांत काय आहे? क्षुल्लक गोष्ट. पण तुह्मालामात्र चांगलें इनाम दिलें पाहिजे.

शा०--शपत आहे माझ्या गळ्याची. मी एव्हां अगदीं कांहीं घेणार नाहीं. एकदां लग्न झालें मग त्याचा विचार. जेआहेत्त आतांच काय आहे त्याचें?

बाळा०--आजच हैबतरावकडे पांच हजाराची रकम बक्षीस पाठवितों.

शा०--छे, छे, भलतेंच? तसा प्रत्यक्ष तुमचे जवळून तो मुळींच घेणार नाहीं. मनुष्याला मुरवत आहे कीं नाहीं बाळासाहेब? त्यामळें असें घेतां येत नाहीं जेआहेत्त. माझेमार्फत सुद्धा हैबतराव घेणार नाहीं. पण मी तें करीन. तरी रकम मजकडे पाठवा, ह्मणजे मी ती युक्तिप्रयुक्तीनें त्याजकडून घेववीन.

बाळा०—हो खरेंच, तो मला भीत असेल. (मोठ्यानें) कोण आहेरे? (हुजऱ्या येतो त्यास) जारे कारभाऱ्यांना बोलाव. [ हुजऱ्या जातो. ]

शा०—जगदीश समर्थ. वासुदेव, वासुदेव. (बा-

ळासाहेब शास्त्रीबुवास विडे देतो व आपण खातो. इतक्यांत कारभारी येतो. मुजरा करून अदबीनें हात जोडून उभा राहतो.)

वाळा०—कारभारी, आजच्याआज शास्त्रीबुवांकडे पांच हजार रुपये पाठवा.

कार०—( हात जोडून ) इतकी मोठी रकम खर्च कोणीकडे घालावयाची?

शा०—जेआहेते धर्मादायखातीं घाला.

वाळा०—हो, धर्मदायखातींच खर्च घाला.

कार०—जी, आज्ञा. ( मुजरा करून जातो. )

वाळा०—शास्त्रीबुवा, खाशी युक्ति काढिली.

शा०—अहो, बक्षीस ह्मणून खर्च घालितां येत नाहीं. कोणाला, कशाकरितां बक्षीस दिलें, वगैरे नानापंचायती नोकरमाणसें करणार, तें जेआहेते कामाचें नाहीं.

वाळा०—जुन्या लोकांची अकलच वेगळी! शास्त्रीबुवा, तुमच्या सारखीं अनुभवीक माणसें दिवसेंदिवस कमीच.

शा०—चाललेंच आहे. काळाचें मानच तसें आहे. बरें, मी आतां जेआहेते देवदर्शनास जातों. ( उठतो. )

वाळा०—( उठतो. ) चाललां? ( शास्त्री जातो. मागें वाळासाहेब पोंचविण्यास जातो. )

---

## प्रवेश दुसरा.

### स्थळ:—राजकन्येचा महाल.

( श्रीमती व जिजाबाई बसल्या आहेत. )

श्रीम०—जिजाबाई, प्राणनाथांची शिक्षा खरोखरीच कायम झालीना?

जिजा०—बाईसाहेब, दिवससुद्धां नेमिला. काल त्यांच्याकडे जाऊन विचारून आलें. आपणाला भेटायला मात्र त्यांनीं बोलावलं आहे.

श्रीम०—दिवसही नेमिलाना? (स्तब्ध राहते व द सासा टाकून मनाशींच) देवा, पतीपासून होणारीं सर्व सुखं राहिलीं, पण ते आहेत इतक्यानेंच मी पुष्कळ आनंदामध्यें होतें, परंतु तेंही तुझ्यानें पाहवलं नाहींना? अरे, वर्षांची गोष्टच सोडिली, पण कांहीं मासतरी केवळ दर्शनाचंच सुख मला भोगूं द्यावयाचं होतंस. इतक्यांतच अशी वेळ आणावयाची नव्हतीस. (उघड) जिजाबाई, आतां आमचं चरित्र संपलं बरं.

जिजा०—बाईसाहेब, एकेक मला डोळ्यांसमोर दिसत आहे तें काय सांगू? पण बाईसाहेब, त्यांना शिक्षेबद्दल कांहींच वाटत नाहीं.

श्रीम०—जिजाबाई, वाटणार काय? अहो, पूर्ण वैराग्य जेथें नांदत आहे, तेथें तुह्मांआह्मांसारख्यांच्या दुःखाला व मोहाला थारा कोठून मिळणार? तरी इतकं फार चांगलं झालं कीं ते अटकेंत नाहींत. शेवटची भेट आणि बोलणं तरी होईल; नाहींतर माझी काय अवस्था झाली असती ती परमेश्वरालाच माहीत. पण देवा, हे या दोघां सत्पुरुषांचे मोठे उपकार आहेत. त्यांच्याच सुस्वभावामुळें माझी व त्यांची शेवटपर्यंत भेट; नाहींतर भेटीसाठीं तळमळ करितां करितां माझा प्राण गेला असता. जिजाबाई, त्यांच्यामागें मी राहणार नव्हतें याविषयीं

शंकाच नव्हती, पण आह्मां दोघांच्या अंतःकरणांत भेटीचा चटका लागून व आमची आशा राहून दुखांत आमचा प्राण जाता. आतां आमची भेट झाली, ह्मणजे आमच्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या. आह्मी दोघं मोठ्या आनंदानें हा लोक सोडून जाऊं आणि निरंतर एकमेकांजवळ राहूं. पण आमचं हें सर्व समाधान या दोघां उदार पुरुषांमुळें. खरोखरीच मोठे महात्मे. जिजाबाई, हे कोणी मागील जन्मीचे माझे कनवाळू बंधू असावेत, ह्मणूनच ते आपल्या भगिनींवरील प्रसंगीं तिचे पाठीराखे झाले. आमचे सर्व हेतु पुरविले. आमच्या अब्रूचं संरक्षण केलं. देवा, मांझ्या या कनवाळू बंधूंचं कल्याण कर. त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण कर. त्यांना सर्व गोष्टींचं सुख दे.

जिजा०—खरंच, त्यांच्याचमुळें आपण आज मजपाशीं आहांत, नाहींतर सत्वशील महाराज अटकेंत असते तर आपल्या मनाची काय अवस्था झाली असती, आणि आपण काय काय करून घेतलं असतं, हें माझ्यानं सांगवत नाहीं. परमेश्वर त्यांचं कल्याण करो. प्रसंगीं अशा रीतीनें अनेकखीं मनुष्याला उपयोगी पडणाऱ्या पुरुषांची योग्यता काय सांगावी?

श्री०—अहो, चांगल्याचा परिणाम चांगलाच. ती जोगीण भली बाई होती, ह्मणूनच माझ्या प्राणनाथांना तिला वांचविण्याची बुद्धि झाली. माझे प्राणनाथही परोपकारीं देह अर्पण करण्यास तयार झाले, हें जाणून

परमेश्वरानें आमचा हेतू पूर्ण करण्याकरितां हे दोघे पुरुष उभे केले. जिजाबाई, आतां आमचा सर्व खटाटोप आटोपला व थोड्याच दिवसांचे तुमचे सोबती आहोंत.- आज प्राणनाथांना भेटून सौभाग्यासुद्धां बरोबर येण्याची आज्ञा मिळाली, कीं मिळविलं सर्व. बरं, तुह्मी आतां जाऊन मी आज संध्याकाळ झाल्यानंतर येईन ह्मणून कळवा, ह्मणजे ते दुसरीकडे जाणार नाहींत. जिजाबाई, इतके दिवस जसं तुह्मी माझं काम केलंत, तसंच मी आहें तेथपर्यंत मला साह्य करा. मी तुमचे उपकार विसरणार नाहीं.

जिजा०–( डोळे पुसून ) बाईसाहेब, काय सांगूं? माझ्यानें बोलवत नाहीं. मी मोठी पापी आहें.

श्री०–तुह्मी अगदीं दुःख करूं नका. परमेश्वर जी स्थिति देईल त्यांतच आनंद मानून राहिलं पाहिजे. दुसरा उपाय नाहीं. तुह्मी भिऊं नका. माझ्या मागें मी तुमची चांगली तजवीज करीन.

जिजा०–बाईसाहेब, आपणांसारख्या यजमानीण साहेब आणि सत्वशील महाराजांसारखे सत्पुरुष थोडेच दिवस ममता लावून शेवटीं एकाएकीं सोडून जाणार, आणि मला दुःखांत पुढचं आयुष्य घालवावं लागणार. यांतून मला कोण सोडवील? ( डोळे पुसते )

श्री०–जिजाबाई, माझ्या धैर्याकडे पाहून तुह्मी धैर्य आणिलं पाहिजे. माझा आणि माझ्या प्राणनाथांचा किती दिवसांचा आणि कशा रीतीचा येथील ऋणानुबंध

परमेश्वरानें नेमिला होता, आणि त्याचा या प्रकारचा शेवट आह्मी किती आनंदानें गोड करून घेत आहोंत, इतकेंच ध्यानांत आणा; आणि परमेश्वरानें तुमचा आमचा ऋणानुबंध तितकाच ठेविला होता तो बदलत नाहीं, ह्मणून कोणतेंही दुःख न करितां आनंदांत असा. दुसरा उपाय नाहीं. जिजाबाई, तुह्मी आतां प्राणनाथांकडे जाऊन यां. मी जरा आईजवळ जाऊन बसतें. [ उठते. ]

जिजा०—हो. ( जातात. )

---

## प्रवेश तिसरा.

### स्थळः—मांगाचें घर.

( सटवाजी एकटाच बसला आहे. )

सट०—[ आपल्याशींच ] आहाहा! ! ! मी नीच मांगजातीचा एक यत्किंचित् मनुष्य होऊन न्यायाधीशसाहेब व प्रधानसाहेब अशा थोर थोर पुरुषांनीं मला जाणिलें. मजवर त्यांचा पूर्ण विश्वास बसला. प्रधानसाहेब तर एक लक्ष रुपयांचे जामीन राहिले, व पुन्हां माझा चांगला गौरव करितात. श्रीमत् पदाच्या संपूर्ण लक्षणांची प्रत्यक्ष प्रतिमाच असल्यामुळें श्रीमती हें नांव जिला यथार्थ शोभतें, अशी अति सुंदर व सत्वस्थ राजकन्या मनोभावें माझी पत्नी झाली. व शेवटीं माझा देह सत्कार्यीं खर्च पडत आहे. आतां मला जिवंत राहण्याची इच्छाच नाहीं. काय तें श्रीमतीविषयीं मात्र वारंवार मनांत येतें. परंतु तीही या प्रसंगीं अगदीं डग-

मगणार नाहीं. गुणांनीं व धैर्यानें मजपेक्षां तिची यो-ग्यता अधिक आहे. तरी तिची भेट झाल्यावर तिनें दुःख न दाखविल्यास मी मोठ्या आनंदानें महाराज-साहेबांच्या समोर विष प्राशन करून प्राण सो-डीन. मला जिवंत राहून तरी काय करावयाचें होतें? पण मुलाच्या भेटीकरितां अगदीं व्याकुल झालेल्या व आज कित्येक वर्षें देशोदेश फिरण्यानें दीन होऊन केवळ अस्थिपंजर उरलेल्या बिचाऱ्या त्या बाईचा जीव वांचला, हें चांगलें झालें. खरेंच, सुदैवानें या बाईचा मुलगा मिळून हीं मायलेंकरें मृत्युलोकीं आनंदामध्यें आहेत, हें पाहून आह्मा दोघांना मोठी धन्यता वाटेल. परमेश्वरा, मला त्या बाईची फारच काकळूत येते. तिची इच्छा पूर्ण कर. (इतक्यांत श्रीमती येते.) यावें. (श्रीमती आपला पुरुषाचा वेष उतरून दाजस ठेविते व नमस्कार करिते. सटवाजी बसण्यास देतो.) बसावें. (दोघें बसतात.) धैर्याची परीक्षा आहे बरं आतां.

श्रीम०--आमचं धैर्य आपल्यावर. वृक्षाचं धैर्य जर ठाम आहे, तर सर्वस्वी त्याजवर अवलंबून असणाऱ्या लतेला कसलीच भीति नाहीं. वृक्षानें मात्र तिचा त्याग करूं नये व तिला एकटी सोडूं नये. तरी चरणांपाशीं हीच प्रार्थना आहे, कीं आपल्यामागें मला दुःखांत तळमळत ठेवूं नये. मला पत्नी केल्यासारखं माझं सौभा-ग्य संभाळावं. मग मला कसलंच दुःख नाहीं.

सट०--श्रीमती, एकून तूंही हा लोक सोडणार तर!

श्री०—प्राणनाथ, जिथें पति, तिथें त्याची सहगामिनी. दोघांची वाट एकच. ज्या मार्गानें पति जाईल त्याच मार्गानें पतिव्रतेनेंही गेलें पाहिजे.

सट०—श्रीमती, तूं विष पिणार ना? (स्तब्ध राहतो.)

श्री०—प्राणनाथ, तें विष नाहीं, अमृत आहे. त्यामुळेंच मी येथील सर्व दुःखांपासून मुक्त होईन व आपल्या निरंतरच्या सहवासामध्यें असेन. पण दिवस कोणता नेमिला आहे.

सट०—आजपासून चवथा दिवस. सोमवारीं सकाळीं सरकार महाराजसाहेब तुझा पिता यांच्या समोर. श्रीमती, थोरमहात्मे न्यायाधीशसाहेब व प्रधानसाहेब यांच्याच मुळें आपली भेट झाली, व आपलें प्रेमाचें बोलणें होऊन परस्परांच्या विचारानें सुखासमाधानामध्यें व अन्नमध्यें आपला अंत होत आहे. हे त्यांचे उपकार कधीं फिटतील ते फिटोत.

श्री०—पण मला आज्ञा आहेना प्राणनाथ?

सट०—श्रीमती, ज्यामध्यें तुला आनंद होत आहे, त्याला मी आड कसा येऊं?

श्री०—मग हाच विचार करावयाचा. आदितवारीं रात्रीं मध्यरात्र उलटल्यावर मी आपणाकडे येईन. येतांना बरोबर विष घेऊन येईन. पहांटेस मी विष प्राशन केल्यावर आपण आपल्या नेमिल्या ठिकाणीं जावं, म्हणजे आपल्या पूर्वी सौभाग्यांत माझा शेवट होईल. बाबांच्यासमोर आपलं देहावसान होत आहे. इतक्यांत त्यांना माझं ठि-

हून ठेविलेलं पत्र येईल, अशी तजविज मी ठेवीन. त्यांत मी आपली मनोभावें पत्नी झालें होतें, परंतु आपले दोघांचे देह अगदीं शुद्ध आहेत, प्राणांतसमयीं चरणांवर मस्तक ठेवण्याशिवाय दुसरा कोणत्याही रीतीनें परस्परांचा अंगस्पर्श झालेला नाहीं, कोणत्याही प्रकारच्या कुतर्कानें मन वाईट करूं नये, व आज पहांटेस सौभाग्याकरितां विषप्राशन केलें, वगैरे कळवून शेवटीं आपल्या व माझ्या देहाचा नंतरचा विधी एकाच ठिकाणीं करावा, व माझे डागडागिन्यांची व माझ्या जिजाबाईची अमुक अमुक रीतीनें व्यवस्था करावी, असें त्यांच्यापाशीं मी शेवटचं मागणं मागेन. प्राण निघून गेल्यावर बाबा म्हणजे मजवर रागावतील, असं मुळींच होणार नाहीं.

सट्वा०—खरेंच, तुझामाझा संबंध तुझे पित्याला कळणें अवश्य आहे. पण तुझे डागडागिने तूं कोणकोणाला देणार?

श्रीम०—माझे दोन दोन लक्षांचे दोन हार आहेत, ते मी न्यायाधीशसाहेब व प्रधानसाहेब यांना देणार. कांहीं आपल्या मित्रांना, कांहीं जिजाबाईला, व कांहीं शास्त्रीबुवांना. त्यांनीं आपली गोष्ट ह्मटल्याप्रमाणें गुप्त ठेविली.

सट०—हें चांगलें केलेंस; पण माझीही थोडी इच्छा आहे, कीं ज्या बाईला मी सोडविलें, तिची कांहीं विशेष तजवीज तूं करावीस. ती कोणी राजघराण्यांतील अथवा कोणा थोर सरदाराची स्त्री असावी. तिच्यावर

आलेला प्रसंग पाहून माझें अंतःकरण फार फार व्याकूळ होतें.

श्री०—अशी काय त्या बाईची स्थिती आहे? आपण सांगाल तशी मी व्यवस्था करीन.

सट०—तिला सर्व हकिगत मीं विचारिली नाहीं. कारण, अब्रूदार व कुलीन माणसाला आपल्या दुर्दैवाची हकीगत दुसऱ्यापाशीं सांगण्यास मोठी शरम व दुःख वाटतें. परंतु मी तिच्या नकळत जे तिच्या तोंडचे उद्गार ऐकिले आहेत, त्यावरून अनुमान करितां येतें.

श्री०—तिचे काय उद्गार होते?

सट०—श्रीमती, ती ह्मणत होती. "देवा, जो "कंठ पूर्वी कोट्यावधी रुपयांच्या रत्नांच्या अलंकारांनीं "शोभविलेला असे, ज्या कंठामधून मोठी सत्ता असून "ही निष्ठुरतेचा शब्द कधीं शपतेलाही निघालेला "नाहीं, पण मधुर भाषणानें सहस्त्रावधींचें पालन करून "त्यांना तोषविलें; आणि ज्या कंठामधून निघालेल्या "शब्दावर अनेकांचे प्राण वांचले, व पुढेंही वांचले "असते, अशा या माझ्या कंठाला आतां नीच जाती "मांगाच्या हातून फांस चढणारना? आणि घोर "विटंबना होऊन माझा प्राण जाणारना? हर हर!!!" श्रीमती; इतकें ह्मणून ती मोठ्या दीन स्वरानें रडूं लागली. त्यानें माझें अंतःकरण फारच कळवळून गेलें. पुन्हा ती म्हणाली. "देवा, मी मरणाला "भीत नाहीं. हालअपेष्टांना भीत नाहीं. परंतु माझा

" बाळ मजपासून दूर होऊन आज सोळासतरा वर्षें
" झालीं. आतां तो मोठा झाला असेल, व थोड्या
" दिवसांनीं मला भेटणार आहे. तरी ही माझी आशा
" राहून जाईल. एकदां मी माझा बाळ डोळ्यांनीं
" पाहिला असता ह्मणजे मी आनंदानें मेलें असतें. मी
" परोपकाराकरितां गरिबांना औषध देतें. पण या
" कुत्सेनें मजजवळून औषध ह्मणून नेलें आणि नवऱ्या-
" ला विष देऊन मारून टाकिलं. व सर्व माझ्यावर
" आणून खरोखरीच माझ्या गळ्याला फांस लाविला.
" देवा, तुजजवळ न्याय नाहीं. मी कोणत्या प्रकारच्या
" थोर योग्यतेची स्त्री! पण माझ्या शरिराला आतां
" नीच मांगाच्या हाताचा स्पर्श होईल, तो गळ्याला
" फांस चढवील. लोकांसमक्ष तोंड विद्रुप होऊन गचके
" खातां खातां प्राण निघून जाईल, व शेवटीं माझा देह
" कोणीकडे तरी फेंकून देतील. शिव शिव!!! त्यांतून
" मला सोडविणारा या दुनयेमध्यें कोणीच नाहींना?"
असें ह्मणून ती पुन्हां रडूं लागली. श्रीमती, हे
तिचे उद्गार माझ्या लक्ष्यांत अगदीं अक्षरशः राहिले
आहेत. ते ऐकून मला कांहीं सुचेनासें झालें. हैब-
तराव अधिकारीसाहेब यांचा मजवर लोभ आहे.
त्यांना मी ही हकिगत सांगितली, व त्यांनींच मला
युक्ति सांगितली. आपलें कांहीं होवो, पण गरीब
बिचारी बाई तर सुटली.

श्री०—प्राणनाथ, फारच चांगली गोष्ट झाली. आ-
पणाला तरी जगून काय करावयाचं होतं?

सट०—काय सांगू श्रीमती? तिच्या तोंडचे 'नीच जाती मांगाच्या हातून फांस चढणार' हे शब्द जेव्हां मी ऐकिले तेव्हां तिला सोडविण्याचें मला मोठें स्फुरण आलें. परंतु उपाय नव्हता. पण जेव्हां हैबतराव अधिकारी यांनीं युक्ति सांगितली, तेव्हां मी मनांत म्हटलें कीं, हे साध्वी, ज्याला तूं नीच समजतेस, व ज्याच्या हाताचा स्पर्श तुला मृत्युपेक्षांही दुःसह वाटतो, तो राजकन्या श्रीमतीचा पति सत्वशील असून तोच एक तुला सोडविण्यास सिद्ध होईल, व त्याच्याच हातानें तुझा प्राण वांचेल. इतकेंच नाहीं, तर पुढें तुझी चांगली तजवीज राहून तुझा मुलगा मिळाल्यास त्याला माझ्या प्रिय पत्नीच्या सहायानें चांगल्या योग्यतेला पोहोंचवीन. श्रीमती, त्याप्रमाणें तिचा प्राण तर वांचला. आतां तिची पुढची चांगली तजवीज कर, आणि तिचा मुलगा मिळाल्यास त्याचें लग्न करून त्याला चांगल्या पदास पोंचवावें, म्हणून तूं आपल्या पित्यापाशीं त्या पत्रांत शेवटचें मागणें माग.

श्री०—डागडागिन्यांशिवाय सर्व वस्तू व माझा महाल मी त्यांस देतें. शिवाय, बाईला कांहीं नेमणूक देवविण्याची ही तजबीज करितें, पण आपल्या मित्रांना आदितवारीं रात्रीं येथें बोलवावें, म्हणजे आपण त्यांना देणग्या देऊं. माझें पत्र बाबांना मिळून आपल्या देहाची पुढची व्यवस्था होईपर्यंत त्यांना येथेंच मजजवळ राहण्यास सांगावें, आणि आपण तिकडे जावें. आपल्या जागेवर नेमिलेला इसम आपला स्नेहीच आहेना?

सट०—तो अगदीं माझ्या अध्यां वचनांत आहे. तूं ती काळजी करूं नकोस. तो माझा देह तुजजवळ आणून ठेवील.

श्री०—आदितवारीं मध्यरात्र उलटल्यावर मी व जिजाबाई तिकडील सर्व व्यवस्था आटोपून येऊं.

सट०—श्रीमती, तुझी एकेक गोष्ट पाहून माझी मति अगदीं गुंग होऊन जाते. खरोखरीच तूं कोणी महाशक्तिमान देवी मनुष्यरूपानें मृत्युलोकीं आली आहेस. महाधन्य आहेस.

श्री०—प्राणनाथ, फार वेळ झाला. आतां मी आज्ञा घेतें.

सट०—बरें. ( उठते व नमस्कार करून जाते. सटवाजी पोंचविण्यास जातो. )

---

## प्रवेश चवथा.

### स्थळः—मांगाचें घर.

( सटवाजी एकटाच बसला आहे. )

सटवाजी—( आपल्याशीं ) सटवाजी, तूं आतां दोनच प्रहर काय तो या दुनयेमध्यें आहेस, आणि श्रीमती काय ती एक प्रहर आहे. पुढें आमचा व दुनयेचा संबंध अगदीं तुटला. माझें चांगलें झालें. पण ही श्रीमती जशी आली तशी चालली. तिनें कांहींच पाहिलें नाहीं, व कांहीं भोगिलेंही नाहीं. कोठच्याकोठें मी तिच्या दृष्टीस पडलों, आणि तिचें सौंदर्य, तिचें भर तारुण्य, व तिचें राज्यैश्वर्य, हीं सारीं असून नसून सारखीं अशीं

केलीं. ज्या सुंदर, मनोहर आणि कोमल अशा मुखांतून निघणाऱ्या मधुरस्वरानं पुरुषमात्राचीं मनें एकदम आकर्षण व्हावींत, त्या स्मितहास्य व प्रफुल्लित मुखकमलांत मजमुळें आतां अति भयंकर विष जाणारना? तसेंच, ज्या मुखचंद्राच्या सानंद टवटवीच्या प्रभेनें सर्वांचीं मनें एकाएकीं आल्हादित होतील, तें तेजस्वी मुख विषाचा अंमल सुरू झाल्यानें निस्तेज होऊन त्यावर अमळशानें मृत्यूचा काळसर वर्ण येणारना? व शेवटीं घटकेंत भयंकर रीतीनें तें प्रेत पडणारना? हर हर!!! असल्या दुर्लभ व अनुपम कन्यारत्नाचा असा घोर परिणाम पाहून बिचाऱ्या आईबापांची अवस्था तरी काय होईल? कारण, जी नवयौवना सुंदरी आपल्या या षोडश वर्षीं सार्वभौमचक्रवर्ती अशा युवराजाची अर्धांगी व पट्टराणी होऊन आपल्या अमूल्य रत्नखचित रंगमहालांत विद्युल्लते प्रमाणें इकडून तिकडे चमकत आपली दिव्य सुवर्णप्रभा पाडण्यास योग्य, ती शहराबाहेर नीचजाती मांगाच्या भिकार झोपडींत विषानें सर्व गात्रें आकळून गेलेली व कृष्णवर्ण प्रेत झालेली अशी भूमीवर पडावीना? तसेंच, ज्या तरुण राजकन्यांना नाना औषधीयुक्त सुगंधिक व मधुर पाक प्रसंगोपात आरोग्यास्तव औषध ह्मणून घेण्याचें जिवावर येतें, त्यांपैकींच ही श्रीमती, पण ती, ज्याचें नांव कडु, ज्याची रुचि कडू, व परिणाम तर महाघोर, अशा विषाचा प्याला सुखासमाधानानें व उल्हासित अंतःकरणानें आपल्या हातीं प्राशन करण्यास सिद्ध झाली आहे. व हें

सर्व एका मनामुळें. तेव्हां मना, काय हे तुझे खेळ! काय ही तुझी शक्ति! किती ही तुझी इच्छा प्रबल! किती अढळ हा तुझा निश्चय! सर्व जग ज्याला फार भितें, तें तूं सुखानें अंगीकारितेस. सर्व जग ज्याची रात्रंदिवस फार इच्छा करितें, त्याला तूं तृणवत् मानून त्याचा अव्हेर करितेस. या श्रीमतीवरूनच तुझी विचित्र आवड, तुझी विलक्षण शक्ति, तुझा अढळ निश्चय, व तुझें प्रचंड धैर्य, हीं सर्व मूर्तिमंत दिसून येतात. काय तिच्या मस्तकामध्यें सत्व राखण्याचें वेड भरलें, आणि अत्यंत पुण्याईनें प्राप्त झालेल्या सुखाच्या सर्व गोष्टी तिला अगदीं शुष्क वाटल्या, आणि शेवटीं त्यांचा तिनें त्यागही केला! यावरून मना, तुझ्या कर्तृत्वा पुढें माया नाहीं, लोभ नाहीं, रुचि नाहीं, आशा नाहीं, भीति नाहीं, कांहींच नाहीं. असा तुझा अगाध महिमा आहे. असलीं प्रचंड व जाज्वल मनें ज्यांना परमेश्वरानें दिलीं आहेत, त्यांना कसली अपेक्षा व कोणती भीति असणार? श्रीमती, तुझी जितकी स्तुति करावी, तुझी जितकी वाहवा करावी, तुझे जितके गुणानुवाद वर्णन करावेत, तितकें सर्व थोडेंच आहे. तुजसारखें स्त्रीरत्न न आजपर्यंत निर्माण झालें, व न पुढें कधीं होणार? (स्तब्ध राहतो. इतक्यांत चार मांग येतात व सटवाजीस रामराम करून बाजूस बसतात.) या मित्रांनो. तुमची व माझी ही शेवटची भेट, आपलें शेवटचें बोलणें, आणि मला तुमची शेवटची मदत.

एक मां०—सटवाजी दादा, आमची कसली मदत

आम्ही तुझी कांहींच सेवा केली नाहीं. तुझे मात्र आमच्यावर फार उपकार आहेत. ( सर्व डोळे पुसतात. ) दादा, आम्ही करंटे ह्मणून तूं आह्माला सोडून चाललास. आतां आह्मांला रस्ता कोण दाखवील? आह्मांला नीति कोण शिकवील? आह्मी दिवस कसे काढावेत? तुझ्यापाशीं आम्ही आनंदांत होतों. आह्मांला लिहायला वाचायला येऊं लागलें. आह्मांला वाईट कामाची भीति वाटूं लागली ( डोळे पुसतो. ]

दुसरा मां०—सटवाजी दादा, आणखी कांहीं वर्षे तुझी संगत असती, तर आमचं कायकाय बरं झालं असतं!

ति० मांग—सटवाजीदादा, तुझ्यामुळेंच आह्मांला मारेकऱ्याच्या धंद्याचा वीट आला. तूं आह्मांला देवाची भक्ति शिकविलीस. आह्मांला पांढरपेशांसारखं बोलायला शिकविलंस.

चव० मांग—सटवाजीदादा, मला तर तूं देवासारखा वाटतोस. दुनयेंतल्या मांगांना दया नसते. पण आपल्या गावांतल्या मांगांना उंच जातींमधील लोकांपेक्षां अधिक दया आहे, असं तूं दाखविलंस. कारण, आज खरोखरीच दयेकरितां तुझा प्राण जात आहे. तुझं पाहून आह्मांलाही परोपकाराकरितां प्राण द्यावा असं वाटतं. सटवाजीदादा, दयेमध्यें तूं राजाला सुद्धां लाजविलंस. आम्ही पापी ह्मणून तूं आमचा पुढारी आह्मांला एव्हांच सोडून चाललास. ( सर्व डोळे पुसतात. )

सट०—मित्रांनों, तुह्मी अगदीं दुःख करूं नका.

मी कधीं तरी मरणारच होतों. पण आपला सर्वांचा हेतु लोकांवर दया करावी, वेळेस परोपकारीं प्राणही खर्च करावा, असा आहे. व त्याप्रमाणेंच सकाळीं मला मरण येत आहे. तेव्हां याचा तुह्मांला विशेष अभिमान वाटला पाहिजे. कारण, हें तुमच्या पुढाऱ्याचें मरण तुह्मांला व तुमच्या जातीला मोठ्या भूषणाचें होणार आहे. आणि पुढें कधीं अशीच वेळ आली, तर माझी आठवण होऊन तुम्हांलाही दयेच्या कामीं मोठें स्फुरण यावें. मित्रांनों, मरण हें कधीं तरी येणारच तें सुटत नाहीं. पण आपण नीच जातीचे लोक कष्ट करून नीतीनें राहिलों, व आपण दुसऱ्याविषयीं अंतःकरणामध्यें दया बाळगिली, तर तें परमेश्वराला विशेष प्रिय होऊन त्यामुळें तो आपणांवर चांगली कृपा करील, ही खात्री ठेवा. तुह्मांला पाहिजे असल्यास लग्न करा; पण बायकापोरांना विकले जाऊं नका. कष्ट करून सहजगत्या न्यायानें जें मिळेल, त्यांत तृप्त राहून अंतर्यामीं नीट सावध व विचारवंत असा. मुलांमाणसांचा आपापल्या शक्तीप्रमाणें चांगला संभाळ करा. पण त्यांच्याकरितां वाईट मार्गानें द्रव्य मिळविण्याविषयीं तुह्मी आपली बुद्धि भ्रष्ट होऊं देऊं नका. मित्रांनों, अविचार, दुराचरण, व कुमार्गानें मिळविलेलें द्रव्य, यांचा परिणाम नाना व्यसनें व नानारोग यांच्याद्वारा द्रव्याचा क्षय, वेळेस पोटांत अन्न जाण्याचीही अडचण होऊन अकालीं मृत्यु, व नादान संतति किंवा संततीचा

मुळींच अभाव, अशा अनेक रूपांनीं आपणांला किंवा आपल्या मुलांना भोगावाच लागतो. याकरितां न्यायानें द्रव्य मिळवून वर्तनही सुविचाराचें व शुद्ध रीतीचें ठेवा, ह्मणजे तुमचा व तुमच्या मुलांचा आयुष्यक्रम सुखामध्यें जाईल. दुसरें, तुमचें सुख जास्त वाढविण्याकरितां कोणाचा द्वेष करूं नका. इतकेंच नाहीं, तर तुह्मांला अपकार करणाऱ्यांचा सूड घेणेंही तुह्मी मनांत आणूं नका. कारण, मनाच्या या प्रवृत्तीमुळें परस्पर वैमनस्य वाढून आपणांलाच अति त्रास सोसावा लागतो, व शेवटीं आपलाही पुष्कळ तोटा होतो. याकरितां नेहमीं शांति व क्षमा धरा. शांति ही आपल्या मनाला दुःख देणाऱ्या सर्व गोष्टींचें विवेकानें समाधान करून आपला आनंद व धैर्य वाढविण्याची एक रियाज आहे. ह्मणून जसजशी तुह्मांला शांति, तसतसा तुमच्या अंतःकरणाला आल्हाद व सदृढता, व त्या मानानें शरिरालाही आरोग्य. आणि जसजशी तुमची क्षमा, तसतसे तुम्हांला कमी शत्रू व तुमच्या इष्ट हेतूच्या सिद्धीस निर्बंध व पूर्ण अवकाश. व या सर्वांचा एकंदर परिणाम तुम्हांला व्यर्थ दगदग व नुकसान हीं कमी, आणि तुमची समृद्धि, सौख्य, सत्कृत्यें व यश, हीं अधिक. शिवाय मित्रांनों, शांति व क्षमा, दक्षता व गांभीर्य, उत्साह व सावधपणा, व सारासारविचारानें दीर्घ उद्योग, हीं मनाच्या असाधारण कर्तृत्व शक्तीचीं दर्शक आहेत. अशीं मनुष्यें नेहमीं आनंदी व स्वस्थचित्त असीं राहून दुसऱ्यांनाही

समाधान व धीर देतात, व योग्य प्रसंगीं, मोठमोठ्या कृत्यांमध्यें आपले धैर्यादि गुण अद्भुत रीतीचे दाखवून आमरण यशस्वी असतात. याच्या उलट अधीरता व शीघ्रकोप, अविचारीपणा व पदोपदीं दुरुक्ति, दुरभिमान व व्यर्थ डौल, आणि नेहेमीं दुष्ट बुद्धि, हीं मनाच्या विशेष दुर्बलतेचीं दर्शक आहेत. अशा प्रकारचीं मनुष्यें दैवयोगानें मिळालेल्या चांगल्या स्थितीचा नाश करून आपणास्वतांला व दुसऱ्यांना अतित्रासदायक व दुःखदायक होतात. व त्यांचा शेवट त्यांच्या वासनेप्रमाणें दुःखामध्यें व अपकीर्तीमध्येंच होतो. तरी तुह्मी अशा प्रकारचे दुसऱ्यांना दुःख देणारे व अपयश जोडणारे प्राणी होऊं नका. शेवटीं मित्रांनों, सांप्रतची ही उत्तम मनुष्य स्थिती कांहीं दिवसांनीं जाऊन शेवटीं मनोवृत्तीप्रमाणें सृष्टीमधील एकंदर प्राण्यांसारखीच आपलीही स्थिती आहे, हें नेहेमीं ध्यानांत ठेवा, व कोणत्याहीं प्रकारच्या अभिमानानें उन्मत्त न होतां केवळ दीन होऊन व सर्वांच्या कल्याणाकडे दृष्टि देऊन परमेश्वराची भक्ति करा, ह्मणजे तो कृपा करील. त्याच्या कृपेशिवाय सर्व भगीरथ प्रयत्न व्यर्थ शीण आहे. पण ती कृपा संपादन करण्यामध्यें मनुष्य प्राणी जिच्यामुळें सर्व प्राण्यांत श्रेष्ट झाला आहे त्या सदसद्विचार शक्तीचा मात्र चांगला उपयोग करा. नाहींतर धर्मवेडाच्या मदांधपणामुळें खरा मनुष्यपणा जाऊन त्याच्या जागीं, दूरभिमान व भ्रममूलक श्रद्धेचीं कृत्यें, त्यांक-

रिती हटवाद, हटवादास पेटून वैर, वैर वाढून परमेश्वराला अत्यंत प्रीय अशा मानव जातीमध्यें परस्परांचा निरर्थक छल ष प्राणहानि, व हे विवेकरहित व दयेस अनुसरून नसणारे सर्व प्रकार कशाकरितां, तर जो स्वभावतःच अगदीं निरहंकारी, निर्द्वंद्व, अतिशांत, महादयाळू, पूर्ण सद्विवेकी, आणि सर्वांना आनंद व सुख देणारा अशा परमेश्वराला प्रसन्न करण्याकरितां, अशा प्रकारची कांहींशी पशुवृत्ति येण्याचा संभव असतो. मित्रांनों, अशानें परमेश्वराची कृपा तर होत नाहींच, पण ही अज्ञानमूलक प्रवृत्ति अमर्याद वाढल्यास त्याची अवकृपा होऊन अपयश, अमूल्य स्वतंत्रतेचा नाश, व परतंत्रतेच्या स्वरूपानुरूप दुर्दशा, हीं मात्र येतात. याकरितां सदसद्विचारदृष्टीनें सर्व कांहीं अवलोकन करून त्यांत आपल्या काळाला व आपल्या स्थितीला योग्य, मानुष्यातील हितकारक, व परमेश्वरांच्याच गुणांनीं युक्त असल्यामुळें खरोखर त्याला प्रिय, असें जें जें घेण्यासारखें असेल त्याचें अवलंबन करण्याची आवड धरा. त्याकरितां प्रयत्न करा. व त्याप्रमाणें आचरण ठेवा. द्रव्य नसतां द्रव्यखर्चाच्या अनेक खटपटी, किंवा दुरभिमानमूलक दुसऱ्यांना दुःख, अशा साधनांची मध्यस्थी त्याला मुळींच लागत नाहीं. कारण तो स्वतांच वाईट बरें सर्व जाणणारा, सर्व ठिकाणीं असणारा, व सर्व कांहीं पहाणारा असा सर्वज्ञ असून पुन्हां, स्वतंत्र, अगदीं निरपेक्ष, परमन्यायी, महा उदार, व सर्वशक्तिमान

असा आहे. तेव्हां त्याच्याच या चांगल्या गुणांचें आपण अनुकरण केलें, तर त्याला तें प्रिय होऊन तो चांगली कृपाच करील. कारण, समान गुण परस्पर-स्नेह वृद्धिंगत करितात. (हलक्या स्वरानें) मित्रांनो, हें माझें आतां तुह्मांला शेवटचें सांगणें आहे. दोन घटकांनीं मी हा लोक सोडून जाणार. पुढें तुह्मांला शिकविण्यास मी या दुनयेमध्यें नाहीं. तरी मी हें सांगितलेलें तुह्मी नीट लक्ष्यांत ठेवा. व त्याप्रमाणें वर्तन ठेवा. आणि पुढें जे जे कोणी तुमचे मित्र होतील त्यांना अशीच रीतीनें शिकवा. मारेकऱ्याचें काम कोणासही करूं देऊं नका. आणखी, वृद्धावस्था झाली तरी फावल्या वेळीं तुह्मी आपला विद्याभ्यास चालूच ठेवून ज्ञानसंपादन करा. दुसऱ्यांकडून करवा, आणि त्या ज्ञानाचा उपयोग लोकांच्या कल्याणाकडे करा. अशा रीतीनें वागलां तर मित्रांनो, मोठमोठ्या राजेलोकांना केवळ संपत्ति, ऐश्वर्य, व सत्ता, यांपासून जें कांहीं कृत्रिम सुख होत असेल, त्यापेक्षां अधिक, द्रव्यावर अवलंबून नाहीं, विशेष उपाधि नाहींत, व काळजी नाहीं, पुन्हां कोणाचा हेवा नाहीं व कोणाची भीति नाहीं, आणखी, कधीं खंड नाहीं व कसली हुरहुर नाहीं, असें स्वाभाविक, शांत, व निर्मळ सौख्य तुमच्या गरीब झोंपडींत सदोदित असेल. फार काय सांगू?

**एकसां०**—सखाजी दादा, जी तुझी वाट ती आमची वाट. आह्मांला लग्नाची कटकट नको. आह्मी दिवसा

मोलमजुरी करून पोट भरूं, आणि रात्रीं या तुझ्या जागेवर नेहेमीं देवाचें भजन करूं, तुझे गुण गात जाऊं, विद्याभ्यास करीत जाऊं, व परोपकार करीत जाऊं. आह्मांला दुसरें कांहीं नको. तूंच आमचा गुरु, तुझी जागा तो मठ, आणि त्या मठामध्यें आह्मी चोघे तुझे शिष्य आनंदामध्यें दिवस काढूं. चांगला लोण्याचा गोळा टाकून आंबट ताकाची वाटी कोणी घ्यावी?

[ इतक्यांत श्रीमती हातांत विषाचें भांडें हातांत घेतलेली व जिजाबाई पुरचुंडा घेतलेली अशा येतात. ]

**श्रीमती**—[ बाजूस ] जिजाबाई, आज मी पतिराजांकडें अक्षय्य राहण्या करितां आलें आहे. [येतात. सर्व उठतात. दोघी आपल्या आंगावरील वस्त्रें खालीं ठेवितात. श्रीमती सटवाजीस नमस्कार करिते. चौघे मांग श्रीमतीस मुजरा करितात. ]

**सट०**—मित्रांनों, राजवाडा आणि संपूर्ण राजधानी यांना प्रकाशवून सर्वांना आनंद देणारी महा तेजस्वी ज्योति, जी आतां दोन घटकांनीं मजमुळें नाहींशी होणार आहे, व जी नाहींशी झाल्याबरोबर चोहोंकडे एकाएकीं उदासीनतेची भयंकर काळिमा पसरून संपूर्ण नगर शोकसागरांत बुडून जाणार आहे, ती ही माझी पत्नी व तुमची भगिनी श्रीमती सर्वांची शेवटची भेट घेण्याकरितां आली आहे.

**श्री०**—बंधूंहो, तुह्मी माझ्या प्राणनाथांवर अत्यंत लोभ ठेवितां, यामुळें मी तुमची फार ऋणी आहें. तरी त्याचं कांहींसं उतराई व्हावं, ह्मणून मी माझ्या स्वता-

च्या वस्तू तुह्मांकरितां आणिल्या आहेत, त्यांचा तुह्मी माझी व माझ्या प्राणनाथांची आठवण ह्मणून स्वीकार करावात.

सट०—मित्रांनो, माझ्या प्रियेच्या इच्छेला मान द्या.

श्री०—( पुरचुंडा सोडून त्यांतील डागिने पुढें करिते.) प्राणनाथ, आपल्या हातानें देण्याचं व्हावं.

सट०—तुझ्या इच्छेप्रमाणें. ( डागिने घेतो व दोघांस वांटतो. प्रत्येक असामी डागिने घेऊन दोघांस मुजरा करितो. )

श्री०—जिजाबाई, तुह्मी मात्र अगदीं भिऊं नका किंवा दुःख करूं नका. बाबा तुमच्यावर न रागावतां चांगला लोभ करितील. ( विषाचें भांडें हातांत घेऊन ) प्राणनाथ, आतां माझे सर्व हेतू यामध्यें आहेत, आणि हें आपल्या हातून मिळाल्यास फारच उत्तम होईल.

सट०—श्रीमती, पहा काय चमत्कार आहे तो, कीं ज्या हातानें एका वृद्ध साध्वीचा प्राण वांचविला, त्याच हातानें दुसऱ्या या अगदीं अल्पवयी पण अति प्रेमळ अशा पतिव्रतेला जलाल विष देऊन तिच्या प्राणाचा नाश करीत आहें. काय हे जन्मांतरींचे योगायोग! ( जिजाबाई डोळे पुसते ) जिजाबाई, श्रीमतीच्या वियोगानें तुह्माला अति दुःख होत असेल, पण उपाय नाहीं.

श्रीम०—जिजाबाई, मी चांगल्या ठिकाणीं जात आहें. आतां प्राणनाथ व मी निरंतर एकमेकांसन्निध राहूं. यांत दुःख वाटण्यासारखं काय बरें आहे?

उलट तुह्मी समाधान मानिलं पाहिजे. ( सटवाजीस ) प्राणनाथ, मी जो प्याला दिला होता, त्याच प्याल्यांत हें आपल्या हातानें मला मिळावं. ( भांडें सटवाजीपुढें ठविते. सटवाजी चांदीचा प्याला आणितो )

सट०–प्रिय, तुझी इच्छाच आहे तर घे माझ्या हातून. ( प्याल्यांत विष ओतितो ) श्रीमती, देहांच्या जातींचे धर्म कसे आहेत हें पाहिलेंसना ! त्वां राजकन्येनें या पेल्यांत मला साखर घातलेलें दूध दिलें होतेंस,व मी मांग त्यामध्यें तुला भयंकर विष देत आहें.

श्रीम०–प्राणनाथ, ज्याच्यायोगानें पतिराजांच्या वियोगाचं दुःख मला मुळींच व्हावयाचं नाहीं, अशाला विष कसं ह्मणावं ? तर तें अमृतच आहे. पण पहांट व्हावयाला आली. आतां त्वरा करावयाचीना?

सट०–प्रिये, यावेळेस माझ्या नेत्रांतून दुःखाश्रू येऊं पहात आहेत, व त्यांना आवरण्याची माझी शक्ति नाहीं. ( डोळे पुसून ) प्रिये, प्रथमच मी तुला हें काय देत आहें ? ( उसासा टाकून स्तब्ध राहतो. )

श्री०–प्राणनाथ, आपण कांहीं मनांत आणूं नये. आपण मला अखंड सौभाग्य देत आहां, व मोठ्या दुःखांतून सोडवीत आहां. याहून पतिव्रतेला आणखी तें काय पाहिजे ! ( सर्व डोळ पुसतात. श्रीमती जिजाबाईस नमस्कार करून ) जिजाबाई, मी आतां येतें हो. मी तुह्मांला कांहीं बोललें असेन, किंवा कधीं तुमचं मन दुखविलं असेल, तर त्या सर्व गोष्टींची मला क्षमा करा. मी

तुमचं अगाध ठेकरूं आहे. तुम्हीच मला मनाजोगे पति-राज पाहून दिलेत, व मिळवूनही दिलेत. आतां मी त्यांजबरोबर जात आहें, याचं तुम्ही समाधान मानां.

जिजा०—(श्रीमतीस पोटाशीं धरून.) बाईसाहेब, मला आतां एकेक घटका कशी जाईल? (स्फुंदते व सोडते.)

श्री०—( मांगांस नमस्कार करून ) बंधूंनो, मी तुमची भगिनी आतां आपणां सर्वांचा शेवटचा निरोप घेतें. प्राण-नाथांप्रमाणेंच माझेंही स्मरण ठेवा. व त्यांच्या कीर्तीला शोभेल अशा चांगल्या आचरणानें रहा. (नंतर सत्वाजीच्या पायांवर मस्तक ठेवून ) देवा, मला एकवार या चरणांवर मस्तक ठेवण्याची आज्ञा मिळाली होती, व तो समय केव्हां येईल अशी रात्रंदिवस इच्छा करीत होतें. तो हा अपूर्व योग आतां आला आहे. यानें मी कृत कृत्य झालें. मला फारच आनंद झाला. ( जरा स्तब्ध राहते.) देवा, मजवर तुझी मोठी कृपा आहे. आतां मला कांहीं नको. ( जरा स्तब्ध राहते. ) प्राणनाथ, माझें धन्य भाग्य, कीं आपण उदार, शूर, धीर, दयाळु, सर्व-गुणसंपन्न, महा तेजस्वी, महा जितेंद्रिय, व महासमर्थ, अशा तपोनिधींनीं मज अनाथ व मूढ अबलेचा अंगी-कार केला, व मला सद्गति दिली. प्राणनाथ, आतां आपण मृत्यूलोकचे मानवी देह येथेंच ठेवून जात आहों-त, तरी एकवार या मृत्युलोकच्या मुखानें येथील शेव-टची आपली प्रार्थना करितें कीं, माझा अंगीकार के-ल्यासारखें मला कदापि सोडूं नये. (पायांवर मस्तक ठेव-

न देशीच स्तब्ध राहते. सटवाजीसुद्धां सर्व डोळे पुसतात. श्रीमती अडखळत ) देवा, असल्या पवित्र पदकमलांचा लाभ मला निमिषमात्रच मिळावाना? मर्जी तुझी!!! प्राणनाथ, माझा गळा भरून आला. आतां माझ्यानें बोलवत नाहीं.

सट०—या समयीं तुझ्या प्रत्येक शब्दानें माझी वाचा बंद होऊं पहाते,सर्व इंद्रियें आपापले व्यापार सोडूं पहातात, बुद्धि आपलें स्थान सोडीत चालली, व त्याठिकाणीं सर्व शून्यत्व होऊं लागलें आहे. प्रिये, तुझ्या या तेजस्वी मुखकमलामध्यें मजमुळें आतां हें विष शिरणार, अशा वेळेस तुजपाशीं एक शब्द बोलणें ह्मणजे सहस्र प्राणोत्क्रमणाच्या असह्य यातनांहून अधिक दुःख मला होतें. फार काय सांगूं? हा विषाचा प्याला तुला मी देत आहें, पण यामुळें मी तुझा निरंतरचा बांधिला जात आहें, या माझ्या शह्यावर विश्वास ठेव. प्रिये, घे हा प्याला. ( खालीं ठवितो. श्रीमती डोळे पुशित पायांवरील मस्तक काढून दीन मुद्रेनें उभी राह. प्रिये, मीही तुजबरोबर आलोंच समज.

श्री०—( हातांत प्याला घेऊन ) ज्यावर आपण शयन करीत असां तेंही यावेळीं मिळावं.

सट०—( आपली शुभ्र धाबळीची चौघडी करून पसारितो. ) हें घे. ( दुसरें शुभ्र वस्त्र ठेवून ) हें अंगावरचें. प्रिये श्रीमती, यावर तूं आतां महानिद्रा घेणारंना?

श्री०—( बसून ) अहाहा!!! प्राणनाथांच्या अंथरु-

णावर मला किती तरी आनंद होत आहे! ( हातांत प्याला घेऊन ) हे हलाहला, सर्व जग तुझा अति तिरस्कार करितें, व तुला हस्ताचा स्पर्श करण्याससुद्धां फार भितें, पण मी मोठ्या आनंदानें व उल्हासानें तुझा स्वीकार करीत आहें. यावरून माझं मन सुखदुःखाला कसं अगदीं समान आहे हें तूं पहा, आणि तूंही या वेळीं कृतज्ञ होऊन माझा इच्छित हेतु लवकर पूर्ण कर. ( वर नजर लावून ) हे जगन्नियंत्या प्रभो, जगामध्यें सत्य ह्मणून जी कांहीं वस्तु तुला आवडते, ती मीं कायावाचामनेंकरून मज अल्पवयी, अज्ञान, व दीन अबलेच्या शक्तीप्रमाणें पूर्णपणें संभाळिली आहे, व आतां मी तुझ्या पायाशीं येत आहें. माझेमागून माझे प्राणनाथही येत आहेत. तरी तूं आम्हां उभयतांवर पूर्ण कृपा कर. माझ्या आईबापांना माझ्या जागीं अपत्य देऊन त्यांना माझा विसर पाड. आणि त्यांना आनंद दे. इतकंच या अज्ञान बालक श्रीमतीचं तुजपाशीं मागणं आहे. ( जरा स्तब्ध राहून ) जिजाबाई, बंधूंहो, प्राणनाथ, आतां मी आपली आज्ञा घेतें बरं. ( वर पाहून ) हे दीनदयाळ प्रभो—( असें ह्मणून प्याला प्राशन करून जवळ ठेविते. निजते, व अंगावर घेते. ) प्राणनाथ, आतां मला सुखाची निद्रा येत आहे. ( सर्व रडूं लागतात. )

सट०—प्रिये, तुझ्या सुखाचा अर्धा वांटा घेण्यास मींही येतों. जिजाबाई, तुह्मी आतां राजवाड्यांत जा. दिवस उगवायला झाला. ज्यांत तुमच्या धनिनीला

सुख वाटतें, त्याचें तुह्मी दुःख करूं नका. ( नमस्कार करून ) मी आपलें लेकरूं आहें. आतां मी ही आपली आज्ञा घेतों. रामचा, महादबा, तुह्मी येथेंच असा. घोंडबा, कोंडाजी, आपण आपल्या ठिकाणीं जाऊं चला. ( श्रीमतीच्या मस्तकावर हात ठेवून ) प्रिये, माझी वेळ झाली. मी लवकरच तुजपाशीं येतों बरें.

श्री०—प्राणनाथ, पहाहो, पुन्हां मजजवळच या. मला एकटीलाच सोडून दुसरीकडे राहूं नका.

सट०—प्रिये, माझा प्राण तर तुझ्याच स्वाधीन आहे. हा, देह सरकार महाराजसाहेबांचा आहे, तो त्यांच्या चरणांपुढें ठेवून हा मी तुजपाशीं आलोंच. बरें तर, प्रिये, मी येऊं आतां? ( श्रीमती मान हालविते. व सटवाजीकडे टक लावून पहाते.)

सट०-मित्रांनो, माझ्या प्रियेच्यानें बोलवत नाहीं. आतां माझा प्याला मला केव्हां मिळेल असें झालें आहे. मी प्रधानसाहेबांकडे जाऊन त्यांना हजिरी देऊन येतों. तुह्मी तुरुंगाकडे जा. पण एकवार माझ्या प्रियेचें मुख मला नेत्र भरून पाहूं द्या. (श्रीमतीच्या तोंडाकडे एकाग्र नजरेनें पहातो.व झपाट्यानें जातो.त्याच्या मागें दोघे मांग जातात)

जिजा०( श्रीमतीच्या तोंडावरून हात फिरवून ) बाईसाहेब, अहो बाईसाहेब, एक शब्द आणखी माझ्याशीं बोला. ( श्रीमती स्वस्थ असा अशी हातानं खूण करिते. )

मांग—आतां तुह्मी जा. दिवस उगवायला झाला. बाईसाहेबांच्या जिवाला उगीच दुःख देऊं नका. ( जिजाबाई रडत जाते. )

( पडदा पडतो. )

## चवथा अंक समाप्त.

# अंक पांचवा.

## प्रवेश पहिला.

**स्थळ:**—तुरुगांतील खुली जागा

(मध्यें राजाची व बाजूस दुसऱ्या दोन अशा रिकाम्या खुर्च्या आहेत. अधिकारी, कातवाल, शिपायी, कैदी, वगैरे हजर आहेत.)

**शिबंदी**—अधिकारीसाहेब, सरकारस्वारी आली.

(भालदार "आस्ते कदम चलना सरकार महाराज सलामत." असें ह्मणत येतो राजा, प्रधान, न्यायाधीश, येतात. सर्व राजास मुजरा करितात राजा खुर्चीवर बसतो. मागाहून प्रधान व न्यायाधीश बाजूस बसतात.)

**राजा**—(रागानें) प्रधानसाहेब, कैदी हजर असल्यास ठीक आहे, नाहींपेक्षां वेळेस तो पळून गेला असता, तर त्याबद्दल जबाबदार कोण झालें असतें? राजद्रोहावरून देहांत शिक्षा झालेल्या गुन्हेगारास तुह्मी सरकारी मोठ्या अधिकारी लोकांनीं जामीन राहावें काय? फार गैर गोष्ट केलात. मनुष्याची योग्यता पाहून त्यास जामीन रहावें हें तुह्मांला शिकावयाला पाहिजे? (न्यायाधिशास) कांहो, न्यायाधीश साहेब, देहांत शिक्षेच्या गुन्हेगारास जामीन आहे खरा, परंतु तो कोणाला? खुनाच्या कैदीला. राजद्रोहाच्या कैदीला नाहीं. आणि तसा स्पष्ट उल्लेख कायद्यांत केला नसला ह्मणून काय झालें? सारासारविचारानें कोणतीही गोष्ट केली पाहिजे. न्यायाच्या कामांत सारासारविचार

चांगला पाहिजे. हलकट नीच जातीचा मांग तो काय, त्याला तुह्मी जामिनावर सोडितां काय, आणि आमचे भरवंशाचे प्रधानसाहेब त्यास जामीन रहातात काय? सगळीच झोटिंगपादशाई आहे वाटतें?

**प्रधान**—( हात जोडून व उभा राहून ) हुजूर, ताबेदाराला अपराध माफ असावा. आजपर्यंत कधींच नसून आज नोकरावर नामर्जी झाल्याचा प्रसंग आला, याबद्दल मला फार दिलगिरी वाटते. खावंद, अर्ज करितों त्याची सेवकाला क्षमा असावी. मी ज्या इसमास जामीन राहिलों, तो हा इसम ( सटवाजीस बोटानें दाखवून ) मजपेक्षां शतपटीनें अधिक योग्यतेचा आहे असें मला वाटतें, व मी ह्मणतों याला प्रमाण या मनुष्याचें अलौकिक परोपकारकृत्य व त्याची वर्त्तणूक हीं खावंदांहीं ध्यानांत आणावीं. या कृत्यामध्यें त्याची दया व मनाचें औदार्य हीं पूर्णपणें दिसून येतात. तसेंच, थोडेसें असत्य भाषण करून मृत्यूसारखा भयंकर प्रसंग टाळण्याची चांगली फायदेशीर संधि असतां प्रत्यक्ष जिवाचीही आशा न धरितां सत्याच्या ठिकाणीं यानें आपली पूर्ण निष्ठा दाखविली. तेव्हां अशा प्रकारचा सत्वधीर पुरुष परमेश्वरापुढें मजपेक्षा काय पण मोठमोठ्या नृपश्रेष्ठांपेक्षाही अधिक योग्यतेचा होणार आहे. खावंद, न्यायाधीशसाहेबांचे सांगण्यावरून जेव्हां हा इसम मजकडे आला, तेव्हां याला पाहतांक्षणींच माझ्या मनाची अशी कांहीं स्थिति होऊन गेली, कीं त्या वेळेस एक

लक्षच काय परंतु दहा लक्षांचा जामीन राहून पुन्हां माझा देह व प्राणही याच्याकरितां जामीन ठेविला असता. इतकी माझी याच्या ठिकाणीं पूज्यबुद्धि होऊन गेली. तरी अशा प्रकारचा परोपकारी व सत्वशाली पुरुष, मग तो कोणत्याही स्थितींतला कां असेना, पळून जाईल व आपल्या जामिनाला संकटांत घालील, अशी शंकाही मनांत आणणें माझ्या मतें पापाची गोष्ट आहे. तशांतून आजच्या या महा घोर प्रसंगीं तोच होऊन वेळेवर हजर झाला असतां त्याजविषयीं संशयाचे उद्गार निघावेत, व त्यामुळें अंतकाळीं त्याच्या मनाला वाईट वाटावें, आणि हुजूरची मर्जीही नाराज व्हावी, याचें मला फार वाईट वाटतें. ( बसतो. )

रा०—तो इसम हजर आहे ? ( सदवाजी हात जोडतो)

प्र०—हुजूर, खावंदांसमोर हात जोडून उभा राहिला आहे हाच तो भला मनुष्य.

रा०—[ बोट करून ] हा मनुष्य ? हं, दिसण्यांत तर फार चांगला आहे. ( त्याच्याकडे तिरस्कारानें पहात स्तब्ध राहतो. ( बाहेर गलबला होतो. ) कोतवाल, कसला गोंगाट चालला आहे ? [ कोतवाल जातो व पाहून परत येतो. ]

कोत०—हुजूर, कोणी बाई आतांच्या आतां सरकारच्या पायांपाशीं अर्ज करण्याचें ह्मणते. पहारेकरी तिला येऊं देत नाहींत, व ती बळेंच येऊं पाहते.

रा०—येऊं द्या तिला; असा काय तिचा अर्ज आहे

तो ऐकिला पाहिजे. ( कोतवाल जातो व बाईला घेऊन येतो. )

बाई—( मुजरा करून राजाच्या पायांपुढें मस्तक ठेवून ) महाराजसाहेब, दया करा, आणि या भल्या मनुष्याला ( सटवाजीकडे बोट दाखवून ) सोडा, नाहींतर माझी शिक्षा मला भोगायला लावा. मी पुन्हां फांशी जातें. पण याला सोडून द्या. याचं वय लहान आहे, पण हा खरा सत्पुरुष आहे. याचं अंतःकरण केवळ दयेनें भरलेलं आहे. तरी असल्यां देवपुरुषाच्या हत्येचें महत्पातक मजवर येऊं देऊं नका. माझ्यावर देवाचा मोठा कोप होईल. काय मांगील जन्मीं मजकडून पातक झालं होतं, तें अजून मी निस्तरीत आहें. त्यांत भर आणखी हा पापाचा दुसरा संचय नको. याला विष पिऊन मरण्याचा हुकूम झाला आहे असं काल रात्रीपासून मला एकसारखी तळमळ लागून राहिली आहे, कीं मजमुळें सत्पुरुषाची प्राणहानि होत आहे.तरी महाराजसाहेब, पुढच्याकरितां हें संचित नको. याला सोडा इतकाच माझा अर्ज आहे.

रा०—असल्या बेइमान मनुष्यावर एकदां दया केली म्हणजे याच्याच.दुसरे लोक याच्या कित्ता उचलतील. सरकारशीं हरामखोरी करून परोपकाराचें ढोंग माजविणाऱ्यावर दया करावी, असें आमच्या ध्यानांत येत नाहीं.

बा०—सरकारसाहेब, लाखों जनांवर उपकार करण्याचं महत् भाग्य देवानें आपणाला दिलं आहे. मी

खरोखरीच निरपराधी होतें ह्मणून या सज्जन मनुष्याचें अंतःकरण फार कळवळून गेलं, आणि माझ्या करितां आपला प्राण देण्यास तयार झाला. तेव्हां अशा मनुष्याला हरामखोर व बेइमान कसं ह्मणावं? सरकारसाहेब, अशा पुण्यवान प्राण्याला देहांत शिक्षा दिल्याबद्दल निर्दयतेचा डाग आपल्या निर्मळ कीर्तीला लावून घेऊं नका. दया करा, व याला सोडा.

**राजा**—परमेश्वर कृपेनें तुझा प्राण वांचला तो वांचला. त्यांत आतां हात घालितां येत नाहीं; व हा मांग सरकारी नोकर असून सरकारशींच कपटानें वागला, याबद्दल याला शिक्षा झालीच पाहिजे. आतां, तूं भली बाई फार काकळूत व विनवणी करितेस, ह्मणून तुजकरितां याची देहांताची शिक्षा रद्द करून याला राज्यांतून हद्दपार केलें आहे. आतां तर तुझें कांहीं ह्मणणें नाहीं?

**सट**—( हात जोडून बाईस ) अहो मातोश्री, तुह्मी मजकरितां सरकारचरणांपाशीं पुन्हां अगदीं रदबदली करूं नका. या वेळीं माझ्या देहांतून प्राण केव्हां निघून जाईल असें मला झालें आहे. व जी कांहीं आतां अर्ध घटका राहिली आहे, तिचें एकेक पळ मला एकेक वर्षाप्रमाणें भारी जड झालें आहे. बाई, तुह्मी कोणतीही शंका मनांत आणूं नका, व माझ्या मरणाविषयीं खेद करूं नका. माझ्या मरणामुळें कोणत्याही रीतीनें तुमच्यावर पाप येत नाहीं. माझ्या स्वताच्याच सुखाकरितां मी आतां मरणाची इच्छा करीत आहें. मला

जगून पुढें कांहीं कर्तव्य नाहीं, किंवा कसली आशा नाहीं. मात्र, या घटकेला मरण न आल्यास मग मजसारखा हलभागी, लबाड, पापी, कृतघ्न, व चांडाळ, असा दुसरा कोणीच इसम या पृथ्वीवर नाहीं. या समयीं माझें आयुष्य वाढावें अशी इच्छा करणारे माझे हितकर्ते नाहींत. आतां माझ्या राहिल्या आयुष्यांत मला प्रत्येक क्षणीं अनेक भयंकर रोगांच्या वेदनांहून अधिक दुःख व तळमळ नुसत्या जिवंत असण्यानेंच होत आहेत. तें सांगतां येत नाहीं. याकरितां आतां एक पळभर सुद्धां जिवंत राहण्याची माझी इच्छा नाहीं, व तुम्ही पुन्हां अर्ज करूं नका. बाई, या वेळेस माझ्या मनाची काय स्थिति झाली आहे. ती मी तुम्हांला काय सांगूं? परमेश्वर जाणतो. येथून सुटल्यावर मी अत्यंत सुखाच्या जागीं जाणार आहें. अहा हा!!! तें सुख काय सांगूं? ह्मणून बाई, माझ्या मरणामुळें तुम्ही खेद करूं नका, किंवा मनाला हळहळ वाटूं देऊं नका. परमेश्वरकृपेनें तुमचा प्राण वांचला हें फार उत्तम झालें. आतां तुमचा मुलगा मिळाला, तर तुम्हा मायलेकरांच्या भेटीपासून होणारें सुख मनांत येऊनच मला जो कांहीं आनंद होतो, व जी धन्यता वाटते, त्यापुढें माझ्या मरणाचें दुःख मला कांहींच वाटत नाहीं. ( राजास दंडवत करून दोन गुडघ्यांवर उभा रहातो व हात जोडून ) सरकार खावंद, आपण थोर राजे आहांत. लक्षावधि जनांपेक्षां आपला पुण्यसंग्रह विशेष असल्यामुळें परमेश्वरानें आप-

णांस राजकुलांत निर्माण करून त्या लोकांवर विशेष सत्ता करण्याच्या अधिकारावर राजा केलें आहे. व त्या लक्षावधि लोकांचें बरें किंवा त्यांचा नाश या गोष्टी केवळ एकट्या आपल्या मनावर ठावेल्या आहेत; ह्मणूनच सर्व लोक आपापल्या बऱ्याकरितां आपल्यां विशेष कृपेची इच्छा करितात, व नाश होईल ह्मणून आपल्या नामर्जीची भीतिही फार बाळगितात. खावंद, प्राणीमात्राला मरणा इतकी भीति व दुःख दुसऱ्या कोणत्याच गोष्टीचें नाहीं. पण तें मरण लौकर येण्याविषयीं सरकारपाशीं मीच अर्ज करीत आहें. तरी, ज्याला आतां कसला लोभ नाहीं व कोणतीही भीति नाहीं, अशा नम्र व प्राणावर उदार असणाऱ्या प्राण्याचे शेवटचे दोन शब्द खावंदांहीं दयाळू होऊन ऐकावेत, व त्याबद्दल दासाला क्षमा असावी. खावंद, सरकारी कायद्याविरुद्ध वर्त्तन केल्याबद्दल मला देहांत शिक्षेचा हुकूम झाला आहे, तो आतां फिरवा जाऊं नये, व मला विष प्राशन करण्याचीच आज्ञा व्हावी. दुसरें खावंद, माझी जात नीच व हलकट आहे. आमच्या जातींत ज्ञानाचा लवलेशही नसल्यामुळें दुष्ट मनोविकारांचें प्राबल्य जास्त राहून दुष्ट व घोर कृर्मे, आमच्या लोकांकडून होतात, व ते स्वार्थाकरितां बेइमानही होत असतील. त्याविषयीं माझें कांहीं ह्मणणें नाहीं. पण अशा रीतीचा बेइमानपणा किंवा हरामखोरी मजकडून कांहीं झालेली नाहीं. तर हें कृत्य केवळ निरिच्छबु-

द्वेषें व सरकारच्या यशाला अन्यायाचा डाग लागूं नये, या हेतूनें मीं केलें. कारण, या बाई अगदीं निरपराधी होत्या. असें असून यांचा जीव पुष्कळ वर्षें नाहींसा झालेल्या मुलाच्या भेटींत गुंतून राहिला आहे. अशा स्थितींत जर या कुलीन साध्वीचा प्राण मज नीच मांगाचे हातूनें फांस चढून जाता, तर फारच अन्यायाची गोष्ट झाली असती, व याबद्दल परमेश्वरापुढें खावंद जबाबदार धरिले गेले असते. कारण, राज्यांतील सर्व न्यायाचा मूळ झरा राजा आहे, व राज्यांतील सर्व खऱ्या खोट्याची अखेर जबाबदारी व यश हीं त्यांजकडेच आहेत, असें माझ्या बुद्धीला वाटून व या बाईची दया येऊन मीं अशी गोष्ट केली व त्याबद्दल सरकारपुढें मी आपला देह अर्पण करण्यास आनंदानें तयार आहें. परंतु सरकारांनीं मला बेइमान मात्र समजूं नये. खावंदांच्या तोंडचा हा शब्द माझ्यानें अगदीं सहन करवत नाहीं. मी कधीं बेइमान होणार नाहीं.

राजा—( मनांत ) याच्या भाषणावरून व याच्या कृतीवरून हा मोठा विलक्षण मनुष्य दिसतो. तरी शास्त्रीबुवा ह्मणतात तो प्रकार अशा मनुष्याकडून कसा झाला असेल? बरें, पण हा आपल्या जिवाला इतका कां कंटाळला आहे? हें काय गूढ आहे तें कळत नाहीं. ( उघड ) तुला मरणाचीच शिक्षा पाहिजे?

सट०—होय सरकार. माझें इतकेंच मागणें आहे. दुसरें कांहीं नाहीं.

राजा—याची इच्छाच आहे तर अधिकारी, त्याला विषाचा प्याला द्या.

अधि०—जी सरकार. ( दुसऱ्या नोकरास सांगतो. तो प्याला आणितो. व सटवाजीपुढें ठेवितो. )

सट०—( प्याला घेऊन ) अहाहा!!! सरकारांनीं मला किती सुखानें साधन दिलें आहे हें? महाराजसाहेब, आपले मजवर अनंत उपकार झाले आहेत. ( आठवण होऊन व प्याला खालीं ठेवून राजास हात जोडितो. ) सरकार, माझा आणखी थोडा अर्ज आहे. माझ्या बापानें मरते-समयीं माझ्या मनगटाला कागद घालून हा ताईत बांधिला आहे. तो मी आपल्या एकविसाव्या वर्षी किंवा त्याच्यापूर्वी मृत्यु आल्यास त्या वेळीं खुद्द आपणां-पाशीं द्यावा, दुसऱ्या कोणाचे हातांत देऊं नये, व मीही तो उघडूं नये, अशी त्याची मला आज्ञा आहे. त्याप्र-माणें आजपर्यंत मी हा संभाळून ठेविला, व आतां परमे-श्वरकृपेनें सरकारच्याच चरणांपुढें माझा अंत होत आहे, तरी ही आपली वस्तु आपण घ्यावी. ह्मणजे मी आ-पल्या पित्याच्या आज्ञेंतून मुक्त होईन. ( ताईत सोडून पुढें ठेवितो. )

राजा—अधिकारी, कसला कागद आहे तो द्या पाहूं. ( अधिकारी ताईत घेतो व तो उघडून आंतील कागद राजाच्या हातांत देतो. ) फार काय लिहिलें आहे हें ! ( कागद वाचूं लागतो व कांहीं वाचल्यावर चपापून एकदम आपल्या खुर्चीवरून उठून बाजूस उभा रहातो. त्याबरोबर सर्व उठतात. ) अहा-

हा !!! केवढ्या मोठ्या समाधानाचें वृत्त आज मला समजलें आहे हें ! व किती अत्यानंदाची घटका ही ! परमेश्वरा, तुझी लीला फारच अगाध आहे. व तुझी इच्छाही मनुष्यबुद्धीला अगदीं अतर्क्य आहे. आज केवढा भयंकर अनर्थ मज मूढाच्या हातून घडत होता ! जगामध्यें मी किती दुष्ट, अधम, व चांडाळ होत होतों ! केवळ मदांध होऊन आपल्याच पायावर आपल्याच हातानें कुठारीचा किती दुःसह प्रहार मारून घेत होतों ! व साराजन्म पश्चाताप, शोक, व अपकीर्ति यामध्यें जाण्यासारखें केवढें घोर पापकर्म करण्यास मी प्रवृत्त झालों होतों ! परंतु हे भल्या मनुष्या चांगाजी, तुजमुळेंच मी या महा अनर्थातून वांचलों, व अपूर्व सुखाच्या मार्गावर येऊन पोहोंचलों. तूंच मला आज ही महा-यश संपादण्याची संधि आणून दिलीस. माझ्या मनां-तला हेतु, जो पूर्ण होण्याचा संभवच वाटत नव्हता, तो पुरविणारा असा माझा खराखरा जीवलग प्राणमित्र झालास. इतर राजांमध्यें मला विशेष धन्यता मिळवून दिलीस. व माझी कृतज्ञता आणि पूर्वापार लौकिक हीं संभाळिलींस. चांगाजी, जर तूं आज असतास, तर या क्षणीं मी तुला मोठ्या प्रेमानें घट्ट आलिंगन दिलें असतें. तुला मी आपला बंधू समजून अर्धे राज्य आज तुझ्या स्वाधीन केलें असतें. व आमरण तुझ्या अध्यां वच-नांत राहिलों असतों. इतके तुझे आज मजवर उपकार झाले आहेत. व मी तुझा ऋणी झालों आहें. ( प्रधान व न्या-

याधीश यांस ) प्रधानसाहेब, न्यायाधीशसाहेब, आपण उभयतां खरोखरी महारत्नें आहांत. परमेश्वरानें आपणांस जन्मतःच ज्ञानी केलें आहे, याचें प्रत्यंतर आणखी तें काय पाहिजे? आपणांपुढें मी अगदीं मतिमंद आहें. तुह्मी होतां ह्मणूनच माझी कीर्ति उज्वळ राहिली. माझ्या कुलाच्या शुभ्र कीर्तीवर अविचारानें व आपल्याच हातानें कधींही न जाणारा असा मोठा कृष्णवर्ण डाग पाडून घेत होतों, परंतु तुह्मी मोठ्या चतुराईनें माझा हात सांवरिलात, आणि जगांत होणारा माझा दुर्लौकिक टाळिलात. आपल्या मनुष्यपरिक्षेची व आपल्या चातुर्याची जितकी स्तुति करावी तितकी थोंडीच आहे. फारच धन्य आहांत. ( सटवाजीपुढें होऊन मुजरा करितो व हात जोडून ) पुण्यश्लोक महा भाग्यवंत, मी आपला फार अपराधी आहें. ( सर्व सटवाजीकडे आश्चर्यानें लक्ष्य लावून पहातात. ) आपलें खरें मृगेंद्रस्वरूप न जाणून ज्यांना क्षमाच नाहीं, असे महा अपराध मज उन्मत्त मतंगजाकडून झाले आहेत. व त्याबद्दल क्षमा मागण्यास या दासाला तोंड नाहीं. ( तसाच हात जोडून उभा राहतो. )

सट०—( आश्चर्यानें ) महाराज, आपण असें काय भाषण करितां? मी गरीब व नीच जातीचा एक यत्किंचित् मनुष्य आहें. आपणांकडून अपराध तो काय झाला?

राजा०—महाराज, आपणा राजेंद्रांना जो नीच जा-

तीचा व यत्किंचित् सज्जन असेल, तो केवळ मूढ, चांडाळ व महापापी असला पाहिजे. महाराज, मज-सुद्धां छपन्न मांडलिक राजांचीं मस्तकें ज्यांच्या चरणां-पुढें नम्रपणें लवतात, त्या सार्वभौम चक्रवर्ती राजाधिराज श्रीप्रतापसिंहमहाराज, व त्यांच्या पट्टराणी, साध्वी मातोश्रीमैनावतीसाहेब, यांच्या पोटीं जन्मलेलें अद्वि-तिय पुत्ररत्न, व माझे स्वामी असे सत्वशील छोटे महा-राज—( हैबतराव भेदरून खालीं पहातो. )

वा०—[ सत्वशील ऐकतांच ] बाळा सत्वशीला, अरे सत्वशीला—[ असें ह्मणत एकदम सत्वशीलाच्या गळ्यास मिठी मारून त्याच्या डाव्या खांद्यावर मूर्छित पडते. ]

**सत्वशील**—( दोन हातांनीं संभाळून आश्चर्यानें ) ही सा-ध्वी माझीच प्रत्यक्ष आई!

**राजा**—या मातोश्री मैनावतीसाहेब आहेतना? काय विचित्र हा योगायोग? [ सत्वशीलाच्या मागें जाऊन ] अरे! पाणी आणा. पंखा द्या इकडे. ( नोकर लोक गडबडीनें आणितात. राजा आपल्या हातानें वारा घालितो. सत्वशील मै-नावतीच्या डोळ्यांस व मस्तकास पाणी लावितो. ) अहाहा! आमच्या मातोश्रीमहाराणीसाहेब येथेंच आहेत असें जर मला पूर्वी कळतें, तर मी यांचें आदरातिथ्य किती चांगलें ठेविलें असतें! यांची सेवा किती केली असती! परंतु हें या हतभाग्याच्या नशिबीं कोठून असणार!

**सत्वशील**—अरेरे!!! माझी जन्मदाती, माझें परम दैवत, आणि प्रत्यक्ष सार्वभौम चक्रवर्तिनी, पण पुष्कळ वर्षें माझा

बाळ, माझा बाळ, करीत अशी दीन झालेली, अशा माझ्या आईच्या या कंठाला माझ्याच हातून फांस चढून व लोकांसमक्ष हालअपेष्टा होऊन मातृहत्त्या होण्याची पाळी आली होतीना? व पुन्हां आतां याच घटकेस मला नेत्र भरून पाहून पुरते आनंदाश्रूही निघाले नाहींत, तोंच ही नको नको ह्मणत असतां हिच्या समक्ष आपल्याच हातानें मी विष पिऊन मरण पावल्यामुळें पुत्रशोकानें शेवटीं मातृहत्त्याच घडणारना? हर हर!!! हे हतभागी सत्वशीला, काय हें तुझें पूर्व जन्मीचें संचित, कीं या महासाध्वी सार्वभौमिणीच्या उदरीं तूं कालकूट विष जन्मास येऊन हिचा सारा जन्म केवळ दुःखमय करून टाकिलास! अरे, पोटीं आल्या दिवसापासून तूं हिच्या दुःखास सुरुवात तर केलीसच, पण पुन्हां पुष्कळ वर्षांनीं तुझी भेट होते न होते तोंच हिला तूं आणखी शतगुणित दुःख देणार? काय हा तुझ्या मुखावलोकनाचा परिणाम! केवढें हें तुझें दुर्भाग्य, कीं तुजमुळें एकाही प्राण्याला सुख न होतां सर्वांना महत् दुःख होऊन त्या दुःखांतच त्यांचा शेवट व्हावा; आणि सर्वांच्या हत्त्येचें पातक तुज अभद्राच्या कपाळीं यावें? अरे, तूं सार्वभौम राजाचा पुत्र होऊन प्रत्यक्ष आपल्या आईलासुद्धां समाधान देण्याचें तुझ्या भाळीं नाहीं? धिक्कार असो तुला!!! (स्तब्ध राहतो.) आई, सावध हो, सावध हो. या सत्वशीलाकडे एकवार पहा, व त्याला शेवटची भेट देऊन हा पापी देह सोडण्यास आज्ञा दे.

आपल्या मातेला व दुसऱ्यांना दुःख देणाऱ्या या पापी

देहीस मी अगदीं त्रासलों आहें. (विषाकडे पाहून) हे विप्रा, जरी दैव यासमयीं साम्राज्यलक्ष्मीसहित महासत्ता व महाऐश्वर्य ह्यांचें आमिष पुढें करून मला मोह घालूं पहात आहे, तरी तूं निराश होऊं नकोस. मी त्या सार्वभौमराज्याला कधींही भुलणार नाहीं. पण काय करूं? पुष्कळ वर्षांनीं माझ्या आईची भेट झाली आहे. त्यामुळें तिला गहिंवर येऊन ती माझ्या अंगावर मूर्छित पडली आहे. तरी ती सावध झाल्यावर तिच्याशीं शेवटचे दोन शब्द बोलून व तिची आज्ञा घेऊन नंतर तुला मान देतों. पण हें काय आश्चर्य, कीं मी सार्वभौमराजाचा पुत्र, व ही माझी आई सार्वभौमराजाची पट्टराणी, आणि आमची ही दशा? हें काय?

**राजा०**—(हात जोडून) महाराज, हें चांगाजीचें पत्र ऐकिल्यावर आपणांला सर्व हकीकत कळून येईल. प्रधानसाहेब, महाराजांना हें पत्र वाचून दाखवा.

**प्रधान**—आज्ञा, (घेऊन वाचतो.) " श्री संभाजी
" महाराज यांचे चरणीं चांगाजी मांग याचा दंडवत व
" विज्ञापना कीं, मी पहिल्यानें बडे महाराजसाहेबांच्या
" राजधानींत नोकर होतों. माझें तेथील नांव धर्माजी.
" बडे महाराजसाहेबांना त्यांच्या थोरल्या मैनावती राणी
" विषयीं वाईट संशय आला. त्यावरून अरण्यामध्यें
" तिचा वध करण्याची आज्ञा मला झाली. याच सं-
" शयामुळें मुख्य प्रधान यादवसवबाबासाहेब यांच्या
" वरही महाराजस्वारी नाराज झाली. त्यांस बरतर्फ

" करून व त्यांचें सर्व कांहीं जप्त करून त्यांस कैदेंत
" ठेवण्यांत आलें. खरी गोष्ट अशी कीं, महाराणी
" मैनावती व बाबासाहेब हीं दोघें फार सज्जन व पवित्र
" माणसें होतीं, परंतु धाकटच्या राणीच्या कृष्णकार-
" स्थानामुळें हा सर्व प्रकार घडून आला होता. तो
" अनर्थ टाळावा ह्मणून मी महाराजसाहेबांच्या आज्ञेस
" होय ह्मणून महाराणीस अरण्यांत नेलें. त्यावेळीं ती
" गरोदर होती. तिला तेथें जवळच एके खेड्यांत
" एका बाईपाशीं ठेविलें. व मी परत राजधानींत
" गेलों. राजधानींत गेल्यानंतर खटपट करून बाबा-
" साहेब, त्यांची स्त्री, व लहान मुलगा, यांस तेथून
" युक्तीनें पळविलें. प्रधानाचा मुलगा मात्र मी आप-
" ल्या जवळ घेतला, व त्या दोघांना कांहीं वर्षें तीर्था-
" टन करण्यास सांगितलें. प्रधानपुत्रास राणीजवळ
" ठेविलें. मी मधून मधून राणीच्या समाचारास जात
" असे. या संधीस माझी बायको वारली. तिला मुल
" बाळ नव्हतें. तरी मी दुसरें लग्न केलें नाहीं. पुढें
" राणी बाळंत झाली. तिला मुलगा झाला. त्याचें नांव
" आपलें सत्व राखावें ह्मणून तिनें सत्वशील असें
" ठेविलें. सत्वशील दोन वर्षांचा झाल्यानंतर मी त्या
" राजधानींतील नोकरी सोडिली. महाराणीस पुढच्या
" बऱ्यावर नजर देऊन कांहीं वर्षें बैरागीण होऊन
" देशपर्यटन करण्यास सांगितलें. तिनें मोठ्या कष्टानें
" आपला मुलगा माझेस्वाधीन केला. परंतु तिचा

" मजवर पूर्ण भरंवसा होता. पुढें मी दोघां मुलांना
" घेऊन या राजधानींत आलों. येथें मला नोकरी मि-
" ळाली. सत्वशीलाचें नांव सटवाजी ठेवून व तो माझाच
" मुलगा आहे असें प्रसिद्ध करून त्याला मीं आपल्या
" जवळ ठेविलें. प्रधानपुत्र वसंतमाधव यास येथील
" जाहागीरदार आपासाहेब भोसले यांना संतान नस-
" ल्यामुळें हा गरिबाचा सांपडलेला मुलगा आहे असें
" सांगून त्यांच्यास्वाधीन केलें " ( थांबतो ) बाळपणीं
माझें लालनपालन मैनावती आईसाहेबांनीं केलें आहेना ?
अहाहा !!! परमेश्वरा, तुझे मजवर फार उपकार आहेत.
तूंच त्यावेळेस मला सुबुद्धि दिलीस, ह्मणून बाळपणीं
बरोबर वाढलेल्या माझ्या खऱ्या धन्याला मी जामीन
राहिलों, व कैदेची दुष्ट पाळी टळली. ( न्यायाधिशास )
न्यायाधीशसाहेब, हे सर्व आपले उपकार आहेत बरें.
( न्यायाधीश खालीं मान घालून एकाग्र नजरेनें तटस्थ राहतो
वसंतमाधव पुढें वाचतो. ) " दोन्ही मुलें मजजवळ अस-
" तांना मीं त्यांस दूध व फळफळावळ यांवर वाढविलें.
" राजपुत्र तर मोठेपणींसुद्धां दुधावरच आहे. या रा-
" जधानींत आल्यावर राजपुत्राकरितां ह्मणून मी लिहा-
" यलावाचायला शिकलों. पुढें मलाच नाना ग्रंथ
" वाचण्याची गोडी लागली. राजपुत्रास समजूं लाग-
" ल्यावर त्याचा विद्याभ्यास मींच केला. हल्लीं तो
" चांगला शहाणा झाला आहे. महाराणी, प्रधान, व
" प्रधानस्त्री, यांहीं राजपुत्राच्या एकविसाव्या वर्षी

" ह्मणजे जयनाम संवत्सरीं रत्नपुरीस यावें, तेथें
" मी दोन्ही मुलांसुद्धां भेटेन, व तोंपर्यंत मी लोक व
" गैरमाहीत अशा ठिकाणीं गुप्तपणें राहीन, असें त्यांस
" सांगून ठेविलें होतें. अगोदर एक वर्ष येथें येण्या-
" विषयींही सुचविलें होतें. मला आयुष्य असतें, तर
" तो आनंदाचा दिवस मला पाहण्यास मिळता. परंतु
" माझा अंतःकाळ येऊन ठेपल्यामुळें ही हकिगत ताइ-
" तामध्यें घालून राजापुत्राजवळ दिली आहे. व हा
" ताईत खुद्द आपणांजवळ देण्यास त्यास सांगून ठेविलें
" आहे. तरी वडच्या महाराजसाहेबांना ही हकीगत
" कळवून त्यांचा पुत्र त्यांच्यास्वाधीन करावा. ही
" चरणीं विज्ञापना." माझीही आई आणि बाबा
अजून आहेत तर? देवा, त्यांना मी केव्हां बरें पाहीन?
( जरा स्तब्ध राहतो व सत्वशीलास हात जोडून ) दासावर
कृपा असावी.

मैना०—[ सावध होऊन] बाळा सत्वशीला,

सत्व०—आई, सावध हो. ज्याच्या भेटीकरितां
तुझा प्राणांतिक दुःखें भोगावीं लागलीं, तो हा मी तुजजवळ
च आहे. मजकडे पहा.

मैना०—( दीन स्वरानें ) बाळा, कारे तूं आपल्या जि-
वाला इतका कंटाळास? अरे, तुला एवढा वैताग कां
आला? मला सांग. बाळा, तुला तान्ह्याला सोडून जे-
व्हां मी दूर गेलें, तेव्हांपासूनचं माझं दुःख किती ह्मणून
तुला सांगूं? आतां बारा वर्षांनीं तूं भेटलास, आणि तुला

तर विष पिऊन केव्हां प्राण सोडीन असं झालं आहे. बाळा, असं करूं नको, माझं ऐक. ( बसावयास जाते. राजा खुर्ची जवळ आणितो. सत्वशील हात धरून बसवितो, व जवळ उभा राहतो. )

राजा०—( हात जोडून ) आईसाहेब, त्या दुष्ट विषाची गोष्ट आपण आतां अगदीं मनांत आणूं नये. मज अधमाला कुबुद्धि झाली होती, परंतु आपल्या चरणांच्या पुण्यप्रतापानें ती महा भयंकर वेळ टळली. परमेश्वरानें मोठा सुदिन दाखविला. आपले नष्ट दिवस निघून गेले. आतां आपण सत्वशीलमहाराजांचें सर्व सुख पहाल. वडचा महाराजसाहेबांना आपणांबद्दल फारच पश्चाताप झाला होता. तशांतून त्यांना दुसरें पुत्रसंतान नसल्यामुळेंतर ते जास्तच दुःखी आहेत. आपण आपल्या छोटेमहाराजांसुद्धां मजजवळ आहांत, ही खबर कळतांच त्यांना फारच आनंद होईल, व ते जसे असतील तसे आपणांस नेण्याकरितां येतील. याहून जास्त आनंदाची वेळ त्यांना दुसरी कोणती येणार ?

सत्व०—आई, महाराजसाहेब, यावेळची माझ्या मनाची स्थिति मी आपणांला काय सांगूं ? काय विचित्र वेळ ही ! काय चमत्कारिक योगायोग हे ! केवढा दैवाचा अतर्क्य खेळ, व मज अभाग्याच्या अंतःकरणामध्यें एकाएकीं आनंदाचा महा पूर, व त्या बरोबरच त्यावर अति दुःसह दुखाचा भयंकर शिलापात! कसा अशा विलक्षण व हृदयद्रावक रीतीनें माझें सत्व पाहण्याचा ईश्वरीसंकेत!

खरोखरींच असा प्रसंग आजपर्यंत कोणावरही आला नसेल. आतांच अगदीं थोड्या वेळापूर्वी कसलीही इच्छा न राहतां मरणाचा मला किती उल्हास वाटत होता! व त्याकरितां मी किती आतुर झालों होतों! परंतु, इतक्यांत माझें खरें स्वरूप बाहेर पडण्याचा, व जिला मी मृत समजत होतों त्या माझ्या जन्मदात्या मातेला प्रथमच ओळखण्याचा, असा योग एकाएकीं आणून परमेश्वर कसा माझ्या मनाची चलबिचल करूं पहात आहे! व मलाही आतां मरणाची गोष्ट किती अवघड वाटत आहे! काय आश्चर्य आहे, कीं आतांच ज्याला जगामध्यें आपल्या ममतेचें नातलग मनुष्य कोणीच नाहीं असें वाटत होतें, त्या माझें नवमास ओझें वाहणारी, सार्वभौमराजाची पट्टराणी, व माझ्याच भेटीकरितां पुष्कळ वर्षे बैरागिणीचा वेष धारण करून प्राणांतिक हाल व विटंबना सहन केलेली, अशी माझी आई मजवत्साच्या प्राणावरील संकटसमयीं कशी गायीप्रमाणें हंबरत आली आहे; व ती, आपणाला फांशीसारख्या भयंकर मृत्यूपासून सोडविणारा सदय व पुण्यशील प्राणी माझाच धर्मानें ज्याला स्वाधीन केलेला बाळ सत्वशील आहे असें एकाएकीं ऐकून, व तो विषाचा प्याला हातांत घेऊन मरणाची अगदीं वाट पहात आहे हें डोळ्यांनीं पाहून, एकदम आलेला प्रेमाचा पूर व गहिंवराचा लोट न सांवरल्यामुळें सत्वशील, सत्वशील, करीत माझ्या अंगावर मूर्छित पडून आतांच सावध झाली आहे. अशा प्रसंगीं को-

णा सत्पुत्राचें अंतःकरण आपल्या प्रिय मातेकरितां कळवळणार नाहीं ? व कोण तिच्या मायापाशांत गुंतला जाणार नाहीं ? तसेंच, जो, या घटकेपर्यंत आपणास नीचाहून नीच व लोकांमध्यें अगदीं तुच्छ अशा अघोर मांग जातींत जन्मलेला एक यत्किंचित् प्राणी समजत होता, त्याला आपण, प्रस्तुत विद्यमान असणाऱ्या सार्वभौम चक्रवर्ती राजाधिराजाचा एकुलता एक औरस पुत्र असून, सार्वभौमत्वाच्या संपूर्ण सत्तेचे पूर्ण वारस आहोंत, असें एकाएकीं कळल्यानें कोणत्या मनुष्य प्राण्याला आपल्या अद्वितिय महाभाग्याची विशेष धन्यता वाटणार नाहीं व अशा या अत्यानंदाच्या भरांत कोणाची चित्तवृत्ति बदलणार नाहीं ? पुन्हां, जो माझा पिता, आपण निपुत्रिक आहोंत असें समजून पुत्रदर्शनाचें सुख आतां स्वप्नामध्येंसुद्धां या जन्मीं मिळणें नाहीं म्हणून अगदीं उदास झाला आहे, व गर्भवासांत वध केलेलें बालक वेळेस पुत्र निघून आजला वयांत आलेला व सर्व साम्राज्य संभाळणारा असा युवराज असता, असें वारंवार मनांत आणून पश्चातापानें व खेदानें आपणास जाळून घेत आहे, आणि रात्रंदिवस झुरणीस लागला आहे, त्याला आह्मी वध केलेलीं मायलेंकरें अजून विद्यमान आहोंत अशी खबर कळतांच त्याच्या आनंदास पारावार नाहींसा होऊन, तो आह्मांस पाहण्याकरितां भूकतहान व मानापमान वगैरे सर्व सोडून जसा असेल तसा कसा मोठ्या त्वरेनें धांवत येईल ? व येतांक्षणींच

आधीं मला घट्ट आलिंगन देऊन आपल्या आनंदाश्रूंनीं पुन्हपुन्हां मला किती वेळां तो सर्वांग नाहूं घालील? आणि मलाही, दुःखानें होरपळून गेलेल्या आपल्या पित्यावर केवळ एका दर्शनानेंच पूर्ण सौख्याची अद्वितीय वृष्टि करून, त्यास आनंदीआनंद दिल्याचें केवढें मोठें दिगंतरीं पसरणारें यश व महापुण्य हीं मिळणार आहेत? तेव्हां, अशा या अपूर्व महाभाग्याचा व पूर्ण आनंदाच्या गोष्टींचा योग एकाएकीं आल्यानें या पृथ्वीवरील कोणता मनुष्यप्राणी मायेच्या मोहपाशांत गुंतुन आपलें आयुष्य वाढण्याची इच्छा करणार नाहीं? व साम्राज्याच्या महा ऐश्वर्यासहित आपल्या वृद्ध मातापितरांसन्निध राहून, व अति सुंदर अशा वधूबरोबर विवाह करून नंतरच्या खरोखरीच अवर्णनीय अशा सौख्यामध्यें कालक्रमण करण्याचा अभिलाष कोण करणार नाहीं? आणि, आपल्या पूर्व संकल्पाविषयीं झाली गोष्ट ती ज्याच्या त्याच्या दैवानें झाली, अशा प्रकारचें मनाचें समाधान करून, व मातेचें निमित्य पुढें करून, प्राणाचा नाश करणारा हा विषाचा प्याला कोणता मनुष्यप्राणी तिरस्कारानें दूर भिरकावून देणार नाहीं! पण अशी गोष्ट मजकडून कधींही होणें नाहीं. माझा शब्द सत्वाची एक स्वयंप्रकाश ज्योति हा मृत्युलोक सोडून जाते वेळीं घेऊन गेली आहे; व जो मी नीच मांग जातीचा सटवाजी असतांना कोणताही लोभ न धारतां आपले सत्वास कधीं ढळलों नाहीं व कृतघ्न झालों

नाहीं, तो मी, आतां उत्तम क्षत्रिय कुलांतील व त्यांतून महासाध्वी मैनावती महाराज्ञीचा कुमार सत्वशील झाल्यावर या नाशवंत देहाकरितां किंवा दोन दिवसांच्या क्षणभंगुर ऐश्वर्याकरितां वचनभ्रष्ट होऊन कृतघ्न होईन, अशी गोष्ट तर कधींच होणार नाहीं. पण काय करावें? आईच्या या करुणास्वरापुढें मात्र मी अगदीं हतवीर्य झालों आहें. कारण, तिकडे ती दैदिप्यमान ज्योति आपल्या सत्वाच्या प्रभावानें माझा प्राण स्वर्गलोकीं आपणाकडे आकर्षण करीत आहे, व इकडे पुष्कळ वर्षांनी याच घटकेस भेट झालेल्या आईचा अनिवार ममतापाश मला भूलोकींच ठेवूं पहात आहे, आणि अशा या दुसह ओढाताणीमुळें माझा जीव अगदीं विव्हळ होऊन गेला आहे. ( स्तब्ध राहतो. ) अहाहा!!! चार घटकांपूर्वीच जर हें वृत्त मला समजलें असतें, किंवा मी विष प्राशन केल्याची सूचना मिळाल्यानंतर विष पिण्यास सांगण्याचें मला सुचलें असतें, तर अशा या सर्वांच्या महदानंदमयीं माझ्या आनंदरूपी दिव्याची जोत कां बरें मालविलेली असती? व संपूर्ण साम्राज्याच्या उत्साहरूपी सूर्यानें पूर्णपणें प्रकाशित होणाऱ्या आनंदमय सृष्टीच्या जागीं, वर्षाऋतूंतील नभांनीं सर्व दिशा भरून जाऊन प्रचंड मेघधारा वर्षत आहेत, अशा अमावास्येच्या मध्यरात्रीचा निबिड अंधःकार होण्याची वेळ कां बरें आली असती? परंतु अरेरे!!! त्या महाशक्तिमान, महातेजस्वी, महामंगला, जी, ईश्वराची अतिप्रिय वस्तु व

सर्व साम्राज्याची पूर्ण शोभाच, प्राणीमात्राचा केवळ संतोष व पृथ्वीवरील समृद्धीचा मोठा आधार, निर्मळ शौर्याची प्रत्यक्ष स्फूर्ति व ज्ञानाचें अगाध भांडार, दयेचा महा-सागर व पुढच्या अपूर्व आनंदसोहळ्याचें कारण, आणि माझाच प्रत्यक्ष प्राण, अशा शुद्धसत्वा अमृतसंजीवनीचा मज जन्मकरंट्याच्या हातून या चार घटकांपूर्वीच नाश होऊन गेल्यामुळें असा दुःखमय प्रसंग येत आहे. व कांहीं वेळानें साम्राज्य या उद्यानांतील मानवरूपी सर्व वृक्षलता-दिकांचा प्रफुल्लितपणा व टवटवी जाऊन व सर्व शुष्क-काष्टं होऊन, शेवटीं आसमंतात् विस्तीर्ण वाढणाऱ्या शोकार्णवांत तीं सारीं वाहून जाणार आहेत. आणि या सर्वांचें कारण हा मी पापी आहें.

**मैना०**—सत्वशीला, अशा या आनंदाच्या वेळीं तूं रे कां बाळा असा उदास झाला आहेस? अशी काय तुझ्या मनाला हळहळ लागून गेली आहे, कीं तुला या वेळीं प्राण सोडिलाच पाहिजे? बाळा, काय आहे तें मला सांग.

**राजा०**—प्रधानसाहेब, महाराज असे उद्गार कां का-ढितात तें मला समजत नाहीं. महाराजांच्या अपूर्व लाभामुळें आपण सर्व जण काय उमेदी करीत आहोंत, आणि महाराजांच्याच मुखांतून असे उद्गार?

**प्रधा०**—मलाही हें गूढ काय आहे तें समजत नाहीं. (सत्वशीलास हात जोडून) अन्नदाता, आपल्या मनाची अशी स्थिति कां झाली?

मैना०- बाळा, सांगरे सांग. असें काय तुझ्या मनाला खात आहे?

सत्वशी०-(कंठ भरून येऊन उसासा टाकतो.) आई, माझी अशी स्थिति होण्याचें कारण माझ्या नेत्रांसमोर अगदीं मूर्तिमंत आहे. पण-( स्तब्ध राहतो इतक्यांत हुजऱ्या येतो. )

हुज०-( मुजरा करून ) सरकार, ताईसाहेबांनीं रात्रीं मला हें पत्र देऊन ठेविलें आहे, आणि सकाळीं सरकारस्वारी येथून उठण्याच्या पूर्वी आपल्याच हातांत हें देण्यास सांगितलें आहे. ( पत्र देतो.)

सत्व०-आई, हेंच माझ्या या स्थितीचें कारण आहे. ( डोळे पुसतो. )

राजा०-( पत्र वाचतो व उसासा टाकून ) प्रधानसाहेब, घात झाला. श्रीमती पहांटेस विष प्याली. वैद्याला घेऊन लौकर महाराजांच्या ठिकाणीं या. आम्हीही सर्व तिकडेच येतों. [ प्रधान जातो. ] महाराज, विष पिऊन फार वेळ झाला नसेल, तरी आपण श्रीमतीकडे जाऊं चला. ( डोळे पुसतो. ) हर हर !!!

सत्व०-महाराजसाहेब, वेळ फार होऊन गेला. आतां तिची आशा नाहीं.

मैना०-सत्वशीला, एव्हांच धैर्य सोडूं नको. (राजास) महाराजसाहेब, चला आधीं आपण तिकडे जाऊं.

सत्व०-पण आई, जी श्रीमतीची वाट तीच माझी वाट. हा प्याला मला बरोबर नेलाच पाहिजे.

**राजा०**—कोतवाल, माझी लडकी जर उठून बसली, तर ती छप्पन्न राजांवरील स्वामिणी झालेलीच आहे. तेव्हां या राज्याची मला आतां इच्छा नाहीं. ती न उठल्यास मग मात्र मला आजपासून कसलीच जरूर नाहीं. मी शुद्ध वैरागी होणार. तरी आतांच्या आतां तमाम स्वार लोक बोलावून त्यांस शहरांत ठिकठिकाणीं व शहराबाहेर भोंवतालीं लांबीच्या पल्ल्यावर जेथें तेथें पाठवून चोहोंकडे लौकर जाहिर करा कीं, राजकन्या श्रीमती पहांटेस विष प्राशन करून बेशुद्ध पडली आहे. तरी तिला जो कोणी उठवून बसवील, त्याला आजपासून माझें सर्व राज्य बक्षीस देण्यांत येईल.

**सत्व०**—महाराजसाहेब, जिजाबाई भितीमुळें वेळेस आपल्या जिवाला अपाय करून घेतील, तरी त्या राजवाड्यांत आहेत किंवा कोठें गेल्या याचा तपास आधीं करवा.

**राजा०**—कोतवाल, जिजाबाईचाही शोध करून त्यांना श्रीमतीकडे पाठवा. (कोतवाल जातो)

**मैना०**—चला आधीं श्रीमतीकडे. (सत्वशील प्याला घेतो., सर्व जातात.)

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळ:**—सत्वशीलाची जागा.

(श्रीमती विष पिऊन निजलेली आहे. दोन्ही बाजूस दोन मांग उभे आहेत.)

रामवा—कायरे महादवा, वेळ बराच होऊन गेला. धोंडवा आणि कोण्डाजी अजून आले नाहींत?

महा०—खरेंच. इतका वेळ लागूं नये. ( जरा विचारांत पडतो. ) हें पहा रामवा, तूं येथेंच अस. मी जरा तिकडे जाऊन पाहून येतों.

राम०—जा. पण लौकर ये हो. ( महादवा जातो. ) देवा, आमचा सटवाजीदादा गेला. सटवाजीदादा, तुझ्यामुळेंचरे या बाईसाहेबांचे पाय आमच्या नजरेस पडले, व यांच्या तोंडचा बंधू हा शब्द आह्माला मिळाला; नाहींतर ही राजाची मुलगी कोठली आमच्या पाशीं बोलणार आणि आह्मांला बंधू ह्मणणार? ( इतक्यांत महादवा घांदलीनें धांवत येतो. )

महा०—रामवा, रामवा, सटवाजीदादा अजून आहेरे. अरे, हें काय झालें? तो पहा येत आहे. त्याच्या बरोबर पुष्कळ मंडळी आहे. महाराजसाहेबसुद्धां आहेत.

राम०—( भिऊन ) खरेंच? तर मग मोठी कठीण गोष्ट आहे. ( आश्चर्यानें ) अरे, तो कोंडाजी कां बरें धांवत आला? अरे, आहे तरी काय? ( कोंडाजी येतो. )

कोंडा०—रामवा, महादवा, अरे आपला सटवाजी दादा मांग नाहीं. तो बड्या महाराजसाहेबांचा मुलगा आहे. चांगाजीच्या पत्रावरून हें समजलें. सगळी हकिगत मी मग सांगेन. पण हें पहा, आतां ती मंडळी आली ह्मणजे आपल्याला दूर उभें राहिलें पाहिजे बरें.

( रस्त्याकडे पहातो. ) रामचा, आलेरे आले. ( दूर उभे राहतात. मंडळी येते )

सत्व०--मित्रांनो, भिऊं नका. मी तुमचा आहे तोच आहे.

राजा०--अजून वैद्यानुवा आले नाहींत? ( उसासा टाकतो व डोळे पुसून श्रीमतीजवळ वसतो, व तिच्या तोंडावर हात फिरवून ) लाडके, हें तूं काय केलेंस? ( मैनावती श्रीमतीजवळ एका बाजूस वसून तोंडावरून हात फिरविते. राजा डोळे पुशीत दूर होतो. सत्वशील श्रीमतीच्या दुसऱ्या बाजूस वसतो. सर्व उभे राहतात. )

सत्व०--( श्रीमतीच्या अंगावरील वस्त्र काढितो ) आई, हीच ती माझ्या साम्राज्याची अखंड लक्ष्मी व माझ्या आल्हादाचा पूर्ण चंद्रमा. महाराजसाहेब, हेंच तें आपल्या पोटीं निर्माण झालेलें सद्गुणांचें केवळ सार व चातुर्याची अगाध खाण. न्यायाधीशसाहेब, हीच ती प्रत्यक्ष सद्बुद्धि व सत्वाच्या आनंदाचें पूर्ण भांडार, अशी माझी जीवनकळा या माझ्या पूर्व दशेंतल्या वस्त्रां-वर प्राणीमात्राला एकदांच येणारी अखंड निद्रा घेत पडली आहे. व या निद्रेमधून जागी होऊन ही उठून बसेल अशी आशा नाहीं. ( डोळे पुसतो. सर्व पुसतात. )

( प्रधान व वैद्य गडबडीनें येतात. वैद्य मुजरा करितो. )

राजा०, वैद्यबुवा, श्रीमती पहांटेस विष प्याली आहे. लौकर औषधोपचार करा.

वैद्य--( नाडी पाहून हात जोडतो. ) सरकार, वेळ फार

झाल्यानें विषाचा पूर्ण अंमल होऊन गेला. नाडीही बहुतेक बंद पडत आली. अशा स्थितींत माझ्या औषधाला गुण येणें कठीण आहे. मी आपलेकडून उपचार करितों, पण त्यानें गुण येईलसा दिसत नाहीं. काय करावें? उपाय नाहीं. ( असें ह्मणून एक मुळी काढितो व उगाळून देतो. )

राजा०—( डोळे पुशीत ) वैद्यबुवा, उपाय नाहींना? हर हर!!! घात झाला हो घात झाला. माझी श्रीमती मला सोडून गेली. धिक्कार असो मज निर्दयाला. न्यायाधीशसाहेब, त्या चांडाळ शास्त्र्याच्या सांगण्यावर भरंवसा ठेवून आपणा सज्जनांचें ऐकिलें नाहीं व दया केली नाहीं, ह्मणूनच मला परमेश्वरानें ही अति भयंकर शिक्षा केली. आतां मला सर्व शून्यवत् आहे. मला राज्य नको. कांहीं नको. मला आतां जगतामध्यें रहावेंसेंसुद्धां वाटत नाहीं. श्रीमती, शेवटीं मला न कळवितां अशा रीतीनें तूं आपला शब्द खरा केलासना? चातुर्यखाणी, शाबास, शाबास!!! लाडके, मला कां नाहीं कळविलेंस? मी कधींही तुझ्या इच्छेविरुद्ध जातोंना. ( डोळे पुसून स्तब्ध रहातो, ) हर हर!!! त्या चांडाळानें न्यायाधीशसाहेबांच्या त्यां अमोल्य शब्दास मान देऊन शिक्षा रद्द केली असती, तर आज नाहीं पण कांहीं दिवसांनीं तरी किती आनंदाचा दिवस मला आला असता! व श्रीमती, तुला ही विष पिण्याची वेळ कां बरें आली असती! पण त्यां दुष्टानें दया केली नाहीं, आणि

हा अनर्थ ओढवून घेतला. अहाहा!!! दया ही कशी वेळेस ध्यानींमनींसुद्धां नसणारें महासौख्य देणारी वस्तु आहे! मीच प्रत्यक्ष जर तेवढी दया करितों, तर कांहीं दिवसांनीं मी केवढ्या मोठ्या आनंदाच्या उंच शिख- रावर जाऊन पोहोंचतों! व या घोर अनर्थाचा आणि अपयशाचा वांटेदार कां झालों असतों! परमेश्वरा, जो मनुष्यप्राणी आपल्या अंतःकरणांत दुसऱ्याविषयीं ने- हेमीं दया बाळगील, त्याचें परिणामीं खरें खरें कल्याणच होईल यांत अगदीं संशय नाहीं. श्रीमती, मी तुझा चांडाळ पिता तुझ्याच प्राणाचा नाश होण्यास कारण झालों. धिक्कार असो मज नटाला. शिव शिव!!! किती मी मूढ व अंध! तेवढी शिक्षा जर रद्द केली असती तर ही वेळ कां येती? श्रीमती, पित्याला सद्गति देणारें तुझ्यासारखें अद्वितीय कन्यारत्न माझी शेवटची भेट घेण्याकरितां मोठ्या प्रेमानें बाबा, बाबा, ह्मणत पुढें यावें, आणि म्यां दुष्ट चांडाळानें काल तुझा तिरस्कार करावा काय? हर हर!!! श्रीमती, त्या वेळेस तुझ्या त्या कोंवळ्या मनाला तरी काय वाटलें असेल! लाडके, आज तुला असें करावयाचें होतें ह्मणून तूं मला शेवटची भेटावयास आली होतीस,-असें जर मला सांगतीस, तर बाळे, जरी मला तुझा राग आला होता, तरी शेवटीं तूं माझी खरी खरी लाडकीच होतीस. ( डोळे पुसतो ) आतां काय उपयोग? तूं गेलीस. ( सर्व डोळे पुसतात. राजा सत्वशीलास हात जोडून ) महाराज, माझ्या दुर्दैवानें श्री-

मती तर गेलीच. ती आतां येत नाहीं. पण आपणांकडून तरी असें न व्हावें. फारच अनर्थ होईल. बडे महाराजसाहेबांचा मजवर अति कोप होईल. त्यांना दुःखांत अधिक दुःख होईल. आणि अशी गोष्ट मी तरी कशी करूं दिली, ह्मणून माझा मोठा दुर्लौकिक होईल. आपण माझ्या यजमानसाहेबांचे पुत्र दैवयोगानें मला मिळाला आहांत, व आपणांस त्यांच्या स्वाधीन करीपर्यंत आपल्या संरक्षणाची सर्व जबाबदारी व जोखीम हीं मजवर आहेत. तरी त्यांची भेट होईतोंपर्यंत तरी आपणांकडून अशी भयंकर गोष्ट होऊं नये. इतकें माझें सेवकाचें ऐकण्याची कृपा व्हावी.

**मैना०**-बाळा, ऐक. आपलाच हेका धरूं नको. तुझ्या एका जिवाकरितां चोहोंकडे कसा अनर्थ होऊन जाईल इकडे लक्ष्य दे.

**सत्व०**—आई, महाराजसाहेब, आपली गोष्ट तर निराळीच, पण अगदीं तिऱ्हाईत अशा कोणत्याही प्राण्याचें नम्रपणें ऐकणारा व त्याचें मन न मोडणारा असा हा सत्वशील आहे. परंतु काय करावें? उपाय नाहीं. माझा प्राण सर्वस्वी या पतिव्रतेला विकलेला आहे. आतां त्यावर माझी किंवा दुसऱ्या कोणाचीच सत्ता नाहीं. केवळ हिला दिलेल्या वचनाचा मी आहें. आई, काय सांगूं, हिचा तो शेवटचा प्रत्येक शब्द हिच्या प्राणाबरोबर माझा प्राण घेऊन जाण्याविषयीं एकसारखा अट्टहास करीत आहे, व घेऊन गेल्याखेरीज

राहणार नाहीं. मात्र, सर्व वस्तुमात्राचा वीट येऊन पूर्ण निवृत्तिस्थिति धारण केलेल्या या परम कनवाळू महासतीलाच जर आपणा सर्वांना आनंद देण्याचें वाटलें, व हात जोडून चरणाशीं तिष्ठत असणाऱ्या भूलोकच्या सर्व सौख्याची दया येऊन त्याचा आदर करण्याचें हिच्या इच्छेस आलें, तरच ही साध्वी आपली ही अखंड व अचेतन समाधि सोडून आपले मिटलेले नेत्र पुन्हां उघडील; आणि असें झालें, तरच आपणांस माझी आशा आहे. हिनें नेत्र उघडून पाहिल्याशिवाय पुढच्या सुखाकडे किंवा अनर्थाकडे दृष्टि देण्यास मी केवळ अंध व हृदयशून्य आहें. अशांकरितां महाराजसाहेब, आतां पित्याच्या भेटीची वाट पहाणें नाहीं, कोणाच्या संरक्षणाची मला जरूर नाहीं, व माझ्यामुळें कोणावर अपयश येण्याची काळजीही नाहीं. हिला दिलेला शब्द मला पूर्ण केलाच पाहिजे. त्यांतून, माझ्या जन्माचीही पुरती वाट न पहातां पित्यानेंच माझा त्याग केला आहे, तेव्हां त्याची मजवर कांहींच सत्ता नाहीं. ( मैनावतीस ) आई, तुझ्यामुळेंच मला हा अमोल्य मानवदेह मिळाला आहे. तुझ्या उदरीं जन्मल्यानेंच मी क्षत्रिय व राजकुलोत्पन्न आहें. तुझ्या कृपादृष्टीनेंच तुजपासून दूर कां होईना, पण आज मी लहानाचा मोठा होऊन तुझ्याच पुण्याईमुळें सुशील व सद्गुणी निपजलों आहें, व आतांच्या या प्रसंगीं सार्वभौमत्वासारखें महद्भाग्य आलें असतांही तिकडे न पाहतां प्राण देऊन

वचनें पूर्ण करण्याविषयीं माझी बुद्धि स्थिर आहे,हा तुझ्याच सत्वाचा प्रभाव आहे. आणि शेवटीं, तुझ्याच आशीर्वादानें माझें हें वचन सिद्धीस जाऊन मी तुझा बालक सत्यवचनी व निष्कलंक सुपुत्र होणार आहे, व तुझें व माझें मनुष्यजन्मास आल्याचें सार्थक होणार आहे. आई, केवळ धनाचा व पुत्रपौत्रादिक सुखाचा लोभ करणारे मनुष्यप्राणी साधारण वर्गापैकीं आहेत. परंतु जिवाचें चीज व सार्थक करणाऱ्यांचा वर्ग सर्वांत श्रेष्ठ आहे. तें प्राण्याचें चीज सत्यवचन, कृतज्ञता, व परोपकार, यांतच खरें खरें होत असतें. आई, तूं जाणतच आहेस, कीं मनुष्यप्राण्याच्या धैर्याची व त्याच्या निरिच्छतेची खरी पारख त्याच्या सत्यवचनांत आहे, आणि आपल्या क्षत्रिय कुलामध्यें जन्मलेल्या प्राण्यासतर दिलेल्या वचनाचा भंग व कृतघ्नता यांसारखें लांछन व महत्पाप दुसरें कोणतेंच नाहीं. ह्मणूनच द्रव्यादिकाची कोणतीही तृष्णा न राहिलेले असे महान महान योगी व तपस्वी, शेवटीं आपल्या सत्वाची परीक्षा देऊन जिवाचें सार्थक्य करण्याकरितां जन्मतांच प्राणावर उदार अशा मनोवृत्तीचे बनून, क्षत्रियकुलांत वीरांचा जन्म घेतात. व बालपणापासूनच आपला शब्द वृथा न व्हावा ह्मणून हातांत शीर घेऊन आपल्या धैर्यादि सर्व गुणांच्या परीक्षेची वाट मोठ्या उल्हासानें पहात असतात. ती अपूर्व संधि आई, आतां आली आहे. यावेळीं तुझ्या व माझ्या सत्वाची परीक्षा आहे. त्यांतून,

आपल्या विपत्तीच्या दिवसांत केवळ सत्वावर भरंवसा ठेवून व तें मी राखावें ह्मणून माझें नांव सत्वशील असें तूंच ठेविलें आहेस, व त्याप्रमाणें तुझा तो हेतु पूर्ण होण्याचा व तुझ्या सत्वाचा प्रकाश सर्व पृथ्वीवर पड़ण्याचा दिवस आज आला आहे. आतां, एकवार मला पाहण्याचा तुझा हेतु होता, पण तो ही तुझ्या सत्वावर दृष्टि देऊन परमेश्वरानें मोठ्या विलक्षण रीतीनें पूर्ण केला आहे. तरी आई, या वेळेस तूं ममता व लोभ सोडून दे, आणि आपल्या कर्तव्यामध्यें यशस्वी हो असा मला आशिर्वाद दे. आणखी आई, ज्या वेळेस तुझ्या मुलाचें खरें स्वरूप अगदीं गोप्य होतें, व सर्व लोक त्याला नीच व अमंगळ मांग जातीचा मनुष्य समजत होते, अशा त्या माझ्या दशेंत या एकट्या श्रीमतीनेंच तुझ्या मुलाला तुझ्या योग्यतेनुरूप असा बहुमान दिला. आपल्या संकल्पाप्रमाणें मनोभावें माझी पत्नी झाली. मजकरितां आईबाप, राज्य व सुख या सर्वांचा हिनें लोभ सोडिला. मजबरोबर आपणही विरक्त राहिली. व शेवटीं माझा प्राण जाण्याची वेळ आली ह्मणून माझ्यापूर्वी आपणच होऊन भयंकर विषाचा प्यालाही मोठ्या आनंदानें प्याली, आणि आतां प्रेत होऊन अशी पडलेली आहे. आई, तुला काय सांगूं? तरुण व रूपवती राजकन्या पतीच्या अंगस्पर्शाचा निजध्यास शारिरीक सुखाकरितां करितात, पण ही सुंदरी केवळ माझ्या चरणांवर मस्तक ठेविण्यापुरत्याचे अंगस्पर्शाची भुकेली होती. व

त्याविषयींची आज्ञा जेव्हां ही वेल्हाळी मजपाशीं मागूं लागली, व तें मी माझ्या त्या वेळच्या भिन्न जातीमुळें तें नाकारिलें, तेव्हां निदान कधींतरी एकावेळची तरी आज्ञा द्या, ह्मणून मोठ्या आशेनें मला ह्मणाली. त्या वेळीं माझ्यानेंही हिला नाहीं ह्मणवेना. आई, तो आपला हेतु या श्रीमतीनें विष घ्यावयाच्या वेळीं पूर्ण करून घेतला. व मोठ्या प्रेमानें आणि भक्तीनें आपलें मस्तक माझ्या चरणांवर ठेवून ' देवा, असल्या पवित्र पदकमलांचा लाभ मला निमिषमात्रच मिळावा ना ? ' असें कंठ भरून आल्यामुळें करुणास्वरानें अडखळत ह्मणत तसेंच मस्तक ठेवून स्तब्ध राहिली. व कांहीं वेळानें उसासा टाकून मोठ्या कष्टानें हिनें माझे चरण सोडिले. आई, त्या वेळचें हिचें तें एकंदर स्वरूप, हिचें तें म्लान वदन, हिची ती गंभीर व निराश मुद्रा, व विष पिऊन निजल्यानंतरचा हिचा तो, " प्राणनाथ, मला एकटीलाच सोडून दुसरीकडे राहूं नका" हे शब्द निघतांना शेवटचा हाललेला अधरोष्ठ, आणि मजकडे टक लावलेली हिची ती शेवटची नजर, हीं सर्व, आई, माझ्या नेत्रांसमोर अगदीं मूर्त्तिमंत उभीं आहेत; व सत्वशीला, तूंही आतां कसा वर्त्ततोस तें पाहूं ह्मणून प्रत्येक क्षणीं हिणवून मला लाजवीत आहेत. आई, अशा रीतीनें ही क्षत्रियकुमारी श्रीमती लहान वयाची अबला होऊन हिचा शुद्ध संकल्प व त्याप्रमाणें वर्त्तन, हिचें निर्मळ प्रेम, आणि निस्सिम भक्ति, व हिचें विलक्षण स्थैर्य

आणि प्रचंड धैर्य. तरी अशा शुद्ध, एकवचनी, व प्रेमळ अबलेशीं मी तुज महाराज्ञी राजेश्वरीच्या कुमार-सत्वशीलानें प्रतारणा करावी, व महाअधम, चांडाळ, व कृतघ्न असा होऊन परमेश्वरापुढें उभें रहावें, हें तुला पसंत होईल? आई, तूंच सांग. (राजासुद्धां सर्व डोळे पुसतात.)

मैना०—( डोळे पुसून करुणस्वरानें.) सत्वशीला, हें विष तूं पिणार तर? पी बाळा.कृतघ्न होऊं नकोस.(स्तब्ध राहते.) धमाजीं, असल्या सद्गुणी बाळरत्नाचं सुख तुला किती तरी वर्षे मिळालें? आणि जिनें जन्म दिला त्या मला आईला कायती हीच घटका ना? ( स्तब्ध राहून डोळे पुशीत. ) कमलिनी तरी माझ्या नजरेस पडते किंवा नाहीं कोण जाणे ( डोळे पुशीत स्तब्ध रहाते. ) देवा, किती ह्मणून सहन करूं? ( सत्वशीलास ) सत्वशीला, तुझी बहीण तुझ्या नजरेस पडली नाहीं. काय हें जन्मां-तर! तुम्ही दोघं सार्वभौम राजाचीं मुलं मज पापिणीच्या पोटीं आल्यामुळें तुमचं एकमेकांस दर्शन तर नाहींच, पण एकमेकांची माहितीसुद्धां नाहीं. हर हर !!!( डोळे पुसून कांहीं वेळानें. ) बाळा, मी तुला आड येत नाहीं बरें. मलाही आतां कसली इच्छा नाहीं.

सत्व०—अरेरे!!! मला बहीण असून तिची व माझी भेट आतां नाहीं ना? तिला माझी आतांची हकिगत कळल्यावर ती किती दुःख करील? मजकरितां किती आक्रोश करील? मला भावाला डोळ्यांनी पाहिला नाहीं

म्हणून ती किती खंत करील? (डोळे पुसतो व स्तब्ध राहतो) मर्जी परमेश्वराची! आई, श्रीमती आतां उठत नाहीं. तरी मला आज्ञा आहे, ना! (गुडघ्यावर बसून विषाचा प्याला हातांत घेतो.)

न्याया०—(डोकीवरील रुमाल फेंकून.) लज्जे, आतां तरी सोड. सत्वशीला, माझं बहिणीचं थोडेसं ऐकशील कीं नाहीं? जरा थांब. (सत्वशीलाच्या हातचा प्याला खालीं ठेविते.) आई—(मैनावती एकदम उठून कमलिनीस पोटाशीं धरिते.)

मैना०—तूंच कमलिनी! बाई तूं ग कां अशी?

राजा—(आश्चर्यानें) या कमलिनीताईसाहेब! हा काय चमत्कार आहे!

सत्व०(आश्चर्यचकित] अहाहा!!! ही न्यायमूर्ति प्रत्यक्ष माझी ताईना? (स्तब्ध राहून) काय हें बहीण-भावांचें परस्परांवर नैसर्गिक प्रेम! व एका उदराच्या ममतेची किती ही विलक्षण आकर्षणशक्ती! एकून सृष्टी-चे नियम दैवाच्याही पलीकडचे आहेत. (मैनावती क-मलिनीस सोडते.) श्रीमती, चारच घटका जर तूं धीर धर-तीस, तर हें आमचें नातें ऐकून तुला कितीतरी नवल वाटलें असतें? (डोळे पुसून स्तब्ध रहातो.) ताई, तूं मा-झ्या हातचा प्याला खालीं ठेविलास, पण तो मला सो-डितां येत नाहीं.

कम०—सत्वशीला, तूं याला सोडूं नको, व मीही तुझ्या वचनाआड येत नाहीं. पण माझं थोडसं ऐक. श्रीमतीची तर आतां आशा नाहींच. पण वेळेस ही

उठल्यास सर्वांना आनंद व महत्सौख्य होणार आहे, न उठल्यास सर्वांना महत् दुःख व शोक होणार आहे; आणि परमेश्वराचा हेतु तर आपणास कळत नसतो. सत्वशीला, पुढच्या विशेष चांगल्याकरितां परमेश्वर कधीं कधीं आधीं महा वाईट प्रसंग आणितो, व त्या वाईटामुळेंच पुढचं चांगलं झालं, नाहींतर तें होण्याचा संभव सुद्धां नव्हता, असाही अनुभव दुनयेमध्यें पुष्कळ येतो. सत्वशीला, आपलीच गोष्ट पहा. आईला फांशी जाण्याची वेळ आली ह्मणून ती दुःखानें विलाप करूं लागली. तो विलाप अकस्मात् तुझ्या कानीं पडला. त्यानें तुझें अंतःकरण कळवळून तुला दया आली, व खोटे फांस करून तूं आईला वांचविलंस. अशा रीतीनें आईला वांचविलं ह्मणून तुला देहांत शिक्षा झाली. आणि त्याप्रमाणें तुझा प्राण जाण्याची वेळ आज आली होती, ह्मणूनच तुझं खरं स्वरूप आज बाहेर पडलं, व त्याबरोबर आह्मीही प्रकट झालों. सत्वशीला, इतके प्रसंग जर न येते, तर आणखी कांहीं काळपर्यंततरी आपण सर्व येथेंच असून एकमेकांस अगदींच परकीं अशीं राहिलों असतों. तसंच, विशेष पुण्यवान व भाग्यशाली प्राण्यावरील दुर्दैवाचा प्रसंग कांहींतरी परमेश्वरी हेतूनेंच येत असतो. कारण, त्या प्रसंगाच्या निमित्यानेंच दुसऱ्या अनेकांचं कल्याण होण्याचा योग असतो. त्याप्रमाणेंच वेळेस आपली भावी सार्वभौमिणी व राजेश्वरी अशी ही श्रीमती आज विष पिऊन मरण पावल्याप्रमाणें झाली आहे, ह्मणूनच

हिला उठविणाऱ्या कोणातरी पुण्यवानाची आपणांला आज जरूर आहे. आणि सत्वशीला, तो जर या वेळेपर्यंत दैवयोगानें फारच विपत्तींत असून शेजाऱ्यासही त्याचं नांव माहीत नाहीं इतका अप्रसिद्ध असला, व त्याचं तें दुर्दैव सरण्याची वेळ आतांच आली असली, तर त्याचं दैव उघडण्याचा ईश्वरी संकेत या श्रीमतीमुळेंच नसेल कशावरून? कारण, कर्मधर्मसंयोगानें त्याजपाशीं असलेल्या औषधीस यश आलं, आणि जर आज ही श्रीमती उठून बसली, तर हें महाराजसाहेब पिता व हिच्या करितां प्राण देण्यास सिद्ध झालेला तूं सार्वभौम राजा त्याला काय काय देऊं शकणार नाहींत? व छप्पन्न मांडलिकराज्यांसुद्धां तुझ्या अमलामध्यें त्या धन्वंतरीच्या नांवाला कोण सन्मान देणार नाहीं? अशा रीतीनें, सत्वशीला, परमेश्वराचा हेतु आपल्या बुद्धीच्या अगदीं बाहेर आहे. आपण मागतांना शुद्ध अंतःकरणानें चांगलं मागावं, व त्याकरितां प्रयत्न करावा. पुढें देणं न देणं हें परमेश्वराकडे. प्रयत्न न केल्याबद्दलचा दोष तरी आपणांकडे येणार नाहीं. ह्मणून ह्मणतें कीं, पुढच्या बऱ्यावाईटाचा सर्व भार तूं परमेश्वरावर घाल, व ज्या सूर्योदयाच्यापूर्वीं श्रीमती विष प्याली, तो आजचा मध्यान्हीचा सूर्य मात्र उलटूं देऊं नकोस. तोपर्यंत औषधोपचार मिळून यश येण्याविषयीं आपण सर्व परमेश्वराची करुणा भाकूं. न जाणो, असल्या प्रखर पातिव्रत्याच्या साध्वीकरितां परमेश्वर काय नाहीं करणार?

व ही श्रीमती उठून बसणार नाहीं कशावरून? त्यांतून नच उठली, तर मग या ( बोट दाखवून ) या प्याल्याचा स्वीकार करणंच आहे. तरी सत्वशीला, मी सांगतें यांत वचन-भंग किंवा कृतघ्नता न होतां आपण ही आपल्या प्रयत्नांत चुकलों नाहीं, व सर्व परमेश्वराकडेसच राहील.

राजा.—( हात जोडून. ) महाराज, ताईसाहेबांचें ह्मणणें खरें आहे.

मैना०—सत्वशीला, कमलिनीचं ऐक. बाळा, असं केल्यानें तुजकडे दोष येत नाहीं.

सत्व०—आई, इतकें मी ऐकितों. ( श्रीमतीकडे टक लावून पहातो व कांहीं वेळानें. ) अहाहा!!! काय हें लावण्य-स्वरूपाचें अप्रतिम ध्यान! आणि त्यावर विरक्ती आणि नैराश्य यांची किती ही विलक्षण शोभा! परमेश्वरा, हें पाहून तुझा कोणता महाज्ञानी अगदीं थक्क होऊन जाणार नाहीं? आई, हें सत्ताधीश राजाचें एकुलतें अति लाडकें कन्यारत्न, पण मोठमोठाले महंतही माना डोलवतील, अशी पूर्णशांती इजमध्यें वसत होती. ताई, ही सोळासतरा वर्षांची लहान अबला, पण प्रौढ व शूर अशा वीरांनींसुद्धां लज्जित व्हावें, अशा प्रकारचा हिचा अढळ निश्चय होता.( श्रीमतीच्या हनुवटीस हात लावून ) श्रीमती, तारुण्याची नुकतीच सुरुवात झालेली असें नाना-हट्ट व छंद करण्याचें तुझें वय, आणि या वयांत, प्रिये, महान् साधुजनांनीं चकित होऊन जावें, अशा रीतीचें निवांत, निर्मल, आणि निश्चल समाधान तुजमध्यें असावें

ना? तसेंच प्रिये, ऐश्वर्यादि संपूर्ण सौख्याच्या ठिकाणीं तुझा जन्म, पण अशा स्थितिमध्यें मोठमोठ्या योगीजनांनीं आश्चर्य करीत रहावें, अशी अपूर्व सुखदुःखसमानवृत्ति तुजमध्यें आढळावी ना? सुंदरी, तुझे हे सर्व अलौकिक गुण परमेश्वरी कृपेशिवाय एकाच प्राण्याच्या ठिकाणीं येणें नाहींत हें खरें आहे, पण प्रिये, तुझ्या या अनेक गुणांपैकीं एकेक गुण जरी कोणी स्त्री आपणामध्यें आणील, तर त्या योगानें ती विशेष योग्यतेसच पात्र होईल यांत अगदीं संशय नाहीं. ( जरा स्तब्ध राहून व वर पाहून ) अरेरे!!! परमेश्वरा, ज्या नेत्रांना या श्रीमतीचें तें दिव्य स्वरूप पाहण्यास मिळालें, त्यांना हें तिचें असें भयंकर रूप दाखविण्याची वेळ तूं आणावीस ना? ( श्रीमतीची हनुवटी धरून ) प्रिये, प्रत्येक भेटीअंतीं या तुझ्या मनोहर मुखांतून मधुर वाणीनें निघणारे प्रेमाचे ते प्राणनाथ, प्राणनाथ, शब्द आतां मला कोठें ऐकण्यास मिळतील? तुझ्या या शांत व गंभीर मुद्रेस विशेष शोभा देणारें तुझें तें विलक्षण अंगचापल्य पुन्हां केव्हां माझ्या दृष्टीस पडेल? प्रिये, माझी पत्नी होण्याचा तूं आपला मनोदय ज्या वेळीं मला कळविलास, त्या वेळीं केलेला निश्चय व्यर्थ न करण्याचें तुझें नैसर्गिक निर्मळ धैर्य, व त्या बरोबरच शास्त्र व रुढी यांविरुद्ध गोष्ट होत असल्याबद्दल लोकलज्जेची भीति, हीं ज्यां तुझ्या पाणीदार नेत्रांतून मोठ्या मौजेनें व्यक्त होत होतीं, ते तुझे मोहक नेत्र अशा रीतीनें निरंतरचे मिटलेले रहावेत काय? व तुझ्या त्या चित्तहरण करणा-

त्या अवलोकनाचा लाभ मला आतां कधींच मिळूं नये काय? प्रिये, तूंच आपल्या सत्यवाणीनें मला मोठ्या प्रेमानें आणि आवडीनें सत्वशीलमहाराज असें नांव दिलेंस, व तुझ्या त्या शुभवाणीप्रमाणें या समयीं मी खरोखरीच चक्रवर्ती सत्वशीलमहाराज ह्मणून प्रकटही झालों, आणि अशा या तुझ्या पतीच्या भाग्योदयसमयीं प्रिये, तुझी या रीतीची उदासीन मौन्यवृत्ति व्हावी काय? सुंदरी, फारच त्वरा केलीस. ( मैनावती श्रीमतीचे तोंडावरून हात फिरविते. ) अगे, ज्या साध्वीची हृदय-द्रावक हकिगत ऐकून तुझें कोमल अंतःकरण फार कळवळून गेलें व जातांना जिच्या पुत्राला तूं आपला खासा महाल अर्पण करून गेलीस, ती माझीच आई आहे, व ती तूं उठून बसली रहावीस ह्मणून दीन भावानें परमेश्वराचा धांवा करीत तुजजवळ बसली आहे. तसेंच प्रिये, ज्या न्यायाधीश साहेबांच्या चांगुलपणामुळें आपली भेट शेवटपर्यंत अंतरली नाहीं ह्मणून ते त्यांचे उपकार कसे फिटतील अशी तूं फार काळजी करीत होतीस, ती माझीच प्रत्यक्ष वडील बहीण कमलिनी आहे; व तिनें माझ्या हातचा प्याला खालीं ठेवून तुला उठविणारा कोणीतरी मिळेल व भावाचें मरण चुकेल, या आशेनें म्लानवदन करून तुजजवळ उभी राहिली आहे. श्रीमती, आमच्या या अद्भुत भेटीचें वर्तमान ऐकून तरी ही महानिद्रा घ्यावयाची होतीस. इतकी घाई करावयाची नव्हतीस. आतां हे कनवाळू सती, या सर्वांकडे लक्ष्य दे. यांच्या आशेचा

भंग करून यांना शोकपंमुद्रामध्यें सोडूं नको. यांना सुख देण्याकरितां कांहीं काळपर्यंत भूलोकीं नांदण्याचें मनांत आण, व तुझ्या नेहमीच्या हास्ययुक्त आल्हादित मुद्रेनें यांजपाशीं दोन शब्द बोल. प्रिये श्रीमती, आजपर्यंत माझा कोणताच शब्द तूं अमान्य केला नाहींस त्या प्रमाणें इतकें माझें ऐक, व तुझ्या या एकवचनी भ्रतारावर भावी भयंकर अनर्थाचें अपयश व पातक येत आहे याचें निवारण कर. ( डोळे पुसतो व स्तब्ध राहतो. ) ताइ, तूं माझी बहीण या श्रीमतीच्या उठण्यावर मज एकुलत्या धाकट्या भावाची फार आशा करून आहेस, पण मींचं तुह्मां सर्वांवर हा दुःखाचा प्रसंग आणिला आहे. योगायोग, दुसरें काय? माझी भेट झाल्याबरोबर तुमच्या दुःखाला व शोकाला सुरुवात व्हावी, असाच तुमचा व माझा ऋणानुबंध होता. [ डोळे पुसून ] आई, ताई, या पेल्यावांचून सुटका नाहीं.

कम०—( डोळे पुशीत ) सत्वशीला, मी तुला नाहीं ह्मणत नाहीं. पण जी अवधि तूं दिली आहेस, तोंपर्यंत तरी तुझ्या समागमाचं सुख आह्मांला देशील कीं नाहीं? अरे, लहान भावाच्या तोंडच्या ताई, ताई, शब्दांचं सुख कायती हींच घटका मी घेत आहें. आणि इतक्यांतच हा भयंकर विषाचा प्याला मी तुला कसा पिऊं देईन? सत्वशीला, दोन प्रहर दिवस येईपर्यंत मी तुझी आशा सोडणार नाहीं. पुढें परमेश्वराची इच्छा. ( डोळे-पुशित स्तब्ध राहते. सर्व डोळे पुसतात. )

सत्व०—( वर पाहून ) हे दीनदयाळ प्रभो, आज दोन प्रहरानंतर चोहोंकडे आनंदाचा पूर, किंवा दुःख आणि शोक यांची परमावधि, यांपैकीं जें तुझ्या इच्छेस येईल तें होणार आहे. मज पामराकडे कांहींएक नाहीं. तरीपण हे भगवंत, सर्वांना आनंद व सुख होईल असें कर. [ सर्व स्तब्ध रहातात. ]

बैरागी ( पडद्यांत ) राजेसाहेबांची विष प्यालेली कन्या इकडेच आहे काय? ( असें मोठ्यानें विचारितो. )

राजा०—भालदार, कोण आहे तें पहा, व त्यास घेऊन या. ( भालदार जातो. वैराग्यास घेऊन येतो. राजा नमस्कार करितो व हात जोडून ) साधुमहाराज, ही माझी कन्या जर आपण उठवाल तर हें सर्व राज्य आजपासून तुमचें आहे.

बैरागी—महाराज, मी वैद्य नाहीं, किंवा अमानुषिक व दैविक शक्तीचा महासमर्थ सिद्ध नाहीं. पण कितीही भयंकर विष असलें, तरी त्यावर रामबाण अशी एक वनस्पति मजजवळ आहे. आपण अगदीं निर्धास्त असावें. इचा प्राण गेला आहे असें जरी वाटतें, तरी मस्तकामध्यें ब्रह्मांडीं प्राण पुष्कळ वेळपर्यंत असतोच. विषानें अशी स्थिति होऊन गेलेल्या पुष्कळांना माझ्या वनस्पतीचा गुण आला आहे. आपण अगदीं काळजी करूं नका. आपली कन्या आतां उठून बसेल. थोडें पाणी पाहिजे. ( पाणी देतात. बैरागी उगाळून देतो. सर्व हुषारीनें पहातात. )

राजा०—साधुमहाराज, ही वनस्पती आपणांला कशी मिळाली ?

बैरागी—महाराज, परमेश्वरी इच्छा व त्याची योजना हीं अतर्क्य आहेत. त्याच्या इच्छेप्रमाणेंच मनुष्याच्या ध्यानींस्वप्नीं नसतां सर्व गोष्टी ओघानें सहज घडून येतात. महाराज, मजवर दुर्धर प्रसंग आले. मी बैरागी झालों. पुष्कळ हिंडलों. नमर्दाकिनारीं संसारी मनुष्याच्या दृष्टीस न पडणारे असे अगाध महिन्याचे अनेक सिद्ध, महंत व साधू आहेत, असें ऐकिल्यावरून नर्मदाप्रदक्षिणा केली. ती प्रदक्षिणा करीत असतां एकदां नर्मदेच्या तिरापासून बऱ्याच अंतरावर वाट चुकून एका गुहेजवळ गेलों. त्या गुहेमध्यें एक फारच वृद्ध परंतु भव्य व तेजस्वी असा सिद्ध आसन घालून ध्यानस्थ होता. त्यास पाहून मी आश्चर्यांत पडलों व तसाच उभा राहिलों. कांहीं वेळानें त्यानें आपली समाधि सोडून मजकडे पाहिलें आणि मला जवळ बोलाविलें. माझी विचारपूस केलीं. मलाही त्या महापुरुषाची कांहीं दिवस सेवा करावीशी वाटली. मी त्याजपाशीं सहा महिने होतों. नंतर त्याची आज्ञा घेऊन पुढें प्रदक्षिणा करण्यास निघालों. त्या वेळेस त्यानें मला ही वनस्पति दिली, व निरिच्छ बुद्धीनें हिचा परोपकारीं उपयोग कर म्हणजे कांहीं दिवसांनीं तुझे सर्व हेतू पूर्ण होतील असें सांगितलें. या वनस्पतीचें सामर्थ्य फारच विलक्षण आहे. महाराज, ही आपली कन्या तर उठ-

णारच, व त्याबद्दल आपण मला आपलें सर्व राज्य देत आहां. पण केवळ राज्य मिळाल्यानें आज मला सुख नाहीं. आपणच आनंदानें राज्य करावें.

राजा०—आपणाला अशी कोणती काळजी आहे? मजकडून झाल्यास मी ती दूर करीन.

वैरागी—महाराज, तें आपण विचारूं नये, व मी तें सांगूं नये. माझी काळजी आपल्याच्यानें दूर होणार नाहीं. ( इतक्यांत श्रीमती आपणच होऊन हालते, सर्व तिजकडे आनंदानें पाहतात. वैरागी पुन्हां औषधी उगाळून देतो. )

राजा—( वैराग्याच्या पायांवर मस्तक ठेवून ) महाराज, आपण थोर पुण्यवान ह्मणूनच आपणांला त्या परोपकारी महासमर्थांचें दर्शन झालें. त्यांच्या समागमाचा लाभ मिळाला. त्यांचा प्रसाद मिळाला. व आपणांस प्रसाद मिळाला, म्हणूनच माझी कन्या आज मला मिळाली.

मैनाव०—( आनंदाश्रू पुसून श्रीमतीच्या अंगावर हात फिरविते ) श्रीमती, तूंच मला आज माझा सत्वशील दिलास, नाहींतर आज मला केवढा पुत्रशोक झाला असता? महा पतिव्रता आहेस तूं. [ सर्व आनंदाश्रू पुसतात ] सत्वशामध्य श्रीमतीसारखं रत्न तुझी पुत्नी झाली, बाळा, आणखी काय पाहिजे?

सत्व०—ताई, ही अत्यानंदाची घटका तुजमुळेंच आली बरें; नाहींतर एव्हां मी विष पिऊन गेलों असतों. तुझा महिमा अगाध आहे. आई, तूं पूर्ण सत्वाची ह्मणूनच ताईसारखं रत्न तुला देवानें दिलें आहे.

राम०—सत्वशीला; आईचेंच हें पुण्य आहे; नाहींतर आणखी कांहीं वेळानें कोणती वेळ आली असती!

श्री०—प्राणनाथ!

सत्व०—प्रिये,

श्री०—मी हें काय पहात आहें? प्राणनाथ! थोडे पाणी. (मैनावती पाजते.)

सत्व०—प्रिये, मी तुजजवळच आहें तरें. परमेश्वराच्या मनांत आपण भूलोकींच ऐश्वर्यादि सुखामध्यें नांदावें असें आहे.

श्री०—हें काय ह्मणतां? असें कसें होईल? (राजाकडे पाहून) माझे बाबाही जवळ आहेत. (मैनावतीस पाहून) या बाई कोण? (कमलिनीकडे पाहून) या कोण? हे कोण? (बसावयास जाते)

मैना०—नको उठूं वये. तुला फार श्रम झाले आहेत.

राजा—वये, तूं नीट सावध हो, मग सर्व सांगेन.

जिजा०—[पडद्यांत] अरे बाबांनो, मला कां नेतां? माझ्याकडे कांहीं नाहीं. मीच बाईसाहेबांना नको नको ह्मणत होतें. त्यांनीं माझं ऐकिलं नाहीं. देवा, आतां मी काय करूं?

श्री०—कोण? जिजाबाई?

राजा—जिजाबाई, या बरें. भिऊं नका. (जिजाबाई येते)

श्री०—जिजाबाई, माझ्याजवळ बसा. [बसते]

सत्व०—जिजाबाई, या वेळचें आमचें अद्भुत वर्तमान ऐकून तुलाही फार आनंद होईल.

श्री०—बाबा, मी विष प्यालें होतें ना !

राजा—सर्व सांगतों बरें, पण आधीं तूं चांगली हु-शार हो. ही अपूर्व हकिगत ऐकून तुला फार हर्ष होईल.

श्री०—बाबा, सांगा. मी चांगली आहें. पण मला आणखी पाणी द्या. (देतात.)

राजा—बये, या स्वामीमहाराजांच्या योगानें तूं उ-ठून बसलीस बरें.

श्री०—(मैनावतीस उद्देशून) बाबा, या भल्या बाई कोण बसल्या आहेत ?

सत्व०—ज्या बाइना मी सोडविलें त्याच या बाई. यांचा मुलगाही यांना आजच सांपडला. (सर्व गालांत हांसतात.)

श्री०—खरंच ! फार चांगलं झालं. आतां मी बाबा-कडून यांची आणि यांच्या मुलाची चांगली तजवीज ठेववीन. पण यांचा मुलगा होता तरी कोठें ! (राजा हंसतो)

सत्व०—येथील तुरुंगांत नोकर होता.

श्री०—(आश्चर्यानें) खरं ! मोठं नवल आहे. आणि हें समजलं तरी कसं !

सत्व०—त्याच्या प्राणावरच आलें तेव्हां समजलें.

श्री०—म्हणजे !

राजा—(सद्गदित होऊन) श्रीमती, धन्य भाग्य तुझें ! तुझ्याजवळ बसल्या आहेत या आपल्या वडे महाराजसा-हेबांच्या थोरल्या महाराणी मैनावतीसाहेब आहेत.

आणि यांचे चिरंजीव, ज्यांनी तुला आपल्या चरणांचा आश्रय देऊन छपन्न राजांवरील महाराज्ञी केली, ते हे चक्रवर्ती राजाधिराज सत्वशीलमहाराज आहेत. ( जिजाबाई वैरागी सत्वशीलाकडें टक लावून पहातात. श्रीमती उठून बसावयास जाते. दोघी धरून बसावितात. श्रीमती बसूनच मैनावतीचे पायांवर मस्तक ठेविते. )

मैना०—पाठीवरून हात फिरवून) श्रीमती, नको श्रम घेऊं.

श्री०—( मस्तक ठेवलेली ) याच चरणांमुळें माझे सर्व हेतू पूर्ण झाले आहेत. ( नीट बसते. )

सत्व०—प्रिये, तुझी वाणी सत्य झाली.

श्री०—बाबा, या अशा वेष केलेल्या बाई कोण ?

सत्व०—हेच ते तुझे भले सज्जनगृहस्थ आणि प्रधानसाहेबांचे जिवलग स्नेही न्यायाधीशसाहेब. ( कमलिनीसुद्धां सर्व गालांत हंसतात. )

राजा—( हंसत ) श्रीमती, महाराजसाहेबांच्या ज्येष्ठ भगिनी कमलिनीताईसाहेब या आहेत बरें.

श्री०—बाबा, आणि हें आपल्याला कसं समजलं नाहीं ! मोठा चमत्कार आहे.

राजा--श्रीमती, मागाहून सर्व सांगेन.

जिजा०—(डोळे पुसून) धमाजी, माझ्या वसंतमाधवाची वाट काय केलीस?

मैना०—या जिजाबाई !

वसंत--ही माझी आई! आई, मीच वसंतमाधव आहे. ( पायांवर मस्तक ठेवितो. )

जिजा०—( पाठीवर हात फिरवून )बाळा,—(तो उठतो. )

मना०—हा वसंतमाधव? अहाहा! अशा वेळीं बाबासाहेबांशीही भेट झाली तर सर्वांना किती आनंद होणार आहे!

वैरा०—हे महासमर्थ सिद्ध. तुमच्या त्रिकालज्ञानाची व तुमच्या प्रत्येकास्वभावाची मी पामर किती स्तुति करूं? माझें महद्भाग्य ह्मणूनच तुमच्या समागमाचा लाभ झाला. व त्यामुळेंच मला ही अत्यानंदाची घटका आली. (स्तब्ध राहतो.) बाळा वसंतमाधवा, मज पित्यालाही तुला आलिंगन देऊं दे. (सर्व अश्चर्यानें बाबासाहेबांकडे पाहतात.)

राजा०—बाबासाहेब, या वेषामुळें मी तुम्हांला ओळखिलें नाहीं. परमेश्वरानें फारच आनंदाचा दिवस दाखविला. (वसंतमाधव पित्याच्या चरणांवर मस्तक ठेवितो. बाबासाहेब त्यास आलिंगन देतो व सोडतो.) वसंतमाधव, माझें सर्व राज्य आजपासून बाबासाहेबांचें आहे. माझ्या श्रीमतीस काहीं कमी नाहीं. तरी आजच यांना महाराजांचे हातून राज्याभिषेक करण्याची तयारी करा. (बाबासाहेबांस) बाबासाहेब, वडे महाराजसाहेबांनाही आतां राज्यकारभाराची दगदग अगदीं होत नाहीं. त्यांना आजची हकिकत कळल्याबरोबर ते तांतडीनें येतील. ते आल्यावर सत्यशीलमहाराज व वसंतमाधव यांच्या लग्नांचा विचार होऊन लग्न झाल्यावर दोघांनाही बरोबरच राज्याभिषेक होईल. तोंपर्यंत आपण हें राज्य करावें. नाहीं ह्मणूं नका. (मनोवतीस) मातोश्रीसाहेब, आपल्या ताईसाहेबांना वसंतमाधव योग्य वर आहेत, व दोन्हीं लग्नें बरोबरच

वींत अशी माझी इच्छा आहे. (कमलिनी लाजून खा-
पहाते.)

—खरेंच, बंधूवरील उपकार बहिणीनें फेडिले
आणि महाराजसाहेबांच्या इच्छेप्रमाणें घड-
आलें तर वसंतमाधव यांचे ते उपकार चांगले फिट-
आहेत. खरेंना ताई! (सर्व हांसतात. कमलिनी
जून गालांत हसते. व हळूच वसंतमाधवावर दृष्टि फेकिते दो-
घी नजरानजर होते.)

राजा—वसंतमाधव, दोन सांडणीस्वार आताच रत्न-
सि रवाना करा. आणि सर्व लवाजम्यासहित थाटानें
जवाड्यांत स्वारी जाण्याची तयारी करा. आज चोहों-
डे सरकारीखर्चानें मोठा उत्सव करण्याविषयीं जाहीर
रा. सर्व कैदी सोडून त्यांना व दुसऱ्या सर्व गोरग-
बांना वर्षाच्या अन्नवस्त्रापुरतें द्रव्य वाटण्याची तज-
ज ठेवा.

सत्व०—धोण्डबा, कोण्डाजी, रामबा, महादबा, तुम्ही
से मित्र नेहमीं मजजवळ असा. (चौघे हात जोडतात)
ईश्वराची तुम्हांवर मोठी कृपा आहे यांत संशय नाहीं.
(हैवतरावास.) हैबतराव, (तो हात जोडितो.) तुमच्या
ठेंच माझ्या आईचा प्राण वांचला, तरी आजपासून
मची नेमणूक बरोबरीच्या मानकऱ्यांमध्यें केली आहे.
तुम्ही नेहमीं मजजवळ असावें. (हैबतराव सत्वशीलाच्या
पायांवर डोकें ठेवण्यास जातो. सत्वशील ठेवूं देत नाहीं.

इतक्यांत एक अंमलदार येतो व सर्वांस मुजरा करितो. )

अमल०—( हात जोडून ) सरकार. स्वारी निघेपर्यंत विश्रांति घेण्याची तजवीज केली आहे.

राजा०—मातोश्रीसाहेब, तिकडे चलावयास [illegible] झाला.

[illegible]वती व जिजाबाई श्रीमतीस धरून उठवितात. सर्व जातात. )

पडदा पडतो.

समाप्त.